अवधूतासी। यदूसी धरोनियां पोटासी। निराशता हे जे ऐसी। अवश्यतेसीं साधावी ॥३३०॥ एका जनार्दना शरण। त्याची कृपा परिपूर्ण। तोचि आशापाश छेदून। समाधान पाववी ॥ ३३१ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे यद्ववधूतसंवादे एकाकारटीकायां अष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे अष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥

अध्याय नववा.

श्रीगणेशाय नमः। ॐ नमो सद्गुरु अमरपती। अनुभवू तोचि ऐरावती। स्वानंद मदें भद्रजाती। उन्मत्तस्थिती डुल्लत ॥ १ ॥ उपदेशाचें वज्र तीख। छेदी संकल्पविकल्पपांख। जडजीव ते पर्वत देख। निजस्थानीं सम्यक स्थापिसी ॥ २ ॥ विवेकाचे पारिजात। वैराग्यसुमनीं घमघमित। मुमुक्षुभ्रमर रिघोनि तेथ। आमोद सेविती चित्सुख ॥ ३ ॥ उपशम तोचि बृहस्पती। विश्वासें तुझा निकटवर्ती। त्यासी मानिसी अतिप्रीतीं। तो सभेप्रती सदस्य ॥ ४ ॥ कृपाकामधेनूंचीं खिल्लारें। श्रद्धावत्सांचेनि हुंकारें। वोळल्या बोरसाचेनि भरें। तें दुभतें पुरे भागवतां ॥ ५ ॥ सतेज चिंतामणीचे खडे। सभोंवतीं लोळती चहूंकडे। भक्त न पाहती तयांकडे। चरणसुरवाडें सुखावले ॥ ६ ॥ स्वर्गांगना अष्टमासिद्धी। तुजपुढें

आलाच. २९ अवधूताच्या मनांत परमकृपा उत्पन्न झाली. तो यदूला पोटाशीं धरून म्हणाला-' अशी ही विरक्ति तूं अवश्य संपादन कर. ' ३३० एकनाथ जनार्दनस्वामींना शरण आहे. त्याची पूर्ण कृपाच सर्व आशापाश सोडून समाधान देते. ३३१.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित
टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह यदु-अवधूत-संवाद
या नांवाचा आठवा अध्याय समाप्त झाला.

हे ॐकाररूप सद्गुरो ! तुला नमस्कार असो. तूं देवांचा राजा इंद्र आहेस. अनुभव हाच तुझा ऐरावत आहे. इंद्राच्या ऐरावताचा जसा अखंड मदस्राव चालू असतो व तो निर्भयपणें जसा डुलत असतो, तसा तुझ्या अनुभवांतून ब्रह्मानंदाचा अखंड प्रवाह वहात असून अनुभवी जीव त्यांत तल्लीन होऊन डुलत असतो. १ इंद्राच्या वज्रानें पर्वतांचे पंख तोडून त्यांस जसें अचल केलें, तसें तुझें उपदेशरूप वज्र जीवांचे संकल्प-विकल्प तोडून त्यांस स्थिर करितें. २ विवेक हा पारिजातक वृक्ष असून वैराग्य हें त्याचें सुवासिक पुष्प आहे. मुमुक्षुरूपी भ्रमर त्यांवर बसून चित्सुखाचा मकरंद सेवन करितात. ३ इंद्रियनिग्रह हा बृहस्पति तुझ्या विश्वासानें तुझ्या संनिध रहातो. तूं त्याचा प्रेमानें आदर करितोस. तुझ्या सभेंतील तो मुख्य सभासद आहे. ४ इंद्राची कामधेनु जशी इष्टवस्तु देते, तशी तुझी कृपारूपी धेनु निर्विकल्पवस्तूसह सर्व इच्छा पूर्ण करिते. अशा या कृपाकामधेनूंचीं खिल्लारें तुझ्यापाशीं आहेत. श्रद्धारूपी वत्सांचा हंबरडा ऐकतांच त्यांना पान्हा फुटून तुझ्या भक्तांना कृपामृतरूपी दूध भरपूर मिळतें. ५ तुझ्या सभोंवार चिंतामणींचीं तेजस्वी रत्नें पसरलेलीं आहेत, पण तुझे भक्त त्यांकडे कधीं पहातहि नाहींत. तुझ्या चरण-सेवेनेंच ते सुखी होतात. ६ स्वर्गांत जशा अप्सरा नाचतात, तशा अष्टसिद्धि तुझ्यापुढें नानाप्रकारें नाचत असतात,

नाचती नानाछंदीं । त्यांतें दास न पाहती त्रिशुद्धी । मंदबुद्धी भाळले ॥ ७ ॥ समसाम्यें समान । अढळ तुझें सिंहासन । सच्चिदानंदाची गादी जाण । तेथें सुखासन पैं तुझें ॥ ८ ॥ पावावया तुझिया पदप्राप्ती । साधनचतुष्टयसंपत्ती । जोडूनियां याचक यजिती । प्रत्यागावृत्तीचेनि योगें ॥ ९ ॥ जे मन होमिताति सावधानी । ऐसें भक्तभजन देखोनी । तेणें भावार्थयोगें संतोषोनी । निजपददानी तूं होशी ॥ १० ॥ त्यासी निजात्मता देऊनी । बैसविसी निजासनीं । मरणेंवीण अमर करूनी । अपतनीं स्थापिसी ॥ ११ ॥ इंद्रा अहल्येशीं व्यभिचारू । तुज वृंदेशीं दुराचारू । इंद्र जाहला सहस्रनेत्रू । तूं सर्वांगें सर्वत्र देखणा ॥ १२ ॥ इंद्रासी दैत्य करिती दीन । त्याचें पद घेती हिरोन । तुज भक्त करिती प्रसन्न । पद चिद्घन ते घेती ॥ १३ ॥ कुकुत्स्थ बैसला इंद्राचे स्कंधीं । दुर्वास बैसला तुझ्या खांदीं । इंद्र वर्ते विष्णूचे बुद्धी । तूं भक्तच्छंदीं वर्तसी ॥ १४ ॥ रावणें बंदीं घातलें इंद्रासी । तुज बळीनें राखिलें द्वारासी । इंद्र याची याग अवदानासी । तूं भूमिदानासी याचिता ॥ १५ ॥ इंद्रासी अग्निमुखें प्राप्ती । तुज विश्वतोमुखीं तृप्ती । ऐसा सद्गुरु तूं कृपामूर्ती । अमरचक्रवर्ती गुरुराया ॥ १६ ॥ तुझी करावी विनवणी । तंव तेथें न रिघे वाणी । वाणीप्रकाश तुझेनी । वक्ता वदनीं तूं सत्य ॥ १७ ॥ एका एक जनार्दनीं । तो जनार्दन वक्ता वदनीं । ऐसा वचनामाजीं प्रवेशोनी । ग्रंथकरणी करविता ॥ १८ ॥ तेथें मुळी निमाली अहंता । अहं दवडूनि तूं कवि कर्ता । एका जनार्दनु अभंगी सुता । अभंगता गुरुचरणीं ॥ १९ ॥ त्या गुरुचरणप्रसादें । गुरूचीं लक्षणें विदगदें । वाखाणिलीं यथाबोधें । यदुसंवादें अवधूतें ॥ २० ॥ मागां अष्टमाध्यायाच्या अंतीं । असतां पिंगलेसी एकांतीं । विवेकवैराग्य निवृत्तवृत्ती । निजसुखप्राप्ती पावली ॥ २१ ॥ जंव जंव अपरिग्रह होणें । तंव निजसुख पावणें । हेंचि प्रस्तुत बोलणें । तेणें ब्राह्मणें बोलिजे ॥ २२ ॥

पण तुझे दास त्यांच्याकडे ढुंकूनहि पहात नाहींत. मंदमति मात्र त्यांना भाळतात. ७ प्रणवांतील अर्धमात्रा हेंच तुझें अढळ सिंहासन. त्यावर सच्चिदानंदाची गादी आहे. त्यावर तुझें सुखासन आहे. ८ तुझ्या पदाची प्राप्ति होण्यासाठीं साधनचतुष्टयसंपन्न होऊन पूजक ध्यानयोग्यानें तुझें पूजन करितात. ९ ते सावधान चित्तानें आपल्या मनाचा तुझ्या स्वरूपांत होम करितात. त्या भक्तांचें भजन पाहून तूं संतुष्ट होतोस व निजपद देतोस. १० त्यांना स्वरूपता देऊन आपल्या आसनावर बसवितोस. त्यांना अमर करून त्यांचा अधःपात होऊं देत नाहींस. ११ इंद्रानें अहल्येशीं व्यभिचार केला, तूं वृंदेबरोबर निंद्य आचरण केलेंस, पण इंद्राला हजार नेत्रांची प्राप्ति झाली व तूं स्वतः तर सर्वांगसुंदर झालास. १२ दैत्य इंद्राला जिंकून त्याचें पद हिरावून घेतात, तुझे भक्त तुला प्रसन्न करून तुझें चिद्घन पद घेतात. १३ इक्ष्वाकु कुळांतील एका राजानें इंद्राला वृषभ करून त्याच्या खांद्यावर बसून युद्ध केलें, म्हणून त्या कुळाला 'ककुत्स्थ' हें नांव प्राप्त झालें, याप्रमाणें ककुत्स्थ राजा इंद्राच्या खांद्यावर बसला आणि दुर्वासऋषि तुझ्या खांद्यावर बसला. इंद्र विष्णूच्या बुद्धीनें चालतो व तूं भक्तांच्या छंदाप्रमाणें वागतोस. १४ रावणानें इंद्राला कैदेंत टाकिलें. बळीनें तुला द्वारपाल केलें. इंद्रानें यज्ञांतील हविर्भाग मागितला व तूं भूमीदान मागितलेंस. १५ इंद्राला अग्निमुखानें सर्वांची प्राप्ति होते. तुला विश्वमुखानें सर्व मिळतें. हे गुरुराया! तूं सद्गुरु असा अमरचक्रवर्ती, दयेची मूर्तिच आहेस. १६ तुझी विनवणी करावी तर शब्दच उमटत नाहींत, कारण तुझ्यामुळेंच वाणी प्रकट होते. खरोखर तोंडानें बोलणाराहि तूंच आहेस. १७ एकनाथ एका जनार्दस्वामीमध्येंच तादात्म्य पावला आहे. तेव्हां वास्तविक जनार्दनस्वामीच वक्ता आहे. तोच मुखांत व शब्दांत प्रवेश करून ग्रंथ करवीत आहे. १८ जेथें अहंकारच मुळीं नाहींसा झाला आहे तेथें 'अहंपणा' नसल्यामुळें कवि व कर्ताहि तूंच आहेस. जनार्दनस्वामींचा शिष्य एकनाथ तादात्म्य पावला आहे. गुरुचरणापाशीं त्याचा अभेद झाला आहे. १९ गुरुचरणाच्या प्रभावानेंच अवधूतानें यदूला सांगितलेलीं लक्षणें मीं यथामति वर्णिलीं. २० मागें आठव्या अध्यायाच्या शेवटीं पिंगलेला एकान्तांत विवेकवैराग्य उत्पन्न झालें. ती विषयापासून निवृत्त झाली व आत्मसुखाला प्राप्त झाली. २१ जसें जसें संसारांतून निवृत्त व्हावें तसें तसें आत्मसुख मिळूं लागतें हेंच त्यांतील तत्त्व ब्राह्मणानें सांगितलें. २२.

ब्रा०-उ० परिग्रहो हि दुःखाय यद्यत्प्रियतमं नृणाम् । अनन्तं सुखमाप्नोति तद्विद्वान्यस्त्वकिंचनः ॥ १ ॥

ब्राह्मण म्हणे रायासी । परिग्रहो जयापाशीं । वाढतें दुःख तयासी । अहर्निशीं चढोवढी ॥ २३ ॥ कुटुंबपरिग्रहाचे आसक्ती । कपोता निमाला दुर्मती । आतां एकाकी परिग्रहो करिती । तेही पावती दुःखातें ॥ २४ ॥ गृहपरिग्रहें गृहस्था । पाषाणमृत्तिकेची ममता । काडीकारणें कलहो करितां । सुहृदता सांडिती ॥ २५ ॥ निःसंगा परिग्रहो लागला कैसा । शिष्यसंप्रदायें घाली फांसा । शास्त्रपुस्तकसंग्रहवशा । वाढवी आशा मठाची ॥ २६ ॥ त्या मठशिष्यांचें सांत्वन । करितां अत्यंत होय दीन । मग परिग्रहाचें उपशमन । अपरिग्रही जाण करिताती ॥२७॥ त्या मठाचिया आशा । शिष्यसंप्रदायवशा । कलहो लागे आपैसा । विरोधू संन्यासा परिग्रहें ॥ २८ ॥ परिग्रहो जिणोनि गाढा । लंगोटी त्यजूनि जाहला उघडा । नागवे माथां घेऊनि घडा । लाविल्या झाडा शिंपित ॥ २९ ॥ त्या वृक्षाचें कोणी पान तोडी । त्यांसीं आक्रोशें कलह मांडी । थोर परिग्रहाची सांकडी । दुःखें पीडी सर्वांतें ॥ ३० ॥ आवडीं केला जो जो परिग्रहो । तो तो उपजवी दुःखकलहो । हा होतांही अनुभवो । वैराग्य पहा हो उपजेना ॥ ३१ ॥ ऐशी परिग्रहाची कथा । देखोनि देखणा जो ज्ञाता । आसक्ती सांडोनि सर्वथा । अकिंचनपंथा लागला ॥ ३२ ॥ प्रपंच अनित्य नाशवंत । तेथील संग्रह काय शाश्वत । ऐसें विवंचूनि समस्त । अकिंचनचित्त ते जाहले ॥ ३३ ॥ परिग्रहामाजीं गाढा । देहपरिग्रहाचा खोडा । मिथ्यात्वें फोडी रोकडा । तो विवेकें गाढा ज्ञाता पैं ॥ ३४ ॥ जेथ देहपरिग्रह मिथ्या जाहला । तो अनंत सुखाच्या घरा आला ।

(नवव्या अध्यायांत कुररादिकांपासून व देहापासून अवधूतानें घेतलेला उपदेश ऐकून यदुराजा कृतार्थ झाला, असें श्रीकृष्णानें उद्धवाला सांगितलें)

—अवधूत आपण टिटवीपासून काय शिकलों तें सांगतो—

ब्राह्मणः उवाच, ब्राह्मण ह्मणाला, –नृणां यत् यत् प्रियतमं तस्य परिग्रहः हि दुःखाय –मनुष्यांना जें जें अत्यंत प्रिय आहे त्याचा संग्रह करणेंच दुःखाचें कारण आहे. तत् विद्वान् यः तु अकिंचनः सः अनंत सुखं आप्नोति–परिग्रह दुःखमूल आहे असें जाणून जो त्याचा त्याग करितो तो दरिद्री अनंतसुखाला प्राप्त होतो. १.

ब्राह्मण राजाला म्हणाला कीं, ज्याच्यापाशीं परिग्रह असतो त्याचें दुःख रात्रंदिवस चढाओढीनें वाढत असतें. २३ कुटुंबाच्या आसक्तीनें मूर्ख कपोत नाश पावला. आतां एकटे असूनहि जे परिग्रहाच्या मागें लागतात तेहि अखेर दुःखांत पडतात. २४ घराचा परिग्रह करितांच गृहस्थाची दगड-मातीवरहि ममता जडते आणि मग परस्परांचा स्नेह विसरून, काडीसाठींहि भांडत सुटतात. २५ विरक्ताचा परिवार कसा वाढतो, म्हणून म्हणशील तर त्याला शिष्यसंप्रदाय आसक्तींत अडकवितो. शास्त्रीय ग्रंथांच्या संग्रहाच्या नादीं लागून त्याला मठ करण्याची हांव सुटते, २६ मग त्या मठांतील शिष्यांचें समाधान करितां करितां तो बिचारा अगदीं दीन होतो. तेव्हां मग त्या परिवाराला त्रासून तो सर्वांचा त्याग करितो. २७ तो मठाच्या इच्छेनें शिष्यसमुदाय जमवितो. परंतु त्यांचा आपसांत कलह लागून संन्याशाला मात्र या परिवारामुळें विक्षेप होतो. २८ तेव्हां तो सर्व परिवार टाकून लंगोटीहि सोडून अगदीं दिगंबर होतो व डोकीवर घागर घेऊन आपण लावलेल्या झाडांना पाणी घालूं लागतो. २९ त्या झाडाचें पान जर कोणीं तोडिलें तर आक्रोश करून त्याच्याशीं भांडायला उठतो. परिवाराचा परिणाम फार वाईट आहे. तो सर्वांना दुःख देतो. ३० मोठया हौसेनें जो जो परिग्रह करावा तो तो दुःख व कलह उत्पन्न करितो. हा अनुभव घेत असूनहि मनुष्याच्या मनांत विरक्ति उत्पन्न होत नाहीं, पहा! ३१ परिग्रहाची ही स्थिति जाणून ज्ञानी लोक सर्वांवरील आसक्ति टाकून सर्वत्याग करितात. ३२ संसार जर अनित्य व नाशवंत आहे, तर त्यांतील संग्रह शाश्वत कसा असणार! असा विचार करून ते सर्वस्वाचा त्याग करितात. ३३ सर्व परिग्रहांत देहाच्या परिग्रहाची बेडी मोठी कठिण असते. जो तिला मिथ्या समजून विचारानें तोडून टाकितो, तोच खरा ज्ञाता होय. ३४ एकदां देहाचा परिग्रह मिथ्या झाला कीं तो मनुष्य अनंतसुखाच्या घरीं येतो. तेथें त्याच्या सुखाचा अंत कधींहि होत नाहीं. तो

त्या सुखासी अंत न वचे केला । त्या पावला निजसुखा ।। ३५ ।। परिग्रहो दुःखवंतू । हा कुररीगुरुत्वें वृत्तान्तू । तुज सांगेन साद्यंतू । उपहासें अवधूतू बोलिला ।। ३६ ।। तंव राजा मनीं चमत्कारला । म्हणे मी राज्यपरिग्रहें गुंतला । देहपरिग्रहें बंदीं पडला । पाहिजे केला हा त्यागू ।। ३७ ।। ऐसा राजास वैराग्यु । करूं पाहे सर्व त्यागु । श्रवणें जाला तो सभाग्यु । होय योग्यु निजज्ञाना ।। ३८ ।। करूनि गुरुत्वें जाणा । परिग्रहत्यागविवंचना । आणावया जी मना । सादर श्रवण करीतसे ।। ३९ ।।

सामिषं कुररं जघ्नुर्बलिनो ये निरामिषाः । तदामिषं परित्यज्य स सुखं समविन्दत ।। २ ।।

कुरर बोलिजे टिटवा । पावला आमिषकवळु बरवा । तेणें तेथेंचि भक्षावा । तो लोभस्वभावा ठेविला ।। ४० ।। तें आमिष देखोनियां फार । बळी जे निरामिष कुरर । ते धांविन्नले अतिसत्वर । लहान थोर मिळोनी ।। ४१ ।। हिरोनी घेऊं पाहती बळें । हें जाणोनियां तो पुढें पळे । पळतां देखोनि एक वेळे । त्वरें तत्काळें वेढिला ।। ४२ ।। त्या आमिषाचिया चाडा । थोर मांडला झगडा । मारूं लागले फडफडां । चहूंकडां निष्ठुर ।। ४३ ।। एक झडपिती पांखी । एक चपेटे हाणिती नखीं । एक विदारिती मुखीं । परम दुःखी होतसे ।। ४४ ।। आमिषकवळें गुंतलें मुख । मारितां देऊं न शके हाक । खस्ताविस्त करितां देख । बोलावया मुख त्या नाहीं ।। ४५ ।। हे माझे स्वजाती पहा हो । सांडोनियां सुहृदभावो । मज कां करूं आले अपावो । तो अभिप्रावो तो विवंची ।। ४६ ।। म्हणे माझिया दुःखासी मूळ । मजपाशील आमिषकवळ । तो त्यजोनियां तत्काळ । सुखी सुनिश्चळ बैसला ।। ४७ ।। जेथ आमिषकवळु पडे । तेथ कलहाचा गोंधळ मांडे । परस्परें फुटती मुंडें । ठेंचिती तोंडें येरयेरां ।। ४८ ।।

आत्मसुखांत मग्न होतो. ३५ परिग्रह कसा दुःखदायक आहे, हें मी तुला टिटवीच्या गोष्टीनें सविस्तर सांगतों, असें अवधूत विनोदानें बोलला. ३६ तेव्हां राजा मनांत दचकला. तो म्हणूं लागला कीं, मीहि राज्यपरिग्रहांत गुरफटून गेलों आहें व देहपरिग्रहाच्या कैदेंत पडलों आहें, तेव्हां मला त्यांचा आधीं त्याग केला पाहिजे. ३७ याप्रमाणें राजा वैराग्यानें युक्त होऊन सर्वस्वत्याग करण्यास तयार झाला. तो या कथाश्रवणानें इतका भाग्यवान् झाला कीं, तो सहज आत्मज्ञानाचा अधिकारी झाला. ३८ टिटवीला गुरु करून परिग्रहत्यागाचा विचार करण्यासाठीं तो चित्त देऊन ऐकूं लागला. ३९.

ये बलिनः निरामिषाः—जे बलवान् व मांसरहित असलेले पक्षी होते ते, सामिषं कुररं जघ्नुः—आमिषासहित असलेल्या टिटवीला मारूं लागले, तत् आमिषं परित्यज्यः सः सुखं समविन्दत—पण त्या आमिषाचा त्याग करून तो पक्षी सुखी झाला. २.

कुरर म्हणजे टिटवापक्षी. त्याला एक चांगलासा मांसाचा तुकडा सांपडला. तो लगेच खाऊन टाकावयाचें सोडून त्यानें लोभानें तो तसाच जवळ ठेविला. ४० तेव्हां तो मोठा मांसाचा तुकडा पाहून दुसरे लहान-मोठे टिटवे मोठ्या त्वरेने तेथें धांवत आले. ४१ ते आतां बलात्कारानें तो तुकडा हिरावून घेतील असें पाहून तो टिटवा त्या आमिषासह पुढें पळूं लागला. त्याला पळतांना पाहून सर्वांनीं त्वरेनें त्याला वेढून टाकिलें. ४२ त्या आमिषाच्या आशेनें त्यांचें कडाक्याचें भांडण जुंपलें. ते त्याच्यावर तुटून पडले व त्याला चोंहोंकडून फटाफट मारूं लागले. ४३ त्याला कोणी पंखांनीं झोडपूं लागले, कोणी नखांनीं ओरबाडूं लागले, कोणी चोचीनें टोचूं लागले, त्यामुळें त्याला अतिशय दुःख झालें. ४४ तोंडांत तो मांसाचा तुकडा असल्यामुळें इतरांनीं मारिलें तरी त्याला कोणाला हांक मारवेना किंवा आरडाओरड करण्यास तोंड उघडवेना. ४५ तो मनांत म्हणूं लागला कीं, हे माझे जातिबांधव स्नेहभाव सोडून मला कसे छळताहेत पहा! ४६ माझ्या जवळचा मांसाचा तुकडाच या सर्व दुःखाचें मूळ आहे, असा विचार करून त्यानें तोंडांतील तो तुकडा टाकून दिला व सुखानें स्वस्थ बसला. ४७ तेव्हां जेथें तुकडा पडला होता, तेथें भांडणाचा मोठाच गोंधळ उडाला. ते सगळे पक्षी मिळून एकमेकांना बोचून परस्परांची डोकीं फोडींत होते, ४८ पण तोंडां-

आमिष त्यजोनि बैसला देख । तो पाहे कलहाचें कौतुक । मूळ परिग्रहो तेथें दुःख । परम सुख त्यागितां ॥ ४९ ॥ माड्या गोपुरें धवळारा । धनधान्य नाना अंबरा । रत्नें प्रवाल धन पुत्रदारा । हा समुदायो खरा परिग्रहो ॥ ५० ॥ या समस्त परिग्रहाचें मूळ । देहबुद्धि गा केवळ । तेही अभिमानें सबळ । एवं सर्वांसी मूळ अभिमानू ॥ ५१ ॥ तो अभिमानू जै सांडे । तैं प्रपंचाचें मूळ खंडे । मूळ छेदिल्या जेवीं उलंडे । अतिप्रचंडे तरुवर ॥ ५२ ॥ अभिमानदेहबुद्धिजीवन । देहबुद्धि संगास्तव गहन । उभयसंगु तो आयतन । निवासस्थान परिग्रहो ॥ ५३ ॥ एवं अन्योन्य सापेक्षक । येरयेरां आवश्यक । याचे त्यागीं परम सुख । अतिदुःख तो परिग्रहो ॥ ५४ ॥ परिग्रहत्यागाचें मूळ जाण । आधीं त्यजावा अभिमान । तेणेंवीण त्यागु तो विटंबन । केल्या जाण होईल ॥ ५५ ॥ अभिमानसहित सकळ सांडे । तैं पडती सुखाचे पायमांडे । तें सुख न बोलवे तोंडें । शब्द मुरडे लाजोनी ॥ ५६ ॥ अभिमान जाऊन वर्तण । कैसें राया म्हणसी जाण । तें अर्भकगुरुत्वलक्षण । तुज संपूर्ण सांगेन ॥ ५७ ॥

न मे मानावमानौ स्तो न चिन्ता गेहपुत्रिणाम्। आत्मक्रीड आत्मरतिर्विचरामीह बालवत् ॥ ३ ॥

बाल तुझें माझें न म्हणे । उंच नीच कांहीं नेणे । यालागीं मानापमान तेणें । सुखें साहणें सर्वथा ॥ ५८ ॥ तिमासांचेनि बाळकें । मानू कोण हें नोळखे । अपमानू तोही न देखे । आपुलेनि सुखें क्रीडत ॥ ५९ ॥ दुजेपणातें नातळे । बालक आपुलियाचि लीळें । आपआपणियाशींच खेळे । आपुलेनि मेळें आपण ॥ ६० ॥ देहगेहांची चिंता । बाळासि नातळे सर्वथा । स्वभावेंचि निश्चिंतता । चिंताकथा त्या नाहीं ॥ ६१ ॥

तील तुकडा टाकून स्वस्थ बसलेला टिटवा त्यांच्या भांडणाची मौज पहात होता. तेव्हां संग्रह केला असतां दुःख होतें व त्यागानें सुख होतें. ४९ माड्या, मनोरे, चुनेगच्च्या, धन, धान्य, नानाप्रकारचीं वस्त्रें, रत्नें, पोंवळीं, द्रव्य, स्त्रीपुत्र यांचा समुदाय हा खरा परिग्रह आहे. ५० पण या सर्व परिग्रहाचें मूळ केवल देहबुद्धि, म्हणजे 'देहच मी' असा निश्चय. अभिमानानें ती भावना जास्त दृढ होते. सारांश अभिमान सर्वांचें मूळ आहे. ५१ तो अभिमान जेव्हां टाकावा तेव्हां संसाराचें मूळ तुटतें आणि मूळ तोडिलें म्हणजे प्रचंड वृक्षहि जसा उलथून पडतो त्याप्रमाणें संसाराचा उच्छेद होतो. ५२ अभिमान हें देहबुद्धीचें जीवन आहे. आसक्तीमुळें देहबुद्धि वाढते. अभिमान व देहबुद्धि हें गृहाच्या परिग्रहाचें मूळ आहे. ५३ याप्रमाणें एकमेकांच्या अपेक्षेनें एकमेकांना तीं आवश्यक झालीं आहेत. त्यांचा त्याग केल्यानेंच परम सुख होतें व त्यांचा परिग्रह हेंच मोठें दुःख आहे. ५४ परिग्रहत्यागाचें मूळ अभिमान आहे. तो प्रथम टाकिला पाहिजे. त्यावांचून त्याग करावयाचा म्हणजे नुस्ती विटंबना आहे. ५५ जेव्हां अभिमानासह सर्व सोडावें, तेव्हां सुखाच्या पायघड्या प्राप्त होतात. त्या सुखाचें वर्णन करावयास शब्दहि लाजतात. ५६ हे राजा! अभिमान सोडून कसें वागावें असें जर म्हणशील तर बालकाला गुरु करून त्याच्यापासून मी काय शिकलों, त्याचें लक्षण तुला पूर्णपणें सांगतों, ऐक. ५७

——बालकापासून आपण काय शिकलों, तें अवधूत सांगतो——

मे मानावमानौ न स्तः—मला मान व अपमान वाटत नाहीं, **गेहपुत्रिणां चिन्ता न**—गृहस्थ व पुत्रवान् यांना जी सतत चिंता असते तीहि मला नाहीं, बालवत् इह आत्मक्रीडः आत्मरतिः विचरामि —तर मी मान, अपमान व चिंता यांनीं रहित असलेल्या बालकाप्रमाणें आत्म्याशींच ज्याची क्रीडा आहे व आत्म्यामध्येंच ज्याची प्रीति आहे असा होऊन या या जगांत संचार करितों. ३.

लहान बालक 'हें माझें, हें तुझें' असें कधीं म्हणत नाहीं. उच्च-नीच हा भेद त्याला नसतो. त्यामुळें तें सर्व मान-अपमान मोठ्या आनंदानें नेहमीं सहन करितें. ५८ तीन महिन्यांच्या लेंकराला मान म्हणजे काय हें ठाऊक नसते किंवा अपमानहि त्यानें कधीं पाहिलेला नसतो. तें आपल्याच आनंदांत खेळत असतें. ५९ दुजाभाव त्याला कधीं स्पर्शहि करीत नाहीं. तें आपल्याच नादांत स्वतःशींच खेळत असतें. ६० त्याला देहाची, घराची कधीं काळजी नसते. तें स्वभावतःच निश्चित असतें. त्याला चिंतेचें नांवहि ठाऊक नसतें. ६१ दुजाभाव त्यानें पाहिलेलाच नसल्या-

न देखतां दुजी स्थिती । बाळका आपुली आपणिया अतिरती प्रीती । आपुलि आपणणिया अतिरती । तैशी गती योगिया ॥ ६२ ॥ योगियासी प्रपंचाचें भान । सत्यत्वें नाहीं जाण । यालागीं मानापमान । दोन्ही समान तयासी ॥ ६३ ॥ चित्रींचेनि सापें खादला । तो चित्रींचेनि अमृतें वांचला । तेवीं जिण्या मरण्या मुकला । निश्चळ ठेला निर्द्वंद्वे ॥ ६४ गृहदारापुत्रचिंता । हे समूळ मिथ्या वार्ता । स्वदेहो सत्यत्वें असता । तरी करूं लाहता चिंतेतें ॥ ६५ ॥ भवमूळ कल्पना जाण । ते कल्पना मनाआधीन । तें मन स्वरूपीं जाहलिया लीन । तेव्हां वस्तुचि होणें सर्वत्र ॥ ६६ ॥ तेणें स्वरूपानुसंधानें । सुखें क्रीडतू चिद्धनें । क्रीडा दैवयोगें करणें । देहाभिमानें विरहित ॥ ६७ ॥ पावोनि निजसुखप्राप्ती । मनआदि इंद्रियें उपरमती । अणुभरी स्फुरेना वृत्ती । 'समाधि' बोलती या नांव ॥ ६८ ॥ तेंचि स्वरूपीं ठेवूनि मन । बाह्यस्फूर्तीचें स्फुरे भान । ते दशा गा 'व्युत्थान' । साधुजन बोलती ॥ ६९ ॥ उंबऱ्यावरी ठेविला दिवा । तो जेवीं देखी दोहीं सवा । तैसी व्युत्थानदशा जीवभावा । उभय स्वभावा देखणी ॥ ७० ॥ लवणजळा समरसता । तेवीं स्वरूपीं विरवूनि चित्ता । समाधिव्युत्थाना हाणी लाथा । निजीं निजस्वरूपता पावोनि ॥ ७१ ॥ त्यासी कोणाचा मानापमान । गृहपुत्रचिंता करी कोण । स्वरूपीं हारपलें मन । निजसमाधान पावला ॥ ७२ ॥ मनेवीण जें विहरण । तें बालकाच्या ऐसें जाण । दैवयोगें चलनवलन । वृत्तिशून्य वर्तत ॥ ७३ ॥

द्वावेव चिन्तया मुक्तौ परमानन्द आप्लुतौ । यो विमुग्धो जडो बालो यो गुणेभ्यः परं गतः ॥ ४ ॥

मुळें तें स्वतःवरच प्रेम करितें व स्वतःमध्येंच दंग असतें. तशीच योग्याची स्थिति असते. ६२ योग्याला संसार सत्य आहे असें भान नसतें, म्हणून त्याला मान व अपमान सारखेच वाटतात. ६३ एखाद्याला चित्रांतील साप चावावा व चित्रांतील अमृतानेंच तो वांचावा, त्याप्रमाणें योगी जन्म-मृत्युरहित होऊन या द्वंद्वापासून मुक्त असतो व निश्चल राहतो. ६४ घर-दार, स्त्री-पुत्र या सर्वांची चिंता वहाणें सर्वथा मिथ्या आहे, कारण आपला देह जर सत्य असेल तर चिंता करणें योग्य होईल. ६५ संसाराचें मूळ कल्पना आहे. ती मनाच्या अधीन असते. पण तें मनच आत्मस्वरूपांत लीन झालें म्हणजे योगी सर्वत्र आत्मा होतो. ६६ त्या स्वरूपानुसंधानानें तो चैतन्यरूपांत सुखानें क्रीडा करितो. देहाभिमान टाकून दैवयोगानें जसा प्रसंग येईल त्यास अनुसरून तो वागत असतो. ६७ अशा आत्मसुखाची प्राप्ति झाली म्हणजे मनासह सर्व इंद्रियें शांत होतात, वृत्ति अणुमात्रहि स्फुरत नाहीं. या स्थितीलाच 'समाधि' हें नांव आहे. ६८ त्याच आत्मस्वरूपांत मन ठेवून बाह्यस्फूर्तीचें भान असलें म्हणजे त्याला साधु 'व्युत्थान' असें बोलतात. ६९ देहलीदीपन्यायानें म्ह० उंबरठ्यावर दिवा ठेविला असतां त्याचा प्रकाश जसा आंत-बाहेर दोहोंकडे पडतो तशी ही 'व्युत्थान' स्थिति जीव व आत्मा या दोहोंना पहाणारी आहे. ७० मीठ पाण्यांत विरघळून जसें त्याच्याशीं एकजीव होतें, त्याप्रमाणें मनाला आत्मस्वरूपांत समरस करून, स्वरूपांत तादात्म्य पावून योगी समाधि व व्युत्थान या दोन्ही अवस्थांना तुच्छ मानितो. ७१ मग त्याला मान-अपमान कोठचा व घर, स्त्री, पुत्र इत्यादिकांची चिंता कोठची ! आत्मस्वरूपांत मनाचा लय झाल्यामुळें तो आत्मसुखाला प्राप्त होतो. ७२ मनावांचून ज्या चेष्टा त्या बालकासारख्याच होत. दैवयोगानें होणारें चलन-वलन शून्यवृत्तीनें होत असतें. ७३

—'अहोपण, अज्ञ व सर्वज्ञ यांच्यामध्यें सादृश्य कोणतें आहे !' असें राजा विचारील म्हणून अवधूत चिंताराहित्य हेंच परमसुख आहे असें सांगतो—

यः विमुग्धः जडः बालः—जो अज्ञ व उद्यमशून्य असा बालक, यः च गुणेभ्यः परं गतः—व जो प्रकृतीहून अगदीं विलक्षण, सूक्ष्म व व्यापक असलेल्या ईश्वराला प्राप्त झालेला योगी, तौ द्वौ एव चिंतया मुक्तौ—ते दोघेच चिंतेपासून मुक्त असतात व चिंताशून्य असल्यामुळें, परमानंदे आप्लुतौ—परमानंदांत निमग्न झालेले असतात. ४,

थोर चिंतेचा आवर्त । जेथ ब्रह्मादिक बुडत । ते आवर्ती दोघे मुक्त । परीस निश्चित यदुवरी ।। ७४ ।। दोघां नाहीं द्वैतभान । दोघे नेणती मानापमान । दोघे सुखें सुखसंपन्न । दोघे मनेंवीण वर्तती ।। ७५ ।। एकासी पुढें भेटलें दुखः । दुजेनि जिंतिलें सुखदुःख । एकासी मुग्धतेचें सुख । दुज्या देख निजज्ञान ।। ७६ ।। पाहतां बाळकाचे ठायीं । गुप्तवासना असे देहीं । ते अंकुरेजोनि पाहीं । अवश्य अपायीं घालील ।। ७७ ।। तैसा नव्हे योगिया गुणातीत । जो पूर्णानंदें पूर्ण भरित । त्यासी सुखदुःखाची मात । नाहीं जगांत सर्वथा ।। ७८ ।। देहीं दिसे जीव वर्तत । तो केवीं जाला गुणातीत । ऐसें म्हणसी तो वृत्तांत । ऐक साद्यंत सांगेन ।। ७९ ।। साधकें सेवूनि साधुजन । वाढविला सत्वगुण । वाढलेनि सत्वें जाण । ज्ञानसाधन साधिलें ।। ८० ।। साधिलेनि ज्ञानसाधनें । छेदी रजतमांची विंदानें । जें मोहममतेचीं दारुणें । उभय भोगजन्यें कर्मठां ।। ८१ ।। एवं वाढलेनि सत्वोत्तमें । निर्दळलीं रजतमें । सत्व एकलेपणें निमे । स्वयें उपशमे तें जाणा ।। ८२ ।। जंव जंव काष्ठसंभार असे । तंव तंव अग्नि जाळी उल्हास । सरलेनि काष्ठलेशें । अग्नि प्रवेशे निजतेजीं ।। ८३ ।। ऐसी जाणोनि गुणावस्था । योगी पावला गुणातीतता । त्यासी न बाधी भवव्यथा । प्रलयकल्पांता जालिया ।। ८४ ।। ज्या सुखासी नाहीं अंत । तें सुख स्वरूपें जालें प्राप्त । देहीं वर्तता देहातीत । चितांआवर्त त्यां नाहीं ।। ८५ ।। एकाकी जाहल्यावीण तत्त्वतां । ते अवस्था न चढे हाता । येचिविशीं नृपनाथा । कुमारीगुरुकथा सांगेन ।। ८६ ।।

क्वचित्कुमारी त्वात्मानं वृणानान्गृहमागतान् । स्वयं तानर्हयामास क्वापि यातेषु बन्धुषु ।। ५ ।।

चिंतेचा भोंवरा मोठा भयंकर आहे. त्यांत ब्रह्मदेवादिकासारखेहि बुडून जातात. पण त्या भोंवऱ्यांतून बालक व योगी हे दोघेच काय ते वांचतात. हे यदुराजा ! ऐक. ७४ त्या दोघांनाहि द्वैताचें भान नसतें, दोघेहि मान-अपमान जाणत नाहींत. दोघेहि पूर्णसुखानें संपन्न असतात. कारण दोघेहि मनावांचूनच व्यापार करितात. ७५ त्यांपैकीं एकाला पुढें दुःखाची भेट होते व दुसऱ्यानें मात्र सुख व दुःख या दोहोंनाहि जिंकिलेलें असतें. एकाला अज्ञतेचें सुख असतें व दुसऱ्याला आत्मज्ञानाचें सुख असतें. ७६ पाहूं गेल्यास बालकाच्या मनांत गुप्तवासनांचें बीज असतें. त्याला पुढें अंकुर फुटून तें अनार्थांत टाकितें. ७७ तसा गुणातीत योगी नसतो. त्याचें वासनारूपी बीज जळून गेलेलें असतें. त्यामुळें तो पूर्ण आनंदानें तुडुंब भरलेला असतो. त्याला जगांतील सुख-दुःखाची वार्ताच नसते. ७८ शरीरांत जीव असलेला दिसत असतां तो गुणातीत कसा होतो, असें म्हणशील तर तो सर्व वृत्तांत सविस्तर सांगतों, ऐक ! ७९ मुमुक्षु सत्पुरुषांची सेवा करून आपला सत्त्वगुण वाढवितो व सत्त्वगुण वाढला म्हणजे ज्ञानाचें साधन त्याच्या हातीं येतें. ८० ज्ञानसाधन प्राप्त झालें म्हणजे तो कर्मठाच्या ठिकाणीं ऐहिक व पारलौकिक विषयांविषयींची रजोगुण व तमोगुण यांपासून झालेली मोह-ममतेचीं कार्यें तोडितो. ८१ याप्रमाणें उत्तम सत्त्वगुणाची वृद्धि झाली म्हणजे रजोगुण व तमोगुण नाश पावतात व फक्त सत्त्वगुण तेवढा उरतो, पण पुढें तोहि आपोआपच शांत होतो. ८२ अग्नीमध्यें लांकडाच्या मोळ्या जशा जशा टाकाव्या तसा तसा तो अग्नि अधिकाधिक प्रदीप्त होऊन त्यांना जाळितो. परंतु लांकडाचा लेशहि नाहींसा झाला कीं अग्नि आपोआपच आपल्या तेजांत लीन होतो. ८३ त्याचप्रमाणें योगी सत्त्व, रज व तम या तिन्ही गुणांना जिंकून गुणातीत होतो व मग प्रलयकाल किंवा कल्पांत जरी ओढवला तरी त्याला संसारव्यथा कधीं बाधत नाहीं. ७४ ज्या सुखाला अंत नाहीं तें आत्मसुख त्याला प्राप्त होतें व तो जरी देहधारी असला तरी देहातीत असल्यासारखाच वागतो. त्याला चिंतारूपी भोंवरा पीडा देत नाहीं. ८५ एकाकी झाल्यावांचून खरोखर ही स्थिति प्राप्त होत नाहीं याविषयीं हे नृपश्रेष्ठा ! कुमारीला गुरु केल्याची कथा मी तुला सांगतों. ८६.

—कुमारीपासून आपण कोणता उपदेश घेतला तें सांगण्यासाठीं अवधूत आख्यायिका सांगतो—

क्वचित्–कोणा एका गांवांत, कुमारी तु–एक कुमारी, बन्धुषु क्व अपि यातेषु–तिचे माता, पिता वगैरे आप्त कोठें शेतांत गेलें असतां, आत्मानं वृणनान् गृहं आगतान् स्वयं अर्हयामास–आपल्याला वरण्यासाठीं घरीं आलेल्या त्या पाहुण्यांचा स्वतःच सत्कार करिती झाली.

कोणी एके कुमारीसी । घरीं राखण ठेवूनि तिसी । पिता माता स्वगोत्रेंसीं । गेली यात्रेसी कुळदेवा ॥ ८७ ॥ ते कुमारीचें विवाहलग्न । पूर्वीं नेमिलें होतें जाण । त्या निश्चयालागी ब्राह्मण । घरा संपन्न पैं आले ॥ ८८ ॥ पुसती घरीं आहे कोण । लाजें नोवरी धरी मौन । त्यांसी न देतां दर्शन । पूजाविधान ते मांडी ॥ ८९ ॥ वातायनद्वारा आसनें । दिधलीं समस्तांकारणें । गंधाक्षता सुमनें पानें । दिधलें मौनें उपचार ॥ ९० ॥ देखोनि पूजेचें विधान । जाणों सरले ते ब्राह्मण । घरीं नोवरीचि आहे जाण । हें चतुरलक्षण तियेचें ॥ ९१ ॥ त्यांच्या पाहुणेराची चिंता । उशिरां येईल माझी माता । ते काळीं साळी सडितां । विलंबु सर्वथा होईल ॥ ९२ ॥

तेषामभ्यवहारार्थं शालीन् रहसि पार्थिव । अवघ्नन्त्याः प्रकोष्ठस्थाश्चक्रुः शङ्खाः स्वनं महत् ॥ ६ ॥

ऐसें विचारूनि जाण । साळी कांडूं रिघे आपण । ते कंडणकाळींचें विंदान । चतुरलक्षण परियेसीं ॥ ९३ ॥ घावो घालितां कांडणा । उठी झणत्कार करकंकणा । तेणें नादें लाजोनि जाणा । विचारू मनामाजीं करीं ॥ ९४ ॥

सा तज्जुगुप्सितं मत्वा महती व्रीडिता ततः । बभञ्जैकैकशः शङ्खान् द्वौ द्वौ पाण्योरशेषयत् ॥ ७ ॥

या शंखवलयांचा ध्वनी । पडेल पाहुण्याचे कानीं । अत्यंत लाज मजलागूनी । नववधू कांडणीं बैसली ॥ ९५ ॥ त्यांच्या कानीं ध्वनि न पडे । कांडण तरी चाले पुढें । ऐसें विचारोनि रोकडें । कंकणाकडे पाहिलें ॥ ९६ ॥ पाहतां दिसे ते अबला । विचार वृद्धाहूनि आगळा । करींचा कंकणखळाळा । युक्तीं वेल्हाळा विभागी ॥ ९७ ॥ जरी कंकण फोडूं आतां । तरी ते मुहूर्तींच अशुभता ।

एक कुमारिका होती. तिच्या आईबापांनीं तिला घरीं राखण ठेविली व तीं आपल्या आप्तांसह कुलदैवताच्या यात्रेला गेलीं. ८७ त्या कुमारीच्या विवाहाचें पूर्वींच ठरलेलें होतें. त्याचा निश्चय करण्यासाठीं कांहीं विद्वान् ब्राह्मण तेथें आले. ८८ त्यांनीं बाहेरूनच 'घरांत कोणी आहे का ' असें विचारिलें. तेव्हां त्या नवरीमुलीनें मौन धरून त्यांच्या दृष्टीस न पडतां पूजेची सर्व तयारी केली. ८९ खिडकींतून त्या सर्वांना बसावयास आसनें दिलीं. गंध, अक्षता, फुलें, पानें हें सर्व साहित्य मुकाट्यानें त्यांच्यापुढें ठेविलें. ९० पूजेची ही तयारी पाहून त्या ब्राह्मणांनीं ताडिलें कीं, घरांत एकटी नवरीमुलगीच आहे व हें सर्व तिचेंच चातुर्य असावें. ९१ तिला त्यांच्या पाहुणचाराची काळजी पडली. आईला येण्यास अजून अवकाश आहे. ती आल्यानंतर भात कांडावयाचें म्हणजे व्यर्थ उशीर होणार. ९२.

हे पार्थिव–हे राजा ! तेषां अभ्यवहारार्थं–त्यांच्या भोजनासाठीं, रहसि शालीन् अवघ्नंत्याः–एकान्तांत भात कांडणाऱ्या तिच्या, प्रकोष्ठस्थाः शङ्खाः महत् स्वनं चक्रुः–मनगटांतील शंखाचीं कांकणें मोठा आवाज करूं लागलीं. ६.

असा विचार करून ती भात कांडूं लागली. पण तिच्या हातांतील कंकणांचा आवाज होऊं लागला. तेव्हां तिनें जें चातुर्य दाखविलें, तें ऐक. ९३ कांडतेवेळीं हातांतील बांगड्यांचा होत असलेला झंकार ऐकून तिला लाज वाटली व ती मनांत विचार करूं लागली. ९४.

सा महती तत् जुगुप्सितं मत्वा व्रीडिता–ती शहाणी कुमारी आपण स्वतःच भात कांडीत बसणें निंद्य आहे, त्यावरून आपलें दारिद्र्य व्यक्त होतें, असें मानून लज्जित झाली. ततः शङ्खान् एकैकशः बभञ्ज–त्यामुळें तिनें आपल्या हातांतील एकेक बांगडी उतरली. पाण्योः द्वौ द्वौ अशेषयत्–व प्रत्येक हातांत दोन दोन बांगड्या राखून ठेविल्या. ७.

या बांगड्यांचा आवाज जर पाहुण्यांच्या कानीं पडला तर ते म्हणतील कीं, ही नववधू तांदुळ सडावयास बसली आहे, मग मला मोठी लाज वाटेल. ९५ म्हणून बांगड्यांचा आवाज त्यांच्या कानीं जाणार नाहीं अशाप्रकारें मला भात कांडिलें पाहिजे, असा विचार करून तिनें आपल्या हातांतील बांगड्यांकडे पाहिलें. ९६ ती जरी दिसावयास एक अल्पवयी अबला होती तरी तिची बुद्धि मोठ्या अनुभवी वृद्ध पुरुषाहूनहि अधिक होती. त्या हुषार मुलीनें बांगड्यांचा तो नाद मोठ्या युक्तीनें बंद केला. ९७ 'मीं जर आतां बांगड्या पिचविल्या तर या शुभ

शतायु हो माझा भर्ता । न फोडी सर्वथा हा हेतू ॥ ९८ ॥ अति बुद्धिमंत ते कुमारी । हळूचि कंकणें उतरी । ते ठेवी जतनेवरी । राखे दों करीं दोनी दोनी ॥ ९९ ॥ दोनी कंकणें उरवूनी । कांडूं बैसली कांडणीं । दोहींमाजीं उठे ध्वनी । ऐकोनि कानीं लाजिली ॥ १०० ॥

उभयोरप्यभूद्घोषो ह्यवघ्नत्याः स्म शङ्खयोः । तत्राप्येकं निरभिदद्देकस्मान्नाभवद्ध्वनिः ॥ ८ ॥

म्हणे दोघांचा संगु एके स्थानीं । तेथें सर्वथा न राहे ध्वनी । दोंतील एक वेगळें काढोनी । बैसे कांडणीं कुमारी ॥ १ ॥ एकपणीं कांडितां । ध्वनि नुठेचि तत्त्वतां । तो उपदेशू नृपनाथा । जालों शिकता मी तेथ ॥ २ ॥

अन्वशिक्षमिमं तस्या उपदेशमरिन्दम । लोकाननुचरन्नेताँल्लोकतत्त्वविवित्सया ॥ ९ ॥

जिणोनि प्रतिस्पर्धी भूपाळ । किंकर केले राजे सकळ । तूं अरिमर्दन सबळ । मिथ्या केवळ तो गर्व ॥ ३ ॥ कामक्रोधादि अरिवर्ग । न जिणतां सकळ सांग । अरिमर्दन हा बोल व्यंग । होईल चांग ये अर्थीं ॥ ४ ॥ कामादिक सहा वैरी । येणें उपदेशशस्त्रधारीं । जिणोनि घालितां तोडरीं । मग संसारीं अरि नाहीं ॥ ५ ॥ लोकांवेगळा तूं अवधूतू । म्हणसी कुमारी ते घराआंतू । तो एकांतींचा वृत्तान्तू । कैसेनि प्राप्तु तुज जाला ॥ ६ ॥ राहोनियां विजनस्थानीं । विश्वासोनि गुरुवचनीं । दृढ बैसोनि आसनीं । निजतत्त्व ध्यानीं आकळिलें ॥ ७ ॥ त्याचि तत्त्वनिश्चयालागुनी । मी विचरतसें ये मेदिनीं ।

मुहूर्तावर अशुभ केल्यासारखें होईल. माझा पति शतायु व्हावा म्हणून मी सर्वथा या बांगड्या पिचविणार नाहीं ' ९८ असा विचार करून त्या बुद्धिमती मुलीनें हातांतील बांगड्या हळूच उतरल्या व त्या जपून ठेवून प्रत्येक हातांत फक्त दोन-दोनच बांगड्या राहूं दिल्या. ९९ याप्रमाणें दोन बांगड्या घालून ती पुनः कांडूं लागली. तरीहि त्या दोन बांगड्यांचा नाद निघूं लागला. तेव्हां तो ध्वनि ऐकून ती फार लाजली. १००.

अवघ्नत्याः उभयोः शङ्खयोः अपि घोषः अभूत् हि—पण ती पुनः कांडूं लागली असतां त्या दोन्ही कंकणांचा आवाज होऊं लागला. तत्र अपि एकं निरभिदत्—म्हणून त्या दोहोंतील एकेक कंकण तिनें काढून ठेविलें. तेव्हां, **एकस्मात् ध्वनिः न अभवत्**—हातांतील त्या एका कंकणाचा आवाज झाला नाहीं. ८.

ती मनांत म्हणूं लागली कीं, दोन वस्तु एकत्र जमल्या कीं तेथें आवाज व्हावयाचाच. तेव्हां तिनें त्या दोहोंपैकीं एकेकच बांगडी राखून कांडावयास सुरवात केली. १ तेव्हां एका बांगडीचा आवाज होईनासा झाला. हे राजा ! हा उपदेश मी तिच्यापासून शिकलों. १०२.

हे अरिन्दम—शत्रुनाशक राजा ! अहं तस्याः इमं उपदेशं अन्वशिक्षम्—मी तिच्यापासून हा उपदेश शिकलों. (पण त्या कुमारीची व तुझी गांठ कशी पडली ? उत्तर—) लोकतत्त्वविवित्सया एतान् लोकान् अनुचरन्—लोकांतील तत्त्व जाणण्याच्या इच्छेनें या लोकांत संचार करीत असतांना मी तिच्यापासून हें शिकलों ९.

तूं सर्व प्रतिस्पर्धी राजांना जिंकून त्यांना आपले दास करून स्वतःला मोठा बलाढ्य व अजिंक्य समजत असशील तर तुझा गर्व मिथ्या आहे. ३ कारण काम-क्रोधादिक शत्रूंचा वर्ग पूर्णपणें जिंकल्यावांचून स्वतःला शत्रूला जिंकणारा समजणें योग्य नव्हे. कारण त्या अर्थीं अरिमर्दन हा शब्द सर्वथा सदोष होईल. ४ काम-क्रोधादिक षड्रिपूंना उपदेशरूपीशस्त्राच्या धारेनें जिंकून त्यांना आपल्या पायांचे दास केलें असतां मग संसारांत खरा शत्रु नाहीं. ५ ' तूं अवधूत लौकिकापासून दूर रहाणारा, ती कुमारिका तिच्या घरांत बसलेली. असें असतां हा एकान्तांतला वृत्तान्त तुला कसा कळला ? ' ६ असें जर म्हणशील तर ऐक. मीं निर्जन वनांत गुरुवचनावर श्रद्धा ठेवून दृढ आसन घालून ध्यानानें आत्मतत्त्व जाणिलें. ७ त्या आत्मतत्त्वाच्या बलानें मी या पृथ्वीवर संचार करीत आहें. आत्मभाव दृढ करूनच मी जनांत किंवा वनांत पहात असतों. ८ मी जेव्हां आत्मरूपानें पाहूं लागलों तेव्हां दृश्य

निजात्मभावो जनीं वनीं । दृढ करोनि पाहतसें ॥ ८ ॥ होतां दृश्येंसीं भेटी । दृश्य दृश्यत्वें न पडे मिठी । द्रष्टेपणही घालोनि पोटीं । ऐशिया दृष्टीं विचरत ॥ ९ ॥ अंगीकारितां गुरुत्वगुण । देखतां जगाचें दर्शन । मज होतसे चैतन्यभान । ऐसें जाण मी विचरत ॥ ११० ॥ ऐशिया निजदृष्टीं विचरा । मज विचरतां चराचरा । अवचटें कुमारीमंदिरा । त्याचि अवसरा मी आलों ॥ ११ ॥ करितां कंकणविवंचना । निजस्वार्थाचिया खुणा । पाहोनि घेतलें ज्या लक्षणा । ते विचक्षणा परियेसीं ॥ १२ ॥

वासे बहूनां कलहो भवेद्वार्ता द्वयोरपि । एक एव चरेत्तस्मात्कुमार्या इव कङ्कणः ॥ १० ॥

जेथ होय बहुतांची वस्ती । तेथ अनिवार कलहप्राप्ती । दोघे बैसल्या एकांतीं । वार्ता करिती बहुविधा ॥ १३ ॥ जेथें गोष्टीखालीं काळ जाये । तेथें निजस्वार्थू हो न लाहे । यालागीं मी पाहें । विचरत आहें एकाकी ॥ १४ ॥ एकाकी एकाग्रता । साधिल्या थोर लाभू ये हाता । येचविषयीं शरकर्ता । गुरु तत्त्वता म्यां केला ॥ १५ ॥

मन एकत्र संयुज्याज्जितश्वासो जितासनः । वैराग्याभ्यासयोगेन ध्रियमाणमतन्द्रितः ॥ ११ ॥

वस्तु जरी मी दिसत होती तरी हें दृश्य मज पहाणाऱ्याहून भिन्न आहे, मी द्रष्टा आहें, असें मला वाटेना. द्रष्टा व दृश्य ही भावना नाहींशी होऊन मी फिरत होतों. ९ अशा ब्रह्मस्थितीचा स्वीकार केला असतां सृष्टीचें दर्शन होतांच मला चैतन्यभाव स्फुरूं लागला. ११० अशाप्रकारें मी आत्मदृष्टीनें सृष्टिनिरीक्षण करीत असतां अकस्मात् त्या कुमारिकेच्या घरीं त्याचवेळेस जाऊन पोंचलों. ११ हे चतुरराजा ! त्या कुमारिकेनें कंकणाचा नाद बंद करून ज्या-प्रमाणें आपला हेतु साधिला, त्याप्रमाणें आपलें हित साधण्यासाठीं काय केलें पाहिजे हा बोध मी तिच्यापासून घेतला, तो ऐक. ११२.

बहूनां वासे कलहः भवेत्–तीन किंवा त्यांहून अधिक लोकांचा एकत्र वास झाला असतां कलह होतो. द्वयोः अपि वार्ता भवेत्–दोघे जरी एकत्र राहिले तरी त्यांच्या गोष्टी सुरू होतात. तस्मात् कुमार्याः कङ्कणः इव एक एव चरेत्–म्हणून कुमारीच्या कंकणाप्रमाणें योग्यानें एकाकीच संचार करावा. १०.

जेथें पुष्कळ लोक रहातात तेथें अनिवार भांडणें होतात. दोन माणसें जरी एका जागीं बसलीं तरीहि त्यांच्या अनेकप्रकारच्या गोष्टी चालतात. १३ आणि जेथें गोष्टींतच वेळ जातो तेथें आपला स्वार्थ कांहींच साधत नाहीं. यास्तव मी पहा कसा एकटा फिरत असतों. १४ एकाकी राहून एकाग्रता साधली तर फार मोठा लाभ होतो, याविषयीं मीं बाण तयार करणाऱ्या एका व्याधाला गुरु केलें. ३१५.

—'चित्ताची एकाग्रता द्वैताच्या अभावरूप समाधीचें निमित्त आहे. हें मी बाण तयार करणाऱ्या लोहारापासून शिकलों,' असें अवधूत सांगतो—

अतन्द्रितः मनः एकत्र संयुज्यात्–आळस सोडून योग्यानें मनाला एकाच विषयांत संयुक्त करावें. (मनाला समाहित करण्याचा उपाय सांगतात–) जितासनः जितश्वासः–ज्यानें आसनाचें स्थैर्य संपादन केलें आहे व श्वासाचाहि निरोध केला आहे त्याचें मन निश्चल होतें. (कारण आसनाचें स्थैर्य संपादन केलें असतां श्वासाचा जय सुकर होतो व श्वासाच्या अधीन असलेल्या मनाचेंहि चांचल्य श्वासाच्या जयानें निवृत्त होतें. अहोपण, एक क्षणभर निश्चल झालेलेंहि मन विषयवासनेनें जर पुनः विक्षिप्त झालें किंवा झोपेंत जसें लीन होतें तसें सर्वथा लीन झालें तर काय करावें ? उत्तर–) वैराग्या-भ्यासयोगेन ध्रियमाणं–वैराग्य व अभ्यास यांच्या योगानें ध्येय वस्तूमध्यें स्थिर केलें जाणारें मन विक्षेप व चांचल्य सोडून एकाच लक्ष्यामध्यें संयुक्त होतें. ११.

वैराग्येंवीण अभ्यासु घडे । तेथ विषयचोर उठती गाढे । कामाचा घाला पडे । मुद्दल बुडे निजज्ञान ॥ १६ ॥ विवेकदीप करूनि धुरे । निरसीं अज्ञानाचें अंधारें । वैराग्याचें बळ पुरें । महामुद्रेचेनि योगें ॥ १७ ॥ प्राणापानांची चुकामुकी । जाली होती बहुकाळ कीं । ते अभ्यासबळें एकाएकीं । केली वोळखी दोघांसी ॥ १८ ॥ वोळखीसवेंचि जाण । पावली जुनाट पहिली खूण । दोघां पडिलें आलिंगन । समाधान समसाम्यें ॥ १९ ॥ दृढ बैसोनि आसनीं । ऐशी प्राणापानमिळणी । करूनि लाविली निशाणी । ब्रह्मस्थानीं रिघावया ॥ १२० ॥ ब्रह्मगिरीचिया कडा । शमदमें घालोनियां वेढा । प्रत्याहाराचा झगडा । पुढिले कडां लाविला ॥ २१ ॥ प्राणापानांच्या विवरीं । पहिली वोळखी होती खरी । माळ लाविली अभेदकरीं । मन एकाग्रीं राखोनी ॥ २२ ॥ एकाग्रतेचेनि कल्लोळें । पुढारें न ढळवे चालिले बळें । उल्हाटयंत्राचेनि मेळें । षट्चक्रपाळें भेदिलें ॥ २३ ॥ वैराग्याचीं वज्रकवचें । निधडे वीर लेऊनि साचे । एकाग्रताबळें बळाचें । झळके ध्यानाचें करीं खड्ग ॥ २४ ॥ नवल खड्गाचा वाहो । लहान थोर निवटी पहा हो । संमुख आलिया संदेहो । न लगतां घावो छेदित ॥ २५ ॥ निर्दाळूनि आळसासी । दासी केलें निद्रेसी । ऐसे सावधान अहर्निशीं । योगदुर्गासी झोंबती ॥ २६ ॥ रणरंगींचे वीर गाढे । निजबळें चालिले पुढें । सत्रावीचें पाणी वाढे । जितलें रोकडें महावीरीं ॥ २७ ॥ तेथ युद्ध जालें चांग । कामादिक अरिषड्वर्ग । रणीं पाडिले अमोघ । सतेज खड्ग झळकत ॥ २८ ॥ ऐसे वैरी पाडूनि रणीं । प्राशिलें सत्रावीचें पाणी । तंव अनुहताची सुडावणी । दुर्गामधोनी उठली ॥ २९ ॥ तेथ सोहंवीराची एकाग्रता । होतां भीतरील भेदू आला हाता । दुर्ग राखती अहंममता । मरों सर्वथा टेंकली ॥ १३० ॥

विरक्तीवांचून जर अभ्यास केला तर विषयरूपी चोर जोरानें उठतात. काम दरवडा घालितो व आत्मज्ञानाचें मुद्दल बुडतें. १६ म्हणून विवेकरूप दिवा पुढें करून अज्ञानरूपी अंधार नाहींसा करावा. वैराग्याचें बल धारणाशक्तीनें पूर्ण संपादन करावें. १७ प्राण व अपान या दोहोंची फार दिवसांपासून चुकामूक झाली होती. पण अभ्यासाच्या बलानें त्यांची एकाएकीं ओळख झाली. १८ त्याबरोबर त्यांना जुन्या ओळखीची आठवण झाली व त्यांनीं एकमेकांस आलिंगन दिलें. या ऐक्यानें त्यांना समाधान वाटलें. १९ अशारीतीनें साधकानें आसनावर निश्चल बसून, प्राण व अपान यांना एक करून, ब्रह्मस्थानांत जाण्यासाठीं निशाण फडकाविलें. १२० ब्रह्मगिरीच्या कड्याला शम-दमांचा वेढा घालून पुढल्या कड्यावर 'सोहं-' शब्दाचा मारा चालविला. २१ प्राण-अपानांच्या विवरांत त्यांची पूर्वीची ओळख होती तरी एकाग्र चित्त करून ऐक्यज्ञानानें त्यांचा संबंध जोडून दिला. २२ एकाग्रतेच्या हल्ल्यामुळें प्राणाला यत्किंचितहि पुढें सरतां आलें नाहीं व कुंडालिनी नाडीच्या द्वारां मूलाधार, स्वाधिष्ठान, मणीपूर, अनाहत, विशुद्ध व अग्निचक्र या सहा चक्रांचा भेद झाला. २३ ते निधड्या छातीचे वीर वैराग्यरूपी चिलखतें अंगांत घालून एकाग्रतेच्या बळावर ध्यानरूपी तलवारी हातीं घेऊन पाजळीत होते. २४ त्या तलवारींचा चमत्कार पहा! त्या सर्व लहानथोराला सारख्या छाटितात. एखादा संशय पुढें येतांच, तत्काल त्यांस छेदून टाकितात. २५ ते वीर आळसाचा धुव्वा उडवितात. निद्रेला आपली दासी करितात व अशाप्रकारें ते योगरूपी किल्ल्याशीं रात्रंदिवस झुंजत असतात. २६ त्या रणांगणावरील वीर मोठे पराक्रमी होते. ते आपल्या सामर्थ्यानें पुढें चालले तेव्हां सत्रावी जीवनकला म्ह० ब्रह्मरंध्रांतून होणारा अमृताचा स्राव वाढला. असा. त्या महावीरांनीं मोठा जय मिळविला. २७ तेथें मोठें युद्ध झालें. त्यांनीं काम-क्रोधादिक अजिंक्य षड्रिपूंना युद्धांत गतप्राण केलें. त्यांचें तेजस्वी खड्ग झळकत होतें. २८ याप्रमाणें युद्धांत शत्रूंना मारून त्यांनीं सत्रावीचें पाणी म्ह० अमृत प्राशन केलें. तेव्हां योगधारणेनें दशनादांच्या ध्वनीचा गजर त्या किल्ल्यांतून ऐकूं आला. २९ 'सोहं-' वीराची एकाग्रता होतांच आंतील सर्व भेद हस्तगत झाला. तें ऐकतांच त्या गडाचें रक्षण करणारीं अहं व ममता हीं दोघेंहि मरावयास टेकलीं. १३०.

यस्मिन्मनो लब्धपदं यदेतच्छनैः शनैर्मुञ्चति कर्मरेणून् ।
सत्त्वेन वृद्धेन रजस्तमश्च विधूय निर्वाणमुपैत्यनिन्धनम् ॥ १२ ॥

कामक्रोधादि महाशूर । पुत्र रणीं पडले थोर । तेणें दुःखें अतिजर्जर । मरणतत्पर दिसताती ॥ ३१ ॥ ऐसी ऐकोनि दुर्गाची वार्ता । उल्हासु वीरांचिया चित्ता । उठावा दीधला मागुता । दुर्ग सर्वथा घ्यावया ॥ ३२ ॥ निजधैर्ये वीर अदट । निजसत्वें अतिउद्भट । पुढें निर्धारितां वाट । थोर अचाट देखिलें ॥ ३३ ॥ कर्मरेणूंचे दुर्धर घाट । विधिवादें अवघड वाट । हळहळू उल्लंघितां अचाट । समूळ सपाट तो केला ॥ ३४ ॥ पुढां रजतमांचें आगड । खोलपणें अत्यंत गूढ । घालूनि निवृत्तीचे दगड । सत्वें सुदृढ बूजिलें ॥ ३५ ॥ सांचलू नव्हतां बाहेरी । जिणोनि मनकर्णिकावोवरी । माळ चढविली ब्रह्मगिरी । ब्रह्मरंध्रीं उसळले ॥ ३६ ॥ तेथ जैताची एक घायी । अनुहत निशाण लागलें पाहीं । शोधितां पारखें कोणी नाहीं । केलें ठायीं स्ववश ॥ ३७ ॥ तेथ रजतमांच्या वाटा । सहजें जाल्या सपाटा । हरिखें रामराज्याचा चोहटा । धेंडे दारवंटा पीटिले ॥ ३८ ॥ पारिखें कोणी न पडे दृष्टी । ध्यानखड्गाची सोडिली मुष्टी । वैराग्यकवचाचिया गांठी । समदृष्टीं सोडिल्या ॥ ३९ ॥ ध्येय ध्यान ध्याता । त्रिपुटी न दिसे पाहतां । ध्यानखड्ग तत्त्वतां । न धरी सर्वथा या हेतू ॥ १४० ॥ दारुण युद्धसामग्री । सत्वें केली होती भारी । ते साधनें सांडिली दुरी । कोणी वैरी असेना ॥ ४१ ॥ तन्मयतेचें छत्र धरूनी । समसाम्यसिंहासनीं । बैसला सहज समाधानी । त्यागी वोंवाळूनी जीवभावो ॥ ४२ ॥

—पूर्व श्लोकांत एकत्र असें म्हटलें आहे, पण तें एकत्र म्हणजे कोठें तेंच सांगतात—

यत् एतत् मनः यस्मिन् लब्धपदं शनैः शनैः कर्मरेणून् मुञ्चति—जें हें लय-विक्षेपात्मक मन तें ज्या परमानंदरूप भगवानामध्यें स्थिर होऊन हळूहळू कर्मवासनांना टाकितें व, **तस्मिन् वृद्धेन सत्त्वेन रजः तमः च विधूय निर्वाणं उपैति**—त्या भगवानामध्यें वृद्धि पावलेल्या सत्त्वाच्या योगानें रज व तम यांना घालवून शांतीला प्राप्त होतें. (कर्मवासनांचा जरी त्याग केला तरी सुषुप्तीप्रमाणें मनाचा लय अवश्य होणारच. असें कोणी म्हणेल म्हणून उपशमात्मक सत्त्वगुणानें रज व तम यांचा क्षय केला असतां विक्षेप व लय यांचा अभाव होतो. त्यामुळें वृत्तिशून्य मन ध्येयाकारानें अवस्थित होतें. कारण—) **अनिन्धनम्**—तें मन गुण व त्यांचीं कार्यें यांनीं रहित असतें. [याविषयीं योगशास्त्रांत 'वृत्तिशून्य मनाची जी ब्रह्माकार स्थिति तीच असंप्रज्ञात समाधि आहे,' असें म्हटलें आहे.] १२.

काम-क्रोधादिक मोठे शूर पुत्र युद्धांत पडलेले ऐकून त्या दुःखानें तीं दोघें अतिशय विव्हळ होऊन मरणोन्मुख झालीं. ३१ ही गडावरील बातमी ऐकून त्या वीरांचा उत्साह अधिकच वाढला व तो गड पुरता काबिज करण्यासाठीं त्यांनीं कंबर बांधिली. ३२ ते वीर मोठे धैर्यवान् होते. त्यांचा पराक्रम प्रसिद्ध होता. पुढील मार्ग निश्चित करीत असतां त्यांत त्यांना एक मोठा चमत्कार दिसला. ३३ कर्मरूपी वाळूचा म्हणजे वासनांचा मोठा अवघड घाट होता व त्यांतील वाटा अगदीं बिकट होत्या. कर्मराशींचें उल्लंघन करण्यास वेदानें सांगितलेला एकच मार्ग आहे. तेव्हां कर्मांचें हळूहळू उल्लंघन करून त्यांनीं सपाट मैदानाचा मार्ग गांठला. ३४ त्यापुढें त्यांना रज तम यांच्या खोल्या-मधील वाट लागली. ती अत्यंत खोल होती. त्यांत निवृत्तीचे दगड टाकून सत्त्वानें ती पुरती बुजवून टाकिली. ३५ बाहेर कांहींच चाहूल नव्हती. तेव्हां त्यांनीं मनोरूपी गड जिंकिला, ब्रह्मगिरीवर निशाण चढविलें व ते ब्रह्मरंध्रांत शिरले. ३६ तेव्हां त्यांच्या विजयाची एकच गडबड उडाली. अनुहताची नौबद झडूं लागली. त्या गडावर दुसरें कोणी शोधूनहि सांपडेना. गड सर्वस्वीं त्यांच्याच ताब्यांत आला. ३७ तेथल्या रज-तमांच्या वाटा सहजच सपाट झाल्या होत्या. चोहोंकडे रामराज्याची द्वाही फिरून बंडखोरांना पिटाळून लाविलें. ३८ दुसरें कोणीहि जेव्हां तेथें दिसेना, तेव्हां ध्यानरूपी खड्गाची मूठ सोडिली. समदृष्टीनें वैराग्यकवचाच्या गांठी सुटल्या. ३९ ध्येय, ध्यान व ध्याता ही त्रिपुटी पाहूनहि कोठें दिसेना. तेव्हां वस्तुतः ध्यानरूपी खड्गाची गरजच राहिली नाहीं. १४० सत्त्वानें युद्धसामग्री जमविलेली होती, तीहि दूर टाकून दिली. कारण पुढें कोणी शत्रू दिसेना. ४१ तेव्हां तन्मयतारूपी छत्र धरून समसाम्यरूपी सिंहासनावर जीव समाधानानें बसला. त्यानें जीव-भावाचा त्याग केला. ४२ नंतर शुद्ध सत्त्वगुण

शोधित वाढला सत्वगुण । तेणें सर्वस्वें केलें निंबलोण । पायां लागोनि आपण । स्वयें जाण उपरमला ॥ ४३ ॥ जैसा अग्नि असे काष्ठांच्या मेळीं । मथिल्या काष्ठाची करी होळी । काष्ठ नाशूनि तत्काळीं । त्यजुनि इंगळीं उपशमे ॥ ४४ ॥ तैसे वाढोनि सत्व उत्तम । नाशूनि सांडी रजतम । पाठीं त्याचाही संभ्रम । स्वयें उपरम पावला ॥ ४५ ॥ तेथें निमालें जीवाचें जीवपण । ज्ञातृत्वेंसीं निमालें ज्ञान । निमालें प्रपंचाचें भान । चिन्मात्र पूर्ण कोंदलें ॥ ४६ ॥

तदैवमात्मन्यवरुद्धचित्तो न वेद किंचिद्बहिरन्तरं वा ।
यथेषुकारो नृपतिं व्रजन्तमिषौ गतात्मा न ददर्श पार्श्वे ॥ १३ ॥

ऐसी चिन्मात्र परिपूर्णता । तेथ निरोधूनि आणितां चित्ता । चित्त पावे चैतन्यता । जाण सर्वथा नरवीरा ॥ ४७ ॥ तेव्हां अंतरीं चैतन्यघन । बाह्य चिन्मात्र परिपूर्ण । आणिक न दिसे गा जाण । वृत्तीनें आण वाहिली ॥ ४८ ॥ पाहतां ध्येय ध्याता ध्यान । जेथ उल्हासें विगुंतलें मन । ते संप्रज्ञातसमाधी जाण । गुणेंवीण भोगिती ॥ ४९ ॥ तेथ निःशेष समरसे मन । जाला सुखरूप चिद्घन । ते समाधी परम कारण । विचक्षण बोलती ॥ १५० ॥ ब्रह्म इंद्रियां गोचर नसे । गुण गेलिया डोळां दिसे । हें अनुभव्यासीचि भासे । बोलावें ऐसें तें नव्हे ॥ ५१ ॥ येथ शास्त्रें विषम जालीं वादें । 'नेति नेति' म्हणितलें वेदें । थोटावलीं योगिवृंदें । अनुभवी निजबोधें जाणती ॥ ५२ ॥ तेथ हेतुमात्र दृष्टान्तू । समूळ बुडाला समस्तू । अद्वैतवादाची मातू । ज्या ठायांतू लाजिली ॥ ५३ ॥ सबाह्य समदर्शन ।

वाढला. त्यानें जीवावरून सर्वस्वाचें लिंबलोण उतरून टाकिलें व त्याच्या चरणांना स्पर्श करून तो स्वतः आत्मस्वरूपांत लीन झाला. ४३ अग्नि काष्ठांत गुप्त असतो, तीं घासलीं असतां तो व्यक्त होऊन त्या काष्ठांसच जाळून टाकितो व अखेर त्याची ठिणगीहि शान्त होते. ४४ याप्रमाणें सत्त्वगुणाची वृद्धि होतांच तो रज व तम यांचा तत्काल नाश करितो व शेवटीं त्याचाहि वेग आपोआपच शांत होतो, ४५ त्यावेळीं जीवाचा जीवपणा नाहींसा होतो. ज्ञातृत्वासह ज्ञान लीन होतें. प्रपंचाचें भान रहात नाहीं. चिन्मयस्वरूप मात्र पूर्णत्वानें भरून जातें. १४६.

—'त्यामुळें द्वैतस्फूर्ति होत नाहीं' असें अवधूत सांगतो—

तदा एवं आत्मनि अवरुद्धचित्तः बहिः अन्तरे वा किंचित् न वेद—त्यावेळीं पूर्वोक्तप्रकारें आत्म्यामध्येंच ज्याचें चित्त निरुद्ध झालें आहे असा योगी शरीराच्या बाहेरील किंवा आंतील कांहींएक जाणत नाहीं. (चक्षुरादि इंद्रियांच्या द्वारां त्याला बाहेरील पदार्थ दिसत नाहींत व स्मृतीच्या योगानें आंतील पदार्थांचेंहि स्फुरण होत नाहीं. याविषयीं दृष्टान्त-) यथा इषौ गतात्मा इषुकारः पार्श्वे व्रजन्तं नृपतिं न ददर्श—ज्याप्रमाणें बाण सरळ करण्यामध्यें ज्याचें चित्त गढून गेलें आहे, असा बाण करणारा लोहार वाद्यादि घोष करीत जवळून जाणाऱ्या राजालाहि पहाता झाला नाहीं. [बाण सरळ करण्यांत मन गुंतल्यामुळें मोठ्या समारंभानें जवळून गेलेला राजाहि त्याला कळला नाहीं.] १३.

हे पुरुषश्रेष्ठा ! असें चिन्मात्रस्वरूप जेथें भरलेलें असतें तेथें चित्ताचा निरोध करून त्याला नेलें असतां तें चित्त पूर्णपणें चैतन्यरूपालाच प्राप्त होतें. ४७ त्यावेळीं आंत व बाहेर चैतन्यच भरलेलें दिसतें. दुसरें कांहींच दिसत नाहीं. वृत्ति तर व्यक्त न होण्याची शपथच घेतात. ४८ ध्येय, ध्याता व ध्यान या तिहींना एकरूप पाहिलें, म्हणजे मन उल्हासानें त्यांत गुंतून पडतें. तीच सविकल्प समाधि होय. तिचा गुणांवांचून उपभोग घेतात. ४९ तेथें मन पूर्णपणें समरस होतें व जीव सुखरूप चिद्घन होऊन रहातो. विद्वान् या समाधीला अत्यंत श्रेष्ठ मानितात. १५० ब्रह्म इंद्रियांना दिसणारें नाहीं, पण गुणातीत झाल्यावर तें डोळ्यांना दिसतें. अनुभव घेणारासच त्याची प्रतीति येते. तें सांगून कळण्यासारखें नाहीं. ५१ त्याच्याविषयीं वाद करितां करितां शास्त्रें एकमेकांच्या विरुद्ध झालीं. वेदानें 'नेति नेति' म्हटलें व सर्व योग्यांचा समुदाय स्तब्ध झाला. त्याला अनुभवी जनच काय ते आत्मज्ञानानें जाणतात. ५२ तेथें दार्ष्टांतिकाचा बोध करणारा दृष्टान्त साफ बुडून जातो. अद्वैतवाद तर त्याच्या ठिकाणीं फिका पडतो. ५३ अन्तर्बाह्य समदृष्टि ठेवणें हीच

हे अनुभवाची निर्वाणखूण । शरकार गुरु केला जाण । हेंचि लक्षण लक्षूनी ॥ ५४ ॥ तावूनि उजू करितां बाण । दृढ लागलें अनुसंधान । इतुकेन प्रपंचाचें भान । खुंटलें जाण तयाचें ॥ ५५ ॥ निशाण भेरी वाजंतरें । रथ गज सैन्यसंभारें । राजा गेला अतिगजरें । नेणिजे शरकारें शरदृष्टीं ॥ ५६ ॥ मागूनि रायाचा हडपी आला । तो पुसे ये मार्गीं राजा गेला । येरू म्हणे नाहीं देखिला । गेला कीं न गेला कोण जाणे ॥ ५७ ॥ तो शरकारू देखिला दृष्टीं । हे ऐकोनि तयाची गोष्टी । जगीं एकाग्रता मोटी । प्रपंच दृष्टीं येवों नेदी ॥ ५८ ॥ हेंचि साधावया साधन । गृहारंभेंवीण एकपण । सर्प गुरु केला जाण । हेंचि लक्षण देखोनी ॥ ५९ ॥

एकचार्यनिकेतः स्यादप्रमत्तो गुहाशयः । अलक्ष्यमाण आचारैर्मुनिरेकोऽल्पभाषणः ॥ १४ ॥

सर्प सांघातू न साहे । एकाकी सुखें विचरत जाये । सदा सावधान राहे । श्वासू वायां जावों नेदी ॥ १६० ॥ तैसीच योगियाची गती । न साहे द्वैताची संगती । एकाकी वसे एकांतीं । जनांप्रती अलक्ष्य ॥ ६१ ॥ विषमाचा संगू न करी । परी समाचाही संगू न धरी । निघे देहसंगाबाहेरी । त्वचेचे परी सर्पाचे ॥ ६२ ॥ सदा सावधानबुद्धी । लवनिमेष वायां जावों नेदी । अनुसंधान त्रिशुद्धी । तुटों नेदी सर्वथा ॥ ६३ ॥ सर्प बिळामाजीं रिघे बळें । मार्गीं मागू देखती सकळें । धाला भुकेला हें

अनुभवाच्या निर्वाणाची खूण आहे. त्यासाठीं मीं बाण तयार करणारा लोहार गुरु केला. ५४ तो बाण तापवून सरळ करीत असतां त्याचें सर्व लक्ष त्यांतच गुंतलें व त्यामुळें प्रपंचाचें भान नाहींसें झालें. ५५ त्याच्या जवळून एका राजाची स्वारी निशाण, कर्णा, इतर वाद्यें, रथ, हत्ती, सैन्य इत्यादिकांसह मोठ्या समारंभानें वाजतगाजत गेली, तरी बाण करणाराची दृष्टि आपल्या बाणाकडे लागलेली असल्यामुळें त्याला त्याचा पत्ताहि नव्हता. ५६ इतक्यांत राजाचा हडपी म्ह० मालकाच्या आवडीप्रमाणें विडा करून देणारा सेवक तेथें येऊन ‘ राजा या मार्गानें गेला का ? ’ असें विचारूं लागला. तेव्हां तो म्हणाला ‘ मीं कांहीं पाहिला नाहीं, गेला कीं नाहीं कोण जाणें. ’ ५७ असा तो बाण करणारा मीं प्रत्यक्ष पाहिला, हें त्याचें बोलणें ऐकिलें, तेव्हां त्यापासून मीं असा बोध घेतला कीं, जगांत एकाग्रता अत्यंत श्रेष्ठ आहे. ती डोळ्यांपुढें प्रपंच येऊं देत नाहीं. ५८ हें साधन साधण्यासाठीं घराला आरंभ न करितां एकटें रहाणेंच योग्य. सर्पाचें हेंच लक्षण पाहून त्याला मीं गुरु केलें. १५९.

—सर्पापासून आपण काय शिकलों, तें अवधूत सांगतो—

मुनिः एकचारी अनिकेतः अप्रमत्तः गुहाशयः आचारैः अलक्ष्यमाणः एकः अल्पभाषणः स्यात्—योग्यानें एकाकी संसार करावा, त्यानें एक नियत स्थान करूं नये, सदा दक्ष असावें, एकांतांत रहावें, आपल्या संचारांनीं आपल्याला कोणी ओळखील असें वागूं नये, एकाकी असावें व अल्प भाषण करावें. [आपल्यासारख्याच दुसऱ्या योग्याचाहि संसर्ग सोडावा. याविषयीं कुमारी गुरु आहे. सर्प व सर्वसाधारण जनांचा संग सोडावा याविषयीं सर्प गुरु आहे. जसा लोकांना भिऊन नेहमीं एकाकी संसार करितो, त्याचें एक निश्चित निवास स्थान नसतें. तो सदा सावधान असतो. एकांकांत रहातो. त्याच्या गतीवरून तो सविष आहे कीं निर्विष आहे याची कल्पना होत नाहीं. तो नेहमीं सहास्यशून्य व मितभाषण करणारा असतो. मुनीनेंहि तसेंच वागावें.] १४.

सर्पाला सोबतीनें रहाण्यास मुळींच आवडत नाहीं, तो एकटाच सुखानें फिरत असतो, नेहमीं सावध रहातो व आपला श्वासोच्छ्वासहि व्यर्थ घालवीत नाहीं. १६० योग्याची स्थितिहि अशीच असते. त्याला द्वैताची संगति सहन होत नाहीं. लोकांना दिसणार नाहीं अशा एकान्त जागेंत जाऊन तो एकटा बसतो. ६१ प्रतिकूल लोकांची तो संगति धरीत नाहीं किंवा अनुकूल लोकांचाहि सहवास करीत नाहीं. सर्प जसा कात टाकितो तसा योगी देह-संगाच्या बाहेर निघतो. ६२ त्याचें चित्त सदा सावध असतें. तो एक पळहि वायां जाऊं देत नाहीं व आपलें चित्त स्वरूपापासून तत्त्वतः ढळूं देत नाहीं. ६३ साप बळेंच आपल्या बिळांत शिरतो, तेव्हां त्याची मार्गावर उठलेली

त्या न कळे । गेला कळे सर्वांसी ।। ६४ ।। तैसाचि योगियाही योगबळें । न राहे जनांमाजीं जनमेळें । गुहेमाजीं पडिला लोळे । एकला खेळे एकपणीं ।। ६५ ।। हो कां योगियांचा आचार । करितां देखती लहान थोर । सविकल्पनिर्विकल्पविचार । न कळे साचार कोणासी ।। ६६ ।। एक म्हणती कर्मठ । एक म्हणती कर्मभ्रष्ट । एक म्हणती आत्मनिष्ठ । कळेना स्पष्ट कोणासी ।। ६७ ।। सर्पास बोलणेंचि नाहीं । बोले तरी अल्प कांहीं । तैसाच योगिया पाहीं । वाग्वादीं नाहीं सादर ।। ६८ ।। आंतुले कृपेचेनि बळें । बोले मृदु मंजुळ कोंवळें । श्रवणासी दोंदें एकवेळे । तेणें वचनमेळें निघालीं ।। ६९ ।। बोलणें तरी अतिअल्प । परी छेदी संकल्पविकल्प । त्याच्या बोलाचें स्वरूप । सत्यसंकल्प जाणती ।। १७० ।। जो एकाकी उदास । ज्याचें परमार्थी मानस । तेणें गृहारंभाची आस । वृथा प्रयास न करावे ।। ७१ ।।

गृहारम्भोऽतिदुःखाय विफलश्चाध्रुवात्मनः । सर्पः परकृतं वेश्म प्रविश्य सुखमेधते ।। १५ ।।

मूळीं गृहारंभ तें दुःख । कष्ट करितां दुःखकारक । निपजविलें त्रिमाळिक । तें अध्रुव देख सर्वथा ।। ७२ ।। जेथें संसारचि नाशवंत । देह प्रत्यक्षाकारें असंत । तेथींचें गृह काय शाश्वत । मूर्ख मानित सत्यत्वें ।। ७३ ।। जें गर्भींच निमालें । तें उपजतां जातक केलें । मृताचें जन्मनांव ठेविलें । तैसें गृह केलें असंत ।। ७४ ।। तोही असंतू आरंभ कुडा । मृत्तिकेसाठीं लावी झगडा । भांडवी दगडासाठीं कां लांकुडा । सुहृद्‌भिडा सांडोनी ।। ७५ ।। वोळंबा घर करी सायासें । त्यामाजीं सर्प राहे सावकाशें । न शिणतां अप्रयासें । परघरवासें संतुष्ट ।। ७६ ।। तैसाचि योगियाही जाण । न धरी देहगेहअभिमान ।

खूण लोकांना दिसते, पण त्यावरून तो भुकेलेला आहे किंवा तृप्त झाला आहे हें कांहीं कळत नाहीं, या मार्गानें गेला एवढेंच कळतें. ६४ त्याचप्रमाणें योगीहि आपल्या योगबळानें लोकांच्या समूहांत रहात नाहीं. तो स्वतःशींच खेळत खुशाल गुहेमध्यें लोळत पडलेला असतो. ६५ योग्याचें आचरण लहान-थोर सर्व पहातात, पण त्यावरून तो खरोखर सविकल्प आहे कीं निर्विकल्प आहे हें कोणालाच कळत नाहीं. ६६ कोणी म्हणतात तो कर्मठ आहे, कोणी त्याला कर्मभ्रष्ट बोलतात, तर कोणी आत्मनिष्ठ म्हणतात. सारांश, खरें कोणासच ठाऊक नसतें. ६७ सर्पाला तर मुळीं बोलतांच येत नाहीं. तो नुस्ता ध्वनि काढितो. योगीहि कधीं वाद-विवादांत पडत नाहीं. ६८ मनांत उत्पन्न झालेल्या कृपेच्या सामर्थ्यानें तो मृदु, मधुर व प्रेमळ असेंच बोलतो. त्यामुळें त्याच्या भाषणानें कान तृप्त होतात. ६९ त्याचें भाषण अगदीं थोडेंच असतें. परंतु तें ऐकणाराचे संकल्पविकल्प तोडून टाकितें. त्याच्या भाषणाचा अर्थ केवळ सत्यनिष्ठ जनच जाणितात. १७० तो एकटा उदासीन असतो. त्याचें चित्त परमार्थाकडे असतें. तो घरा-दाराच्या आशेनें वृथा प्रयास करीत नाहीं. १७१.

—तसेंच—

अध्रुवात्मनः गृहारम्भः अतिदुःखाय विफलः च—या नश्वरदेहाचा गृहारंभ अतिशय दुःखाला कारण होतो व तो व्यर्थ आहे. सर्पः परकृतं वेश्म प्रविश्य सुखं एधते—सर्प दुसऱ्यानें केलेल्या बिळांत प्रवेश करून मोठ्या आनंदानें रहातो. १५.

घराचा आरंभच मुळीं दुःखाचें कारण आहे. अतिशय कष्ट सोसून तीन मजली घर बांधावें. पण तेंच अशाश्वत असतें. ७२ जेथें संसारच नाशवंत आहे, शरीराचें स्वरूपच मुळीं नश्वर आहे, तेथें घर कसें शाश्वत होईल! पण मूर्ख लोक त्याला सत्य मानितात. ७३ गर्भांतच मृत झालेल्या बालकाचें उपजतांच जातक करावें, किंवा मृताचें नामकरण करणें-वर्तविणें जसें व्यर्थ तसेंच केलेलें गृह अशाश्वत आहे. ७४ अशाश्वत घराचा आरंभहि मिथ्याच आहे. कारण तो सुरवातीलाच स्नेहसंबंध विसरून मातीसाठीं भांडण लावितो. दगडासाठीं व लांकडांसाठीं कलह उत्पन्न करितो. ७५ वाळवी किंवा मुंग्या मोठ्या मेहनतीनें वारूळ करितात व सर्प त्यांत सुखानें जाऊन रहातो. कांहीं प्रयास न करितां तो दुसऱ्याच्या घरांत मजेनें रहातो. ७६ योगीहि तसाच आहे, असें जाण. तो घराचा किंवा

परगृहीं वसे निरभिमान । सुखसंपन्न सर्वदा ॥ ७७ ॥ एकही गृह न करावें । हें सत्य मानिलें जीवें । एवढी सृष्टि केली देवें । बांधूं न पवे त्या केवीं ॥ ७८ ॥ सृष्टि रचिली कैसेनी । निपजली कोणापासोनी । येचि अर्थीं गुरु कांतिणी । लक्षण लक्षूनि म्यां केली ॥ ७९ ॥

एको नारायणो देवः पूर्वसृष्टं स्वमायया । संहृत्य कालकलया कल्पान्त इदमीश्वरः ॥ १६ ॥

नरांचे आश्रयस्थान । यालागीं बोलिजे नारायण । जीवाचें तोचि जीवन । स्वामी नारायण सर्वांचा ॥ १८० ॥ ऐसा एक नारायण । तेणें पूर्वीं जग स्रजिलें जाण । उपकरण सामग्रीवीण । केलें निर्माण जगाचें ॥ ८१ ॥ एकलेनि सामग्रीवीण । केवीं केलें जग संपूर्ण । स्वमाया क्षोभवूनि जाण । करी निर्माण जगाचें ॥ ८२ ॥ ते निजमायेच्या पोटीं । असंख्य जीवसामग्रीच्या कोटी । ते माया अवलोकिली दृष्टीं । तोचि उठाउठी निजकाळु ॥ ८३ ॥ ऐशी निजमाया अवलोकिली । ते निजांगावरी नांदविली । परी अंगीं लागों नाहीं दिधली । हे अलिप्तता केली तो जाणे ॥ ८४ ॥ धुई दाटली आकाशीं । आकाश नातळे धुईसी । तैसी निजांगें वाढवूनि मायेसी । अलिप्त तियेसी वर्ततू ॥ ८५ ॥ उदकें कमळिणी वाढिन्नली । ते जळ आवरी निजदळीं । तैसी माया आनंदु आकळी । चित्सत्ता मोकळी सदंशेंसीं ॥ ८६ ॥ स्वमायेसी जो अधिष्ठान । मायेसी नांदावया तोचि भुवन । एवं मायानियंता नारायण । सत्य जाण सर्वथा ॥ ८७ ॥ रजोगुण स्रजी सृष्टीसी । सत्वगुण

देहाचा अभिमान न धरितां निरभिमानानें दुसऱ्याच्या घरांत सदा सुखानें रहातो. ७७ 'जीवानें एकहि घर बांधूं नये, हें जर खरें मानिलें तर मग ईश्वरानें जी एवढी सृष्टि निर्माण केली आहे त्याला बाध नाहीं कां येत?' असें कोणी म्हणेल म्हणून मी सृष्टीची रचना कशी केली! ती कोणापासून उत्पन्न झाली! हें जाणण्यासाठीं मी कांतिणीला म्ह० कोळ्याला गुरु केलें. १७.

—कोणत्याहि प्रकारच्या साधनसामग्रीवांचून असलेल्या ईश्वरापासून जगाची उत्पत्ति व संहार होणें शक्य आहे असें मी कोळ्याच्या दृष्टान्तावरून ठरविलें, हें सांगण्यासाठीं अवधूत प्रथम साडेतीन श्लोकांनीं संहाराचा प्रकार सांगतो.

एकः नारायणः देवः ईश्वरः स्वमायया पूर्वसृष्टं इदं कल्पान्ते कालकलया संहृत्य—कर्ता, कर्म, करण इत्यादि कारकांची अपेक्षा न करणारा नारायण देव ईश्वर आपल्या मायेनें पूर्वीं उत्पन्न केलेल्या सृष्टीचा कल्पांतीं कालशक्तीनें संहार करून, (याचा संबंध पुढील श्लोकांशीं आहे.) १६.

नारा म्ह० जल. तें याचें आश्रयस्थान म्हणून त्याला 'नारायण' असें म्हणतात. (किंवा नर म्ह० चराचर शरीरें, त्यांतील जो चिदाभासरूप जीव तो नार. त्याचें हा अधिष्ठान म्हणून नारायण.) तो सर्व जीवांचें जीवन आहे. तोच नारायण सर्वांचा स्वामी आहे. १८० असा जो एक नारायण, त्यानें पूर्वीं जगत् उत्पन्न केलें. कसल्याहि साहित्य सामग्रीवांचूनच त्यानें सृष्टि निर्माण केली. ८१ 'एकट्यानें साहित्यावांचून संपूर्ण जगत् कसें केलें' म्हणून म्हणशील तर त्यानें आपल्या मायेला क्षुब्ध करून विश्वाची रचना केली. ८२ त्याच्या मायेच्या पोटांत जीवसामग्रीचे असंख्य प्रकार आहेत, त्या मायेकडे नजर टाकिली व लगेच त्यानें काळाला उत्पन्न केलें. ८३ याप्रमाणें त्यानें आपल्या मायेकडे पाहून तिला आपल्या अंगावर राहूं दिलें. पण तो मायेनें लिप्त झाला नाहीं, स्वतः अलिप्तच राहिला. ८४ आकाशांत दाट धुकें पसरतें, पण तें आकाशाला कांहीं स्पर्श करीत नाहीं, त्याप्रमाणें तो आपल्या अंगावर मायेला वाढवून तिच्यापासून अलिप्तच राहिला. ८५ जलानेंच कमलिनीला वाढविलें, पण ती कमलिनी आपल्या पानांनीं जलालाच झांकून टाकिते. त्याप्रमाणें माया आनंदाला झांकिते, पण प्रत्येक जड पदार्थांत सदंशानें चित्सत्ता प्रतीत होते. ८६ आपल्या मायेचें जो अधिष्ठान तोच तिचें नांदावयाचें घर. याप्रमाणें नारायणच मायेचा नियंता आहे, हें तूं सर्वथा सत्य जाण. ८७ रजोगुण सृष्टि उत्पन्न करितो. सत्त्वगुण तिचें पालन करितो.

प्रतिपाळी तिसी । कल्पांतीं क्षोभोनि तमोगुणासी । काळरूपेंसीं संहारी ॥ ८८ ॥ हे मायेची क्षोभक शक्ती । असे नारायणाचे हातीं । यालागीं संहारिता अंतीं । ईश्वरू म्हणती या हेतू ॥ ८९ ॥

एक एवाद्वितीयोऽभूदात्माधारोऽखिलाश्रयः कालेनात्मानुभावेन साम्यं नीतासु शक्तिषुः ॥ १७ ॥
सत्त्वादिष्वादिपुरुषः प्रधानपुरुषेश्वरः । परावराणां परम आस्ते कैवल्यसंज्ञितः ।
केवलानुभवानन्दसन्दोहो निरुपाधिकः ॥ १८ ॥

एवं संहारोनि कार्यकारण । एक अद्वितीय नारायण । एकपणें परिपूर्ण । गुणागुण निरसोनि ॥ १९० ॥ एकला एकू नारायण । हेंही तेथ म्हणे कोण । हें अद्वितीय लक्षण । भेदशून्य अवस्था ॥ ९१ ॥ विजातीय भेद ते ठायीं । नसे सजातीय भेदू कांहीं । स्वगतभेदू तोही नाहीं । भेदशून्य पाहीं ये रीतीं ॥ ९२ ॥ ऐसा अभेदू जो साचारू । तोचि प्रकृतिपुरुषांचा ईश्वरू । नियंता तो परावरू । तोही निर्धारू परियेंसीं ॥ ९३ ॥ प्रकृति पुरुष दोन्ही । कल्पिलीं जेणें अमनमनीं । तो ईश्वर होय भरंवसेनी । त्याचे सामर्थ्येंकरूनि वर्तती ॥ ९४ ॥ प्रकृतीतें चेतवी सत्ता । तेचि याची पुरुषता । यालागीं प्रकृतीचा भर्ता । होय सर्वथा हाचि एकू ॥ ९५ ॥ 'पर' जे अजप्रमुख । 'अवर' मनुमुख्य स्थावरांतक । यांचा नियंता तो देख । सर्वचाळक सर्वांचा ॥ ९६ ॥ ज्याचे आज्ञेवरी पाहें । सैरा वायू जाऊं न लाहे । समुद्र वेळेमाजीं राहे । सूर्य वाहे दिनमान ॥ ९७ ॥ ज्याची आज्ञा करूनि प्रमाण । बारा अंगुळें विचरे प्राण । परता जाऊं न शके जाण । आज्ञेभेण सर्वथा ॥ ९८ ॥ आज्ञा जाणोनि धडफुडी । मेरू बैसका

तमोगुण कल्पाच्या अंतीं क्षोभतो व काळरूपानें संहार करितो. ८८ ही मायेची क्षोभशक्ति नारायणाच्या हातांत आहे म्हणूनच तो अंतीं संहार करणारा ईश्वर आहे, असें म्हणतात. १८९.

एकः एव अद्वितियः अभूत्—एकच व अद्वितीय म्ह० सजातीय-विजातीय-स्वगतभेदशून्य परमात्मा, आत्माधारः अखिलाश्रयः—स्वतःच स्वतःचा आधार व सर्वांचा आश्रय झाला. आत्मानुभावेन कालेनसत्त्वादिषु शक्तिषुसाम्यं नीतासु—आत्म्याचा एक प्रभावच, अशा कालानें कारणभूत सत्त्वादि शक्तींनाहि साम्याला प्राप्त केलें असतां, आदिपुरुषः प्रधानपुरुषेश्वरः परावराणां परमः कैवल्यसंज्ञितः आस्ते—तो आदिपुरुष गुणांची साम्यावस्था हें प्रधान व तें प्रधान हीच ज्याची उपाधि आहे असा पुरुष, या दोहोंचाहि ईश्वर होतो. (ब्रह्मादिक पर व इतर मुक्त जीव हे अपर यांचा परम प्राप्य व ज्याला कैवल्य ही संज्ञा आहे असा होऊन तो रहातो. कारण तो—) केवलानुभवानन्दसन्दोहः—निर्विषय आनंदाचा समूह म्ह० परमानंद आहे. कारण निरुपाधिकः—तो पूर्वोक्त उपाधिरहित आहे. म्हणूनच तो मोक्ष या संज्ञेस पात्र होतो. १७–१८.

याप्रमाणें कार्य-कारणांचा संहार करून गुणागुणरहित एक अद्वितीय परिपूर्ण नारायणच एकत्वानें रहातो. १९० पण अगदीं एकटा एकच नारायण आहे, हें तरी म्हणणार कोण ! हें अद्वितीय लक्षण म्ह० भेदशून्य अवस्था, ९१ तेथें विजातीय, सजातीय व स्वगत भेद नाहीं. (एका जातीच्या पदार्थांचा दुसऱ्या जातीच्या पदार्थांशीं विजातीय भेद असतो. एका जातीच्या व्यक्तींचा परस्पर सजातीय भेद असतो. एकाच सावयव पदार्थाच्या अवयवांचा परस्परांशीं स्वगत भेद असतो. जसें वृक्षाचा पाषाणादिकांशीं विजातीय भेद आहे, आंब्याच्या झाडाचा फणसाच्या झाडाशीं सजातीय भेद आहे व वृक्षाचा त्याच्याच डहाळ्या, पानें, फुलें इत्यादिकांशीं स्वगत भेद आहे.) पण हा नारायण या तीनहि भेदांनीं रहित आहे. ९२ असा जो अभेद तोच प्रकृति-पुरुषांचा ईश्वर, सर्वांचा श्रेष्ठ नियंता व परावर आहे. ९३ मनावांचूनच स्फुरलेल्या संकल्पानें ज्यानें प्रकृति व पुरुष यांची कल्पना केली, तोच ईश्वर होय. त्याच्याच सामर्थ्यानें तीं प्रकृति-पुरुष वागतात. ९४ सत्ता प्रकृतीला जागृत करिते. तेंच याचें पुरुषत्व. यास्तव हाच एक सर्वथा प्रकृतीचा पति होय ९५ पर म्ह० ब्रह्मादिक देव आणि अवर म्ह० मन्वादिकांपासून स्थावरापर्यंत सर्व, यांचा तो नियामक व चालक आहे. ९६ त्याच्या आज्ञेपलीकडे रेसरभहि वारा वहात नाहीं. त्याच्या आज्ञानुसार समुद्र आपल्या मर्यादेंत रहातो व सूर्य दिनमान चालवितो. ९७ त्याची आज्ञा प्रमाण मानून प्राण नासिकाग्राच्या आंत व बाहेर बारा अंगुळेंच संचार करितो. त्याच्या आज्ञेचें उल्लंघन होईल या भीतीनें तो पलीकडे फिरकतहि नाहीं. ९८

न सोडी । चेतना आज्ञा करी गाढी । अचेतन कुडी चेतवी ॥ ९९ ॥ तो स्वयें तंव निराधार । परी जाला विश्वासी आधार । जेवीं सर्पाभास दोर । दिसे साचार आश्रयो ॥ २०० ॥ सत्वादिकां ज्या गुणशक्ती । आवरूनि निजकाळगती । समत्वा आणिल्या स्थिती । निजप्रकृतीमाझारीं ॥ १ ॥ तेही प्रकृती उपरमोनी । राहिली असे निर्गुणस्थानीं । जेवीं वटबीजीं सामावोनी । केवळपणीं राहिला ॥ २ ॥ तैसा उपाधि गिळून सकळ । निरुपाधिक केवळ । जेवीं काढिलिया मंदराचळ । राहे निश्चळ क्षीराब्धी ॥ ३ ॥ नाना अलंकारठसे । घातलिया जेवीं मुसे । पूर्वरूप सोनें जैसें । होय तैसें केवळ ॥ ४ ॥ नाना नक्षत्रावलोकू । निजतेजें लोपी अर्कू । तैसा उपाधि गिळोनि एकू । निरुपाधिकू उरलासे ॥ ५ ॥ हो कां ग्रीष्माच्या अंतीं । बीजें लीन होती क्षीतीं । तैशी लीन होऊनि प्रकृती । केवळ सुखमूर्ती उरलासे ॥ ६ ॥ ऐसा निरुपाधिकू केवळ । सुखस्वरूपानंदकल्लोळ । चिन्मात्रतेजें बहळ । नित्यनिर्मळ सदंशें ॥ ७ ॥ तेणें ज्ञानस्वरूपें अनंतें । सर्जनकाळ अवस्थेतें । स्रजिता जाला सृष्टीतें । तेंही निरुतें अवधारीं ॥ ८ ॥

केवलात्मानुभावेन स्वमायां त्रिगुणात्मिकाम् । संक्षोभयन् सृजत्यादौ तया सूत्रमरिन्दम ॥ १९ ॥
तामाहुस्त्रिगुणव्यक्तिं सृजन्तीं विश्वतोमुखम् । यस्मिन्प्रोतमिदं विश्वं येन संसरते पुमान् ॥ २० ॥

त्याची आज्ञा खरी मानून मेरुपर्वत जो एका जागेवर बसला आहे तो तेथून हालत नाहीं. चेतनाशक्तीला त्याची आज्ञा होतांच ती अचेतन देहालाहि चेतविते. ९९ ज्याप्रमाणें सर्पाचा भास होण्यास मूळ दोरीचा आधार लागतो, त्याप्रमाणें तो स्वतः निराधार असून सर्व विश्वाचा आधार आहे. २०० त्यानें सत्त्वादि गुणशक्तींना आत्मकालगतीनें आंवरून त्यांना आत्मप्रकृतीमध्यें स्थिर करून ठेविलें आहे. १ पण ती प्रकृतिहि नाहींशी होऊन निर्गुणांत राहिली आहे. वटवृक्ष जसा बीजांत लीन होऊन रहातो २ तसें निरुपाधिक ब्रह्म सर्व उपाधींना गिळून स्वतः शुद्ध स्वरूपांतच रहातें. ज्याप्रमाणें मंदराचल पर्वत काढून घेतला तरी क्षीरसागर निश्चल असतो. ३ किंवा भिन्न-भिन्न आकाराचे सुवर्णालंकार मुशींत घातले म्हणजे त्यांचें मूळ स्वरूपाचें सोनें होतें, ४ किंवा आकाशांतील असंख्य नक्षत्रें सूर्याच्या प्रकाशांत लोपून जातात, त्याप्रमाणें सर्व उपाधींना म्ह० मायेनें रचलेल्या सृष्टीला ग्रासून तो परमात्मा एकटा निरुपाधिक शिल्लक रहातो. ५ किंवा उन्हाळ्याच्या शेवटीं जशीं झाडांचीं सर्व बीजें पृथ्वीमध्यें लीन होतात, त्याप्रमाणें प्रकृति त्याच्यामध्यें लीन होऊन केवल सुखस्वरूप असा तो एकटा उरतो. ६ अशा प्रकारच्या केवल निरुपाधिक, सुखस्वरूप, आनंदाचा सांठा, चिन्मात्रतेजानें अतिशय देदीप्यमान, सत्यस्वरूपामुळें सदा पवित्र अशा ७ ज्ञानस्वरूप अनंतानें उत्पत्तिकालीं सृष्टि कशी निर्मिली, हें निश्चयानें ऐक. २०८.

—केवल आत्म्यापासूनच सृष्टि कशी उत्पन्न होते, तें दाखवितात—

केवलात्मानुभावेन त्रिगुणात्मिकां स्वमायां संक्षोभयन्—केवल आपली विभूति असा जो काल त्याच्या योगानें आपल्या त्रिगुणात्मक मायेला क्षुब्ध करणारा ईश्वर, हे **अरिन्दम**—हे रागादिशत्रूंचें दमन करण्यास समर्थ असलेल्या राजा ! **तया आदौ सूत्रं सृजति**—त्या मायेच्या योगानें प्रथम क्रियाशक्तिप्रधान महत्तत्त्व उत्पन्न करितो. (जीवाच्या संसाराला कारण होणारें हें क्रियाशक्तिप्रधानसूत्र जरी उत्पन्न केलें तरी तूं भिऊं नकोस, असें 'अरिन्दम' या संबोधनानें सुचविलें आहे.) **तां विश्वतोमुखं सृजन्तीं त्रिगुणव्यक्तिं आहुः**—त्या नानाप्रकारच्या त्रिगुणात्मक विश्वाला अहंकाराच्या द्वारा उत्पन्न करणाऱ्या शक्तीला त्रिगुण व्यक्ति म्हणतात. **यस्मिन् इदं विश्वं प्रोतं**— ज्या गुणत्रय कार्यामध्यें हें विश्व ओत-प्रोत ग्रथित आहे. (हेंच कारणभूत समष्टीरूप आहे. 'वायु वैं गौतम !' इत्यादि बृहदारण्यक श्रुतींत याचेंच वर्णन केलें आहे. बृ. भा. अ. ३-७-२ पृ. १७४) **येन पुमान् संसरते**—ज्या वाय्वात्मक प्राणरूपानें जीव संसार करितो. [तेंच हें त्रिगुण कार्यरूप सूत्र आहे.] १९-२०.

तेणें निजात्मकाळसत्तें । अवलोकिलें निजमायेतें । । ते क्षोभोनि तेथें । निजसूत्रातें उपजवी ।। ९ ।। तेचि बोलली क्रियाशक्ती । करिती जाली त्रिगुणव्यक्ती । अहंकारद्वारा स्रजिती । जगउत्पत्तीतें मूळ ।। १० ।। तेथें गुणागुणविभाग । सुर नर आणि पन्नग । अध ऊर्ध्व मध्यभाग । रचिलें जग तत्काल ।। ११ ।। ब्रह्मांडीं सूत्र जाण । पिंडीं वर्तवी प्राण । पिंडब्रह्मांडविंदान । कर्त्री जाण क्रियाशक्ती ।। १२ ।। जीव करावया संसारी । षड्विकार वाढवी शरीरीं । षडूर्मी त्यामाझारीं । जीव संचारी संचरवी ।। १३ ।। एवढी संसारउत्पत्ती । करावया इची व्युत्पत्ती । यालागीं नांवें क्रियाशक्ती । सांख्यसंमतीं बोलिजे ।। १४ ।। या क्रियाशक्तिसूत्राचे ठायीं । जग ओतिलें असे पाहीं । आडवेंतिडवें ठायींचे ठायीं । गोंवून लवलाहीं वाढत ।। १५ ।। दृढबंध देहाभिमाना । देऊनि संसारी करी जना । उपजवी अनिवार वासना । योनी नाना जन्मवी ।। १६ ।। पित्याचेनि रेतमेळें । रजस्वलेचेनि रुधिर-बळें । उकडतां जठराग्निज्वाळें । बहुकाळें गोठलें ।। १७ ।। तेथ निघाले अवयवांकुर । करचरणादिक लहान थोर । देह जाला जी साकार । तरी अपार यातना ।। १८ ।। जठरीं गर्भाची उकडतां उंडी । नाना दुःखांची होय पेडी । रिघे विष्ठा कृमी नाकीं तोंडीं । तेणें मस्तक झाडी पुरे पुरे ।। १९ ।। थोर गर्भींची वेदना । आठवितां थरकांपू मना । भगद्वारें जन्म जाणा । परम यातना जीवासी ।। २२० ।। ऐसें जन्मवूनि जनीं । घाली स्वर्गाच्या बंदिखानीं । का पचती अधःपतनीं । देहाभिमानें करूनियां ।। २१ ।। ऐसी सुखदुःखांची कडी । घालोनि त्रिगुणी दृढ बेडी । भोगवी दुःखाच्या कोडी । तरी न सोडी अविद्या ।। २२ ।। हा थोर मायेचा खटाटोपू । तुज नाहीं भयकंपू । तुवां दृढ धरोनि अनुतापू ।

त्यानें आपल्या काळाच्या सत्तेनें मायेकडे पाहिलें, तशी ती क्षुब्ध झाली व तिनें वायुरूप सूत्रात्म्याला उत्पन्न केलें. ९ त्यालाच क्रियाशक्ति म्हणतात. त्या शक्तीनें सत्त्व, रज व तम हे तीन गुण व्यक्त केले आणि अहं-कराच्या द्वारा जगाच्या उत्पत्तीचें मूळ निर्माण केलें. २१० त्यावेळीं गुणागुणाच्या विभागाप्रमाणेंच देव, मनुष्य, नाग यांची उत्पत्ति होऊन अध म्ह० पातालादि, ऊर्ध्व म्ह० स्वर्गादि व मध्य म्ह० मृत्युलोक अशा त्रिभुवनाची रचना झाली. ११ ब्रह्मांडांतील तेंच वायुरूप सूत्र प्राणरूपानें पिंडाला वागवूं लागलें. क्रिया-शक्तीच पिंडाची व ब्रह्मांडांची रचना करणारी आहे, असें समज. १२ जीवाला संसारी करण्यासाठीं तिनें शरीरांत उत्पत्ति, अस्तित्व, वृद्धि, परिणाम, क्षय व नाश हे सहा विकार वाढविले. त्यामध्यें जन्म, मरण, क्षुधा, तृषा, शोक व मोह या सहा उर्मी उत्पन्न केल्या आणि ती जीवांकडून सुख-दुःखांचा भोग घेववूं लागली. १३ संसाराची उत्पत्ति करण्यासाठीं हिची ही व्युत्पत्ति आहे. म्हणूनच तिला आत्मानात्मविचारानें क्रियाशक्ति असें म्हटलें आहे. १४ या क्रियाशक्तिसूत्रामध्येंच हें सर्व जगत् ओत-प्रोत भरलेलें आहे. तें आडवें-तिडवें गुंतून जागच्या जागीं असेल तसेंच वाढत जातें. १५ तें देहाभिमानाची घट्ट गांठ देऊन लोकांना संसारी बनवितें. त्यांच्या मनांत अनिवार वासना उत्पन्न करून त्यांना अनेक प्रकारच्या योनींत जन्मास घालितें. १६ स्त्री-पुरुषसंयोगानें गर्भधारणा होतें. तें शुक्र-शोणीताचें मिश्रण जठराग्नीच्या ज्वालेनें उकडलें म्हणजे घट्ट होतें. १७ नंतर त्याला हात-पाय इत्यादि लहान-मोठे अवयव फुटतात व साकार देह बनतो. त्याला अनंत यातना भोगाव्या लागतात. १८ पोटांत गर्भाचा पिंड उकडत असतां नानाप्रकारचीं दुःखें सोसावीं लागतात. नाकां-तोंडांत विष्ठा, जंत वगैरे शिरतात. तेव्हां तो जीव पुरें पुरें म्हणून मस्तक झाडूं लागतो. १९ गर्भांतील वेदना मोठी भयंकर आहे. त्याची आठवण होतांच अंगाचा थर-कांप होतो. योनीद्वारां जन्म होतेवेळीं जीवाला फार क्लेश होतात. २२० आशाप्रकारें या जगांत जन्मवून देहाभि-मानाच्या योगानें स्वर्गाच्या बंदीखान्यांत घालतो किंवा अधःपातानें दुःख भोगवितो. २१ याप्रमाणें सुख-दुःखांच्या कड्यांनीं बनविलेली त्रिगुणांची मजबूत बेडी दुःखांच्या राशी भोगविण्यास लाविते. तरी अविद्या सोडीत नाहीं. २२ हे राजा, मायेचा हा फार मोठा खटाटोप आहे. पण तुला त्याचें भय नाहीं. कारण तूं

अभिमानदर्पू छेदिला ॥ २३ ॥ तुझी पालटली दिसे स्थिती । हृदयीं प्रगटली चिच्छक्ती । मावळली अविद्येची राती । बोधगभस्ति उगवला ॥ २४ ॥ जेथ छेदिला अभिमान । तेथें कामादि वैरी निमाले जाण । जेवीं शिर छेदिल्या करचरण । सहजें जाण निमाले ॥ २५ ॥ यापरी तूं अरिमर्दन । बोलिलों तें सत्य जाण । ऐकोनि अवधूतवचन । सुखसंपन्न नृप जाला ॥ २६ ॥ म्हणे धन्य धन्य मी सनाथ । मस्तकीं ठेविला हस्त । प्रेमें वोसंडला अवधूत । हृदयीं हृदयांत आलिंगी ॥ २७ ॥ दोघां निजात्मबोधें जाली भेटी । यालागीं खेवा पडली मिठी । तेणें आनंदें वोसंडे सृष्टी । सभाग्यां भेटी सद्गुरूसी ॥ २८ ॥ बाळका कीजेति सोहळे । तेणें निवती जननीचे डोळे । शिष्यासी निजबोधू आकळे । ते सुखसोहळे सद्गुरूसी ॥ २९ ॥ करितां दोघांसीं संवादु । वोसंडला परमानंदु । पुढील कथेचा संवादु । अतिविशदु सांगत ॥ २३० ॥

यथोर्णनाभिर्हृदयादूर्णां सन्तत्य वक्त्रत । यथा विहृत्य भूयस्तां ग्रसत्येवं महेश्वरः ॥ २१ ॥

ऊर्णनाभि म्हणजे कांतिणी । हृदयतंतु मुखेंकरूनी । विस्तारी बाहेर काढूनी । निजगुणीं स्वभावें ॥ ३१ ॥ त्या विस्तारिल्या तंतूवरी । तळीं आणि उपरी । आपणचि क्रीडा करी । नानापरी खलीला ॥ ३२ ॥ तंतुविस्तारें खेळती लीला । प्रत्यक्ष देखतांचि डोळां । ग्रासूनि ने हृदयकमळा । अद्वैतकळा दाखवी ॥ ३३ ॥ याचि रीतीं सर्वेश्वरू । एकला रची संसारू । अति करूनि संहारू । उरे निर्विकारू निजात्मा ॥३४ ॥ या लक्षणाचा निर्धारु । धरूनि ऊर्णनाभी केला गुरु । आतां सारुप्यतेचा विचारू । पेशस्कारू गुरु म्यां केला ॥ ३५ ॥

विरक्तीनें अभिमानाचा गर्व तोडून टाकिला आहेस. २३ तुझी वृत्ति पालटलेली दिसत आहे. तुझ्या अंतःकरणांत चिच्छक्ति प्रकाशली आहे. अविद्येची रात्र संपून ज्ञानसूर्य उगवला आहे. २४ शिरच्छेद केला असतां हात-पाय जसे आपोआपच लुले पडतात, त्याचप्रमाणें अभिमानाचा छेद केला कीं, कामादि शत्रूंचा नाश झालाच असें समजावें. २५ याप्रमाणें मी जें तुला ' अरिमर्दन ' म्हटलें तें सत्यच आहे. हें अवधूताचें वचन ऐकून राजाला संतोष झाला २६ व तो म्हणाला कीं, मी धन्य धन्य व सनाथ आहे. अवधूतालाहि प्रेमाचें भरतें आलें, त्यानें राजाच्या मस्तकावर हात ठेविला व त्याला दृढ आलिंगन दिलें. २७ आत्मज्ञानानें त्या दोघांचें तादात्म्य झालें. दोघांनीं एकमेकांस आलिंगिलें. त्यामुळें त्यांना सर्व सृष्टि आनंदमय झाली. कारण भाग्यवानासच सद्गुरूची भेट होत असते. २८ जसें मुलाचें कौतुक केलेलें पाहून मातेच्या डोळ्यांचें पारणें फिटतें तसेंच शिष्याला आत्मबोध झाला म्हणजे सद्गुरूला अत्यंत सुख होतें. २९ याप्रमाणें त्या दोघांचा संवाद चालला असतां परमानंदाचा पूर वाहूं लागला आणि अवधूत पुढील कथेचा भाग अधिक स्पष्ट करून सांगूं लागला. २३०.

—याप्रमाणें अवधूत शिकलेला अर्थ सांगून त्याविषयीं दृष्टान्त सांगतो—

यथा ऊर्णनाभिः हृदयान् ऊर्णां वक्त्रतः सन्तत्य तया विहृत्य भूयः तान् ग्रसति—ज्याप्रमाणें कोळी हृदयांतून वर काढिलेल्या तंतूंना मुखाच्या द्वारां पसरून व त्या तंतूंच्या जाळ्यावर क्रीडा करून पुनः त्यांचा स्वशरीरांतच उपसंहार करितो, **एवं महेश्वरः**—त्याप्रमाणें महेश्वर स्वतःपासूनच विश्व निर्माण करून, त्यांत विहार करून, शेवटीं स्वरूपांत त्याचा उपसंहार करितो. २१.

ऊर्णनाभि म्हणजे नाभींतून तंतु काढणारा कोळी. तो आपल्या स्वभावाप्रमाणें आपल्या अंगांतील तंतु तोंडांतून काढून त्याचा विस्तार करितो ३१ आणि त्या पसरलेल्या जाळ्यावर खालीं-वर नाचून नानाप्रकारें स्वतःशींच खेळत असतो. ३२ आपल्याला बाह्य दृष्टीनें तो कोळी तंतूंचें जाळें करून त्यावर खेळत असलेला दिसतो, पण त्याच्या त्या लीलेचा अंतर्दृष्टीनें विचार करूं लागलें असतां तो आपल्याला अद्वैतभावच दाखवीत असतो, ३३ याचप्रकारें सर्वेश्वर स्वतःच प्रपंचाची रचना करितो व स्वतःच त्याचा नाश करून आत्मस्वरूपानें निर्विकार होऊन उरतो. ३४ या लक्षणांवरून मीं कांतिणीला गुरु केलें. नंतर सायुज्यतेचा विचार करण्यासाठीं मीं कुंभारणीला गुरु केलें. २३५.

यत्र यत्र मनो देही धारयेत्सकलं धिया । स्नेहाद्द्वेषाद्भयाद्वापि याति तत्तत्सरूपताम् ॥ २२ ॥

काया वाचा आणि मन । पुरुषें एकाग्र करून । जे जे वस्तूचें करी ध्यान । तद्रूप जाण तो तो होय ॥ ३६ ॥ स्नेहें द्वेषें अथवा भयें । दृढ ध्यान जेणें होये । तेणेंचि तद्रूपता लाहे । उभवूनि बाहे सांगतू ॥ ३७ ॥ देह गेलिया तद्रूपता । होईल हें वचन वृथा । येणेंचि देहें येथें असतां । तद्रूपता पाविजे ॥ ३८ ॥

कीटः पेशस्कृतं ध्यायन् कुड्यां तेन प्रवेशितः । याति तत्सात्मतां राजन्पूर्वरूपमसंत्यजन् ॥ २३ ॥

भिंगुरटी कीटकीतें धरी । कोंडी भिंतीमाजिले घरीं । ते मरणभयें ध्यान करी । निरंतरीं भ्रमरीचें ॥ ३९ ॥ तेणें तीव्रध्यानें ती कीटी । होऊनि ठाके भिंगुरटी । गगना चढे उठाउठी । प्रत्यक्ष दृष्टीं देखिजे ॥ २४० ॥ भिंगुरटी जड असंत । मूढ कीडी तिचें ध्यान करीत । तेणें तद्रूपता प्राप्त । तैसा भगवंत तंव नव्हे ॥ ४१ ॥ तो अज चिद्रूप सुखदाता । ज्ञाता अधिकारी ध्यानकरिता । तेथ तद्रूपता पावतां । विलंबू सर्वथा पैं नाहीं ॥ ४२ ॥ कीटकीस भ्रमरत्व जोडे । हें तीव्रध्यानें न घडतें घडे । विचारितां दोन्ही मूढें । जड जडें वेधिलें ॥ ४३ ॥ भगवद्ध्यान नव्हे तैसें । ध्याता भगवद्रूपचि असे । ध्यानें भ्रममात्र नासे । अनायासें तद्रूप ॥ ४४ ॥ येणें देहें याचि वृत्तीं । आपुली आपण न जाण मुक्ती ।

—भगवानाच्या ध्यानामध्यें तत्पर झालेल्या भक्तांना भगवानाचें सारूप्य प्राप्त होणें यांत कांहीं आश्चर्य नाहीं, हें मी एका जातीच्या भ्रमरापासून शिकलों असें अवधूत सांगतो—

देही धिया स्नेहात् द्वेषात् भयात् वा अपि यत्र यत्र सकलं मनः धारयेत्—हा जीव आपल्या निश्चित बुद्धीनें, स्नेहामुळें द्वेशामुळें किंवा भयामुळेंहि आपलें एकाग्र मन ज्या ज्या विषयामध्यें स्थिर करितो, तत्तत्सरूपतां याति—त्या त्या पदार्थाच्या सरुपतेस प्राप्त होतो. २२.

मनुष्य काया-वाचा-मनानें ज्या वस्तूचें एकाग्रतेनें ध्यान करितो, तद्रूपच तो बनतो, असें जाण. ३६ स्नेह, द्वेष किंवा भय यांच्यामुळें ज्या वस्तूचा सतत ध्यास लागतो, त्या ध्यासानेंच त्याला तद्रूपत्व प्राप्त होतें, असें अवधूत हात वर करून सांगतो. ३७ देह पडल्यावर मग तद्रूपत्व लाभेल हें म्हणणें व्यर्थ आहे. कारण प्राणी याच देहांत व याच लोकीं तद्रूपत्व पावतो. २३८.

राजन् कुड्यां तेन प्रवेशितः कीटः पेशस्कृतं ध्यायन्—हे राजा ! कुंभारीण माशीनें भिंतीवर आपलें घर करून त्यांत आणून ठेविलेला किडा तिचें ध्यान करीत, पूर्वरूपं असंत्यजन् तत्सात्मतां याति—आपलें पूर्वरूप न टाकितांच त्या कुंभारणीच्या सारूप्यास प्राप्त होतो. [कीट त्याच देहानें जर दुसऱ्याच्या सारूप्याला प्राप्त होतो तर उपासक देहान्तरानें भगवानाच्या स्वरूपास प्राप्त होईल, यांत काय नवल आहे.] २३.

भिंगुरटी म्हणजे कुंभारीण माशी. ती मातीचें घर करिते, म्हणून तिला कुंभारीण म्हणतात. ती एक आळी धरून आणिते व त्या भिंतीवर बांधलेल्या आपल्या घरांत तिला कोंडून ठेविते. त्यामुळें त्या आळीला मरणाच्या भीतीनें रात्रंदिवस कुंभारणीचाच ध्यास लागून रहातो. ३९ अशा सतत ध्यासानें ती आळी स्वतःच कुंभारीण होते व तत्काळ आकाशांत उडून जाते हें आपण प्रत्यक्ष डोळ्यांनीं पहातों. २४० कुंभारीण जड व नश्वर, तिचें ध्यान करूनहि मूढ आळी तद्रूप बनते. परंतु भगवान् तसा नाहीं. ४१ तो अजड, चिद्रूप, सुख देणारा आहे. त्याचें ध्यान जाणत्या अधिकाऱ्यानें केल्यास तो तत्काल तद्रूप होतो. त्याला क्षणाचाहि विलंब लागत नाहीं. ४२ आळीला माशीचा आकार प्राप्त होतो, यावरून तीव्र ध्यानानें न घडणारी गोष्टहि घडून येते. वास्तविक विचार केला असतां त्या दोघी मूढ, जडाला जडाचीच प्राप्ति झाली, ४३ परंतु भगवानाचें ध्यान मात्र तसें नाहीं. कारण ध्यान करणारा भगवद्रूपच असतो. पण ध्यानानें त्याचा ‘ मी देही ’ हा भ्रम मात्र नाहींसा होतो व मग तो सहजच तद्रूप बनतो. ४४ ज्याला याच देहांत व याच लोकीं स्वतःच स्वतःला मुक्त करण्याचें कळत नाहीं व ज्याला भगवत्प्राप्ति करून

न घेवे भगवत्पदप्राप्ती । तैं वृथा व्युत्पत्ती नरदेहीं ।। ४५ ।। वृथा त्याचें ज्ञान ध्यान । वृथा त्याचें यजन याजन । वृथा त्याचें धर्माचरण । चैतन्यघन जरी नोहे ।। ४६ ।।

एवं गुरुभ्य एतेभ्य एषा मे शिक्षिता मतिः । स्वात्मोपशिक्षितां बुद्धिं शृणु मे वदतः प्रभो ।। २४ ।।

अवधूत म्हणे यदूसी । इतुकिया गुरूंपाशीं । मी शिकलों जें जें मतीशीं । तें तुजपाशीं सांगितलें ।। ४७ ।। निजबुद्धीचिया व्युत्पत्ती । कांहींएक शिकलों युक्ती । तेंही सांगेन तुजप्रती । अनन्यप्रीतीं स्वभावें ।। ४८ ।। चोवीस गुरूंचाही गुरु । विवेकवैराग्यविचारू । हा नरदेहीं लाधे सधरू । यालागीं मुख्य गुरू नरदेहो ।। ४९ ।।

देहो गुरुर्मम विरक्तिविवेकहेतुर्बिभ्रत्स्म सत्त्वनिधनं सततार्त्युदर्कम् ।
तत्त्वान्यनेन विमृशामी यथा तथापि पारक्यमित्यवसितो विचराम्यसङ्गः ।। २५ ।।

देहासी जें गुरुत्व जाणा । तें दों प्रकारीं विचक्षणा । सांगेन त्याच्या लक्षणा । संरक्षणा परमार्था ।। २५० ।। देहाऐसें वोखटें । पृथ्वीमाजीं नाहीं कोठें । देहाऐसें गोमटें । पाहतां न भेटे त्रिलोकी ।।५१।। वोखटें म्हणोनि त्यागावें । तें मोक्षसुखासी नागवावें । हो कां गोमटें म्हणोनि भोगावें । तैं अवश्य जावें नरकासी ।। ५२ ।। तरी हें त्यागावें ना भोगावें मध्यभागें विभागावें । आत्मसाधनीं राखावें । निजस्वभावें हितालागीं ।। ५३ ।। जैसें भाडियाचें घोडें । आसक्ति सांडोनि पुढें । येणेंवरी नेणें घडे । स्वार्थचाडेलागूनी ।। ५४ ।। हेतू ठेवूनि परमार्था । गेहीं वस्तीकरून जेवीं उखिता । देहआसक्तीची कथा ।

घेववत नाहीं, त्याचा जन्म व्यर्थ होय. ४५ चैतन्यघन झाल्यावांचून त्याचें ज्ञान-ध्यान, यज्ञ-याग, पूजा-अर्चा इत्यादि सर्व व्यर्थ आहे. २४६.

एवं एतेभ्यः गुरुभ्यः एषा मतिः मे शिक्षिता—याप्रमाणें या चोवीस गुरूंपासून हें ज्ञान मी शिकलों. (आतां स्वदेहापासूनच काय शिकलों, तें सांगतो.) प्रभो—हे राजा ! स्वात्मोपशिक्षितां बुद्धिं वदतः मे शृणु—आतां मी स्वदेहापासून काय शिकलों, तें सांगतों, ऐक. २४.

अवधूत यदूला म्हणाला, इतक्या गुरूंपासून मी जें जें यथामतीं शिकलों तें तें सर्व तुला सांगितलें. ४७ आतां स्वतःच्याच बुद्धिसामर्थ्यानें मी जें कांहीं शिकलों, तेंहि तुला स्वभावतःच अनन्य प्रीतीनें सांगतों, ४८ आत्मानात्मविवेक आणि वैराग्य यांचा विचार हा चोवीस गुरूंचाहि गुरु आहे. तो या नरदेहांतच पूर्णपणें लाभतो. म्हणून नरदेह हाच मुख्य गुरु आहे. २४९.

देहः मम गुरुः—देह माझा गुरु आहे. कारण तो, विरक्तिविवेकहेतुः—वैराग्य व विवेक यांचें निमित्त आहे. (त्याचें विरक्तिहेतुत्वच सांगतात—) सत तार्त्युदर्कं सत्त्वानिधनं बिभ्रत् स्म—तो संतत दुःख हेंच ज्यांचें उत्तरफल आहे असें जन्म व मरण यांना धारण करितो. (आतां विवेकहेतुत्व सांगतो-) अनेन तत्त्वानि यथा विमृशामि—या देहाच्या योगानें मी तत्त्वांचा पूर्णपणें विचार करितों (याप्रमाणें देहाला उपकारित्व जरी आहे तरी त्यावर आस्था करूं नये असें सांगतात—) तथापि पारक्यं इति अवसितः असंगः विचरामि—तरीपण, हा देह कोल्हीं, कुत्रीं इत्यादिकांचें भक्ष्य होणारा आहे, असा माझा निश्चय झालेला असल्यामुळें मी त्यावर आसक्ति न ठेवितां संचार करितों. २५.

हे बुद्धिमान् राजा ! देहाला दोन प्रकारांनीं श्रेष्ठत्व आलें आहे. परमार्थ रक्षणासाठीं मी तुला त्याच्या खुणा सांगतों. २५० सगळ्या जगांत देहासारखें वाईट दुसरें कांहीं नाहीं. पण विचार केला असतां देहासारखें चांगलेंहि दुसरें कांहीं त्रिभुवनांत सांपडत नाहीं. ५१ वाईट म्हणून देहाचा त्याग करावा तर मोक्षसुख पारखें होतें. बरें, चांगला म्हणून देहानें भोग घ्यावा तर नरकाची प्राप्ति अवश्य होते. ५२ करितां याचा त्यागहि करूं नये व भोगहि घेऊं नये. तर या दोन अवस्थांच्या मध्येंच त्याला ठेवावा. आपल्या हितासाठीं त्याला आत्मसाधनांत लावावा. ५३ ज्याप्रमाणें भाड्याचें तट्टु आपल्या स्वार्थापुरतें मुक्कामापर्यंत तेवढें नेतों व पुढें त्याची आसक्ति धरीत नाहीं, ५४

बुद्धीच्या पंथा येवों नेदीं ॥ ५५ ॥ देहाची नश्वर गती । नश्वरत्वें उपजे विरती । नाशवंताची आसक्ती । मुमुक्षु न करिती सर्वथा ॥ ५६ ॥ जेणें उपजे विरक्ती । तो विवेक जाणावा निश्चितीं । एवं विवेकवैराग्यप्राप्ती । निजयुक्तीं नरदेहीं ॥ ५७ ॥ इतर देहांच्या ठायीं । हा विचारूचि नाहीं । केवळ शिश्नोदर पाहीं । व्यवसावो देही करिताती ॥ ५८ ॥ यालागीं नरदेह निधान । जेणें ब्रह्मसायुज्यीं घडे गमन । देव वांच्छिती मनुष्यपण । देवाचें स्तवन नरदेहा ॥ ५९ ॥ म्हणसी नरदेह पावन । परी तो अत्यंत निंद्य जाण । योनिद्वारें ज्याचें जनन । पाठींच मरण लागलेंसें ॥ २६० ॥ जंव जन्मलेंचि नाहीं । तंव मरण लागलें पाहीं । गर्भाच्याचि ठायीं । मरणघायीं धाकती ॥ ६१ ॥ एवं या देहासरिसा । नित्य मृत्यु लागला कैसा । पोषूनियां बालवयसा । तारुण्यासरिसा लागला ॥ ६२ ॥ विसरोनियां आत्ममरण । तारुण्य चढलें जी दारुण । चतुर शाहणा सज्ञान । बळें संपूर्ण मी एकू ॥ ६३ ॥ त्या तारुण्याची नवाळी । देऊनि फेडितां काळ गिळी । मग जरा जर्जरित मेळीं । मरणकाळीं पातली ॥ ६४ ॥ धवलचामरेंसीं आलें जाण । जरा मृत्यूचें प्रस्थान । मागूनि यावया आपण । वेळा निरीक्षण करीतसे ॥ ६५ ॥ सर्वांगीं कंपायमान । तो आला मृत्युव्यजन । मान कांपे तो जाण । डोल्हारा पूर्ण मृत्यूचा ॥ ६६ ॥ दांत पाडूनि सपाट । काळें मोकळी केली वाट । मृत्युसेनेचा घडघडाट । वेगीं उद्भट रिघावया ॥ ६७ ॥ पाठी जाली दुणी । तेचि मृत्यूची निशाणी । दोनीं कानीं खिळे देऊनी । सुबद्ध करूनि बांधिली ॥ ६८ ॥ येतिया मृत्यूसी पुढारें । नयनतेज धांवे सामोरें । मग न्याहाळतीना अक्षरें । अंजनोपचारें शिणतांही ॥ ६९ ॥ उभळीचा उजगरा । उबगु सेजारिल्या घरा । म्हणती न मरे हा म्हातारा । बाळाची निद्रा मोडितो ॥ २७० ॥ देखोनि मृत्यूची

त्याप्रमाणेंच परमार्थाकडे दृष्टि ठेवून एखाद्या प्रवाशाप्रमाणेंच देहांत रहावें. देहावरील आसक्तीचा विचार मनांतहि येऊं देऊं नये. ५५ देहाची स्थिति नश्वर आहे व त्यामुळेंच त्याविषयीं वैराग्य येतें. नाशवंत वस्तूंवर मुमुक्षु केव्हांहि आसक्ति ठेवीत नाहींत. ५६ ज्याच्या योगानें विरक्ति उत्पन्न होते तोच विवेक समजावा. विवेक-वैराग्याची प्राप्ति स्वतःच्या बुद्धीनें नरदेहांतच होते. ५७ इतर देहांमध्यें हा विचारच नाहीं. ते केवल उदरभरण व प्रजोत्पादन इतकाच व्यवसाय करितात. ५८ यास्तव नरदेह हा ठेवा आहे. त्याच्या योगें ब्रह्मसायुज्यांत जातां येतें. देवहि मनुष्यजन्माची इच्छा करितात. ते नरदेहाची मोठी स्तुति करितात. ५९ म्हणून हा नरदेह पवित्र आहे, असें जर म्हणशील तर तो अतिशय निंद्यहि आहे. कारण त्याचा जन्म योनिद्वारां होतो व मरण त्याच्या पाठीस लागलेलें असतें. २६० जन्मलें नाहीं तोंच मरण तयारच असतें. गर्भांतच मरणाचा धाक पडलेला असतो. ६१ सारांश मृत्यु देहाबरोबरच कसा हजर असतो तें पहा! अगदीं बालवयापासून तारुण्यापर्यंत रात्रंदिवस तो प्राण्यांच्या अगदीं शेजारीं बसलेला असतो. ६२ असें असतांहि त्या मरणाला विसरून तारुण्यांत मनुष्य इतका उन्मत्त होतो कीं, मीच काय तो एक चतुर, शहाणा, ज्ञानी व बलाढ्य आहें, असें तो समजतो. ६३ पण काळ त्या तारुण्याच्या भराला गिळून टाकितो. मग वृद्धत्व येऊन जरेनें जर्जर झाल्यावर मरणकाळ येऊन ठेपतो. ६४ जरा म्हणजे पांढऱ्या केशांच्या रूपानें आलेलें मृत्यूचें निमंत्रणच आहे. तो स्वतः मागून येण्यासाठीं काळाची वाट पहात बसतो. ६५ म्हातारपणानें सर्वांग कांपूं लागलें म्हणजे तो मृत्यूचा पंखाच त्याला वारा घालून हलवितो, असें समजावें. मान डगमगूं लागली म्हणजे तो मृत्यूचा डोल्हारा जाणावा. ६६ मृत्यूच्या सर्व सैन्याला भराभर जातां यावें म्हणून काळ दांत पाडून सगळा रस्ता सपाट करून ठेवितो. ६७ पाठ वांकून पोंक येतें, तोच मृत्यूचा नगारा. दोन्हीं कानांत दट्टे देऊन त्यांना तो मजबूत बांधून ठेवितो. ६८ मृत्यु समोरून येत आहे म्हणून डोळ्यांचें तेज अगोदरच त्याला समोर जातें व मग डोळ्यांत वाटेल तेवढें अंजन, काजळ वगैरे घालून उपचार केले तरी त्याला एक अक्षरहि दिसत नाहीं. ६९ त्याच्या खोकल्याच्या ढांसीमुळें शेजारच्या लोकांना रात्रभर जागरण होतें व ते त्रासून म्हणतात कीं, म्हातारा एकदांचा मरतहि नाहीं. उगीच आपच्या मुला-बाळांची झोंप मोडतो! २७० मृत्यूची धाड आलेली दिसतांच पायांत

धाडी । पायां वळतसे वेंगडी । जिव्हेसी चांलली बोबडी । तुटल्या नाडी सर्वांगीं ॥ ७१ ॥ मरण न यतां जाण । थोर जरेचें विटंबन । विमुख होती स्त्रीपुत्रजन । अतिदीन ते करी ॥ ७२ ॥ जन्मवरी सायासीं । प्रतिपाळिलें जयांसी । तींचि उबगलीं त्यासी । जरेनें देहासी कवळिल्या ॥ ७३ ॥ जरा लागलिया पाठीं । कोणी नाइके त्याच्या गोष्टी । विटाबों लागलीं धाकुटीं । कुतरीं पाठीं भुंकती ॥ ७४ ॥ शाहाणीं सांगती अबलांसी । बागुल आला म्हणती वृद्धासी । निसुर पडों नेदी ढांसी । कासाविसी होतसे ॥ ७५ ॥ 'म्हतारा हो' हा आशीर्वाद । दीधला तेंही केलें द्वंद्व । जरेएवढें विरुद्ध । आणिक द्वंद्व तें नाहीं ॥ ७६ ॥ ऐसी जरेची जाचणी । देखोनियां तरुणपणीं । हेचि दशा मजलागूनी । हात धरूनी येईल ॥ ७७ ॥ देहो तितुका षड्विकारी । कोटि अनर्थ एकेके विकारी । षडूर्मी लागल्या भीतरीं । जेवीं अग्नीवरी घृतधारा ॥ ७८ ॥ या दुःखाचें जें मूळ । तें देहाचें आळवाळ । देहो वाढवितां दुःख प्रबळ । उत्तरफळ महादुःख ॥ ७९ ॥ एवं देहाची जे संगती । ते निरंतर दुःखप्राप्ती । यापरी सांडावी आसक्ती । हेतु विरक्ती देहगुरु ॥ २८० ॥ या देहाचेनि साधनें । अविनाश पद पावणें । याहीपरी येणें गुणें । गुरुत्व म्हणणें देहासी ॥ ८१ ॥ देह उपकारी अपकारी । यासी गुरुत्व दोन्हीपरी । येथ विवंचूनि चतुरीं । निजहित करी तो धन्य ॥ ८२ ॥ करितां तत्त्वविवेचन । देहाचें मूळ तें अज्ञान । निजरूपाचें अदर्शन । तेंचि भान प्रकृतीचें ॥ ८३ ॥ प्रकृतीस्तव त्रिगुणसूत्र । त्रिगुणीं त्रिविध अहंकार । येथूनि महद्भूतविकार । इंद्रियव्यापार देहेंसीं ॥ ८४ ॥ एवं पिंडब्रह्मांडखटाटोप । हा अवघाचि आरोप । दोरू जाला नाहीं साप । भ्रमें सर्प तो म्हणती ॥ ८५ ॥ पाहतां देहाचें मूळ । भासे

पाय अडखळतात, जीभ बोबडी पडते व सर्वांगांतील नाड्या सुटतात. ७१ मरण जर लवकर आलें नाहीं तर म्हातारपणची विटंबना फार भयंकर असते. स्त्री-पुत्रादिक सर्व त्याचा अनादर करितात. तेव्हां तो अगदीं दीन होऊन पडतो. ७२ जन्मभर मोठ्या प्रयासानें त्यानें ज्यांचा प्रतिपाळ केला, तींच माणसें त्याला म्हातारपण येतांच कंटाळतात. ७३ म्हातारपण आलें कीं त्याचें बोलणेंहि कोणी नीटपणीं ऐकून घेत नाहींत. मुलें वाकुल्या दाखवितात व कुत्रीं भुंकत त्याच्या पाठीस लागतात. ७४ मोठीं माणसें वृद्धाकडे बोट दाखवून मुलांना 'हा पहा बागुलबुवा आला' असें सांगतात व खोकल्याची ढांस त्याला क्षणभरहि स्वस्थ पडूं देत नाहीं. त्याचा जीव कासावीस होतो. ७५ 'म्हातारा हो' असा जो आशीर्वाद देतात तेंहि एक विघ्नच आहे. कारण म्हातारपणासारखी कष्टकर अवस्था दुसरी कोणतीहि नाहीं. ७६ म्हातारपणाची ही व्यथा पाहून 'पुढें हीच दशा माझ्याहि पाठीस लागेल' असें तरुणपणीं समजावें. ७७ जेवढें शरीर तेवढें सहा विकारांनीं युक्त आहे. प्रत्येक विकारांत कोट्यवधि अनर्थ भरलेले आहेत आणि अग्नीवर तुपाच्या धारा जशा धराव्या तशा त्यांत सहा ऊर्मि आहेत. ७८ देहाचें आळें हेंच या सर्व दुःखांचें मूळ आहे. देहाची वृद्धि केली तर महादुःखरूपी फल भोगावें लागतें. ७९ सारांश देहाची संगति निरंतर दुःख देणारी आहे. यास्तव त्यावरील आसक्ति टाकावी. विरक्ति मनावर ठसण्यासाठीं देह हाच गुरु आहे. २८० शिवाय या देहाच्या साधनानेंच अविनाशी आत्मपद लाधतें. या गुणामुळेंहि देहाला गुरु म्हटलें पाहिजे. ८१ याप्रमाणें देह अपकार व उपकार दोन्ही करितो, म्हणून त्याला दोन्ही प्रकारें गुरुत्व आहे. याचा शहाणपणानें विवेक करून जो आत्महित साधितो, तोच धन्य होय. ८२ तत्त्वविचारानें पाहिलें असतां अज्ञानच देहाचें मूळ आहे. आत्मस्वरूपाला न पहाणें हाच मायेचा उदय. ८३ मायेपासून तीन गुण उत्पन्न होतात. त्रिगुणापासून सात्त्विक, राजस व तामस हे तीन प्रकारचे अहंकार उद्भवतात. त्यांपासून महाभूतांचा विकार उत्पन्न होतो व देहासह इंद्रियांचे व्यापार चालतात. ८४ भ्रमानें ज्याप्रमाणें दोरीला साप समजावें, त्याचप्रमाणें हा पिंड-ब्रह्मांडाचा खटाटोप निव्वळ आरोप आहे. ८५ देहाचें मूळ पाहूं गेल्यास तें मृगजलासारखें भासतें. सर्व भ्रमाचें राज्य पसरलें आहे व परब्रह्मावर हा केवळ आरोप

जैसें मृगजळ । भ्रमाची राणीव प्रबळ । हा आरोपचि केवळ वस्तूचे ठायीं ॥ ८६ ॥ नसतें देह आभासे जेथें । आरोपू म्हणणें घडे त्यातें । आतां सांगेन अपवादातें । सावचित्तें परियेसीं ॥ ८७ ॥ देह पांचभौतिक प्रसिद्ध । तो मी म्हणणें हें अबद्ध । देहो मलिन मी शुद्ध अतिविरुद्ध या आम्हां ॥ ८८ ॥ पृथ्वी मी नव्हें जडत्वें । जळ मी नव्हें द्रवत्वें । तेज मी नव्हें दाहकत्वें चंचलत्वें नव्हें वायू ॥ ८९ ॥ नभ मी नव्हें शून्यत्वें । अहं मी नव्हें दृश्यत्वें । जीव नव्हें मी परिच्छिन्नत्वें । माया मिथ्यात्वें मी नव्हें ॥ २९० ॥ देह नव्हें नश्वरत्वें । विषय नव्हें मी बाधकत्वें । या तत्त्वां आणि मातें । संबंधू येथें असेना ॥ ९१ ॥ ब्रह्माहमस्मि अभिमान । हंसपरमहंसांसी मान्य । तें सत्वावस्थेचें साधन । तोही अभिमान मी नव्हें ॥ ९२ ॥ जितुका तत्त्वांचा अनुवादु । तितुका मजवरी अपवादू । हा माझा बुद्धीचा बोधू । तुज म्यां यदू सांगीतला ॥ ९३ ॥ हें माझें गुप्त ज्ञान । तुझें देखोनि अनन्यपण । केलें गा निरूपण । भावें संपूर्ण तूं भावार्थी ॥ ९४ ॥ येरवीं करावया हे कथा । मज चाड नाहीं सर्वथा । परी बोलवीतसे तुझी आस्था । नृपनाथा सभाग्या ॥ ९५ ॥ ऐशिया संवादाचे समेळीं । अद्वैतबोधें पिटिली टाळी । दोघे आनंदकल्लोळीं । ब्रह्मसुकाळीं मातले ॥ ९६ ॥ ऐसा उपकारी देखा । या देहासारिखा नाहीं सखा । म्हणसी राखावा नेटका । तंव तो पारका मुळींची ॥ ९७ ॥ यासी अत्यंत करितां जतन । दिसे विपरीत निदान । श्वानशृगालांचें भोजन । का होय भक्षण अग्नीचें ॥ ९८ ॥ या दोहीं गतींवेगळें पडे । तरी सुळबुळीत होती किडे । चौथी अवस्था यासी न घडे । हें तूंही रोकडें जाणशी ॥ ९९ ॥ यालागीं देहाची आसक्ती । मी न धरीच गा नृपती । निःसंगु विचरतसें क्षितीं । आत्मस्थितीचेनि बोधें ॥ ३०० ॥ देहासी उपभोगसाधनें । तितुकीं जाण पां बंधनें । दृढ वासना तेणें । अनिवारपणें वाढते ॥ १ ॥

आहे. ८६ नसलेला आकार भासणें, यालाच आरोप असें म्हणणें भाग आहे. त्याचा अपवाद तुला आतां सांगतों, तो एकाग्रतेनें ऐक. ८७ देह पंचभूतांचा बनतो, हें प्रसिद्ध आहे. त्या देहाला 'मी' असें म्हणणें गैर आहे. किंवा देह मलिन आहे व 'मी' शुद्ध आहें हें म्हणणेंहि आम्हांला विरुद्धच वाटतें. ८८ मी पृथ्वी नव्हें, कारण ती जड आहे. मी जल नाहीं, कारण त्याला द्रव आहे. मी तेज नाहीं, कारण त्याला दाहकत्व आहे. मी वायु नाहीं, कारण तो चंचल आहे. ८९ मी आकाश नाहीं, कारण तें शून्य आहे. 'अहं' मी नाहीं, कारण त्याला दृश्यत्व आहे. जीव मी नव्हें, कारण तो मर्यादित आहे. मी माया नव्हें, कारण ती मिथ्या आहे. २९० देह मी नव्हें, कारण तो नश्वर आहे. मी विषय नाहीं, कारण तो बाधित होतो. या सर्व तत्त्वांचा माझा कांहीं संबंध नाहीं. ९१ 'ब्रह्माहमस्मि' म्ह० मी सच्चिदानंदरूप परमात्मा आहें, असा अभिमान मोठमोठ्या हंस-परमहंसांना म्ह० ब्रह्मनिष्ठ संन्याशांनाहि असतो. तें सत्त्वावस्थेचें साधन आहे, पण तो अभिमानहि मी नव्हें. ९२ तत्त्वांचा जेवढा अनुवाद केला म्ह० शाब्दिक विचार सांगितला त्या सर्वांचा माझ्या ठिकाणीं अभाव आहे. हें यदुराजा! माझ्या चित्ताला जो बोध झाला तो मीं तुला सांगितला. ९३ तुझी अनन्यभक्ति पाहून व तूं भावार्थी आहेस म्हणून हें माझें गुप्तज्ञान मीं सविस्तर सांगितलें. ९४ एरवीं ही कथा सांगण्याची मला कांहींच गरज नव्हती. पण हे भाग्यवान् नृपश्रेष्ठा! तुझ्या आस्थेनें मला बोलावयास लाविलें. ९५ त्यांच्या संवादाच्या एकतानतेंत त्यांनीं अद्वैतज्ञानानें टाळी वाजविली. ते दोघेहि आनंदातिशयानें ब्रह्मस्वरूपांत तल्लीन झाले. ९६ या देहासारखा उपकार करणारा दुसरा मित्र नाहीं, म्हणून त्याला व्यवस्थित ठेवावें, असें जर म्हणशील तर तो मूळचाच परका आहे. ९७ त्याला अतिशय जपावयास जावें तर भलताच परिणाम होतो. तो कोल्हयाकुत्र्यांच्या भक्षस्थानीं पडतो किंवा अग्नीच्या मुखांत पडतो. ९८ त्या दोहोंतून जर सुटला तर किड्यांनीं बुजबुजतो. या तींहि खेरीज चवथी अवस्था त्याला नाहीं हें तूंहि चांगलें जाणतोस. ९९ यासाठीं हे राजा! मी देहावर आसक्ति ठेवीत नाहीं. आत्मज्ञानानें मी निःसंग होऊन पृथ्वीवर फिरत असतों. ३०० देहाच्या उपभोगाचीं जेवढीं साधनें आहेत, तेवढीं सगळीं बंधनें आहेत, असें समज. त्यांच्या योगानें प्रबल वासना अनिवार वाढते. ३०१.

जायात्मजार्थपशुभृत्यगृहाप्तवर्गान्पुष्णाति यत्प्रियचिकीरषया वितन्वन् ।
स्वान्ते सकृच्छ्रमवरुद्धधनः स देहः सृष्ट्वाऽस्य बीजमवसीदति वृक्षधर्मः ॥ २६ ॥

देहभोगीं मुख्य गोडी । स्त्रीभोगाची अतिआवडी । सर्वस्व वेंचोनी जोडी । आणी रोकडी योषिता ॥ २ ॥ स्त्री हातीं धरितां देख । वाढे प्रपंचाचें थोर दुःख । गृह पाहिजे आवश्यक । भोगार्थ देख स्त्रियेच्या ॥ ३ ॥ त्या गृहाचे गृहसिद्धी । पाहिजे धनधान्यसमृद्धी । जाली प्रजांची वृद्धी । तेणें अतिआधी अनिवार ॥ ४ ॥ त्या प्रजांचा अतिलालसू । दासदासी मेळवी पशू । थोर कष्टांचा पडे सोसू । सुखलेशू पैं नाहीं ॥ ५ ॥ व्याहीजांवयांच्या वोढी । आप्तवर्गांचिया कोडी । पडे उचिताचिया सांकडीं । सोशितां कोरडी देहाची ॥ ६ ॥ पोसावया पोष्यांसी । रची नाना उपायराशी । हिंडे स्वदेशीं परदेशीं । अहर्निशीं व्याकुळ ॥ ७ ॥ देहासी द्यावया सुख । शतधा वाढवी दुःख । देहाभिमानें जन मूर्ख । वृथाभिलाख वाढविती ॥ ८ ॥ देहसुखाचिया चाडा । पडे परागृहाचे खोडां । दारागृहलोभें केला वेडा । न देखे पुढां निजस्वार्थू ॥ ९ ॥ देहें वाढविली प्रीती । गृह दारा पुत्र संपत्ती । तेचि वासना होय देहांतीं । देहांतराप्रती निजबीज ॥ ३१० ॥ जैसा जोंधळा कणिसा चढे । कणसींचा क्षितीवरी झडे । वाढी वाढलें झाड मोडे । तें बीज गाढें उरलेंसे ॥ ११ ॥ तेंचि बीज जलभूमीचे संगतीं । सवेंचि झाड वाढे पुढतीं । तैसी वासना उरे देहांतीं । देहान्तरप्रती न्यावया ॥ १२ ॥ त्या वृक्षाचियापरी । वासनाबीज शरीरीं । उरवूनि स्वर्गसंसारीं । योनिद्वारीं जन्मवी ॥ १३ ॥ देहीं वासना केवीं वाढे । तेंही सांगेन तुज पुढें । विषय सेवितां वाडेंकोडें । वासना वाढे अनिवार ॥ १४ ॥

—हा देह सतत दुःख हेंच फल देणारा आहे, याचाच अधिक विस्तार करितो—

यत्प्रियचिकीरषया जायात्मजार्थपशुभृत्यगृहाप्तवर्गान् वितन्वन् पुष्णाति—ज्या देहाचे इष्टभोग संपादन करण्याच्या इच्छेनें स्त्री, पुत्र, धन, वित्त, पशु, सेवक, गृह व आप्तवर्ग यांचा विस्तार करीत पुरुष त्यांचें पोषण करितो. (तो पुरुष कसा ? उत्तर—) सकृन् शं यथा भवति तथा अवरुद्धधनः सः देहः वृक्षधर्मः अस्य बीजं सृष्ट्वा स्वान्ते अवसीदति—एकदांच सुख होईल अशाप्रकारें नानाप्रकारचें धन ज्यांनीं संचित केलें आहे, असा तो देहासह वृक्षाच्या धर्माप्रमाणें ज्याचा धर्म आहे असा होत्साता अन्यदेहाचें बीज असें कर्म उत्पन्न करून आयुष्याचा क्षय झाला असतां नाश पावतो. २६.

स्त्रीसंगाची अतिशय आवड हीच देहभोगांतील मुख्य गोडी आहे. सर्वस्व खर्ची घालून पुरुष भार्या आणितो. २ परंतु स्त्रीपाणिग्रहण करितांच प्रपंचांतील दुःख फार वाढतें. स्त्रीसाठीं घर मांडणें भाग पडतें. ३ त्या घराचा प्रपंच चांगला चालण्याकरितां धन-धान्याचा पुरवठा करावा लागतो. त्यांत संततीचें प्रमाण वाढत जातें, त्यामुळें अनिवार चिंता उत्पन्न होते. ४ तो मुला-बाळांत इतका आसक्त होतो कीं, त्याच्यासाठीं नोकर, चाकर, गुरें, जनावरें वगैरे बाळगितो. त्याला अत्यंत कष्ट सोसावे लागतात. सुखाचा लेशहि मिळत नाहीं. ५ व्याही, जांवई यांच्या ओढीनें व त्यांच्या अगणित आप्तांचा मानपान करितां करितां पाठींत कोरडे ओढल्याप्रमाणें त्याची अवस्था होते. ६ त्याच्या आश्रितवर्गांचा संभाळ करण्यासाठीं तो अनेक उपाय योजित असतो व व्याकुळ होऊन देशांत व परदेशांत हिंडत राहतो. ७ याप्रमाणें देहाला सुख मिळावें म्हणून तो शतपट दुःख मात्र वाढवीत असतो. देहाभिमानानें मूर्ख लोक व्यर्थ अभिलाष वाढवितात. ८ देहसुखाच्या आशेनें तो परगृहाच्या खोड्यांत पडतो. घर व स्त्री यांच्या लोभानें तो वेडा होतो व स्वतःचा पुढील स्वार्थ पहात नाहीं. ९ घर, स्त्री, पुत्र, धन यांवरील आसक्ति देहानें वाढविली कीं, तीच मरणकाळीं वासना होते व तेंच पुढल्या जन्माचें बीज आहे. ३१० ज्याप्रमाणें जोंधळ्याला कणीस येतें, त्या कणसांतील जोंधळा खालीं पडतो, वाढलेलें कणसाचें झाड मोडून पडतें, पण मुख्य बीज जो जोंधळा तो कायम रहातो. ११ त्याच बीजापासून जमीन व पाणी यांच्या संयोगानें पुनः नवें झाड उगवतें. त्याप्रमाणें देहान्तीं वासनारूपी बीज जीवाला दुसऱ्या देहांत नेण्यासाठीं रहातें. १२ त्या झाडाप्रमाणेंच शरीरांतील वासनारूपी बीज स्वर्गांत किंवा संसारांत पुनः योनिद्वारा जन्म घ्यावयास लावितें. १३ आतां देहांत वासना कशी वाढते, तें मी तुला पुढें सांगेन. मोठ्या आसक्तीनें विषयांचा भोग घेतला म्हणजे वासना अनिवार वाढते. ३१४.

जिह्वैकतोऽमुमपकर्षति कर्हि तर्षा शिश्नोऽन्यतस्त्वगुदरं श्रवणं कुतश्चित् ।
घ्राणोऽन्यतश्चपलदृक् क्व च कर्मशक्तिर्बह्व्यः सपत्न्य इव गेहपतिं लुनन्ति ॥ २७ ॥

जिव्हा रसाकडे वोढी । तृषा प्राशनालागीं तोडी । शिश्नासी रतिसुखाची गोडी । ते चरफडी रमावया ॥ १५ ॥ त्वचा पाहे मृदुपण । उदर वांछी पूर्ण अन्न । श्रवण मागती गायन । मधुरध्वन आलापू ॥ १६ ॥ घ्राण उद्यत परिमळा । रूप पहावया वोढी डोळा । हस्त वांछिती खेळा । नाना लीळा स्वभावें ॥ १७ ॥ पाय वांछिती गती । ऐशीं इंद्रियें वोढा वोढिती । जेवीं एका गेहपती । बहुता सवती तोडिती ॥ १८ ॥ एवं इंद्रियांसी विषयासक्ती । तेणें वासना दृढ होती । त्या देहदेहान्तराप्रती । पुरुषासी नेती सर्वथा ॥ १९ ॥ यालागीं करावया विषयत्यागू । अवश्य छेदावा देहसंगू । इये अर्थीं मनुष्यदेह चांगू । ज्ञानविभागू ये देहीं ॥ ३२० ॥

सृष्ट्वा पुराणि विविधान्यजयाऽऽत्मशक्त्या वृक्षान् सरीसृपपशून् खगदंशमत्स्यान् ।
तैस्तैरतुष्टहृदयः पुरुषं विधाय ब्रह्मावलोकधिषणं मुदमाप देवः ॥ २८ ॥

हेचि जाणावया निजरूपातें । पूर्वीं तेणें श्रीअनंतें । निजमायेचेनि हातें । केलीं बहुतें शरीरें ॥ २१ ॥ एकें केलीं जें भूचरें । एकें ते केलीं खेचरें । एकें केलीं जळचरें । चरें अचरें तीं एकें ॥ २२ ॥

अमुं एकतः जिह्वा अपकर्षति—या देहाभिमानी पुरुषाला एकीकडून जिव्हा रसासाठीं ओढीत असते, कर्हि तर्षा—एखादे वेळीं तृषा त्याला जलासाठीं ओढीत असतें, शिश्नः अन्यतः—जननेंद्रिय स्पर्शसुखासाठीं ओढीत असतें. त्वक् उदरं श्रवणं कुतश्चित्—त्वक् इंद्रिय सुखावह स्पर्शासाठीं, उदर केवळ अन्नासाठीं व श्रोत्रेंद्रिय श्रवणीय शब्दासाठीं त्याला ओढीत असतें. घ्राणः च अन्यतः—घ्राण गंधासाठीं, चपलदृक्—चंचल दृष्टि रूपासाठीं, क्व च कर्मशक्तिः—इतर कर्मेंद्रियेंहि आपापल्या विषयासाठीं, बह्व्यः सपत्न्यः गेहपतिं इव लुनन्ति—याप्रमाणें अनेक सवती गृहस्थाला जशा तोडितात त्याप्रमाणें हीं सर्व इंद्रियें पुरुषाला तोडितात. २७.

जीभ मधुर रसाकडे ओढिते. तृषा पिण्यासाठीं तोडिते. जननेंद्रिय आपल्या तृप्तीसाठीं धडपड करीत असतें. १५ त्वचा मृदुत्व शोधितें. पोट भरपूर अन्नाची इच्छा करितें. कान गायनाचे मधुर आलाप ऐकण्यास लोलुप होतात. १६ नाक सुवासाकरितांच उत्सुक होतें. डोळे रूप पहावयास आतुर होतात. हात नानाप्रकारचे खेळ खेळण्याची इच्छा करितात. १७ पायाला फिरावेंसें वाटत असतें. एखाद्या गृहस्थाला पुष्कळ बायका असल्या कीं त्या सर्व सवती मिळून त्या बिचाऱ्याला जशा चोहोंकडून तोडितात, १८ त्याप्रमाणें हीं सर्व इंद्रियें मिळून जीवाची ओढाताण करितात. सारांश, इंद्रियांच्या विषयासक्तीमुळें वासना दृढ होतात व त्या पुरुषाला दुसरा जन्म घ्यावयास लावितात. १९ यास्तव विषयत्याग करण्यासाठीं प्रथम देहावरील आसक्ति टाकावी. तिचा त्याग केल्यानें स्वभावतः वाईट असलेलाहि देह चांगला होतो. कारण याच देहांत ज्ञान प्राप्त होतें. ३२०.

—याप्रमाणें तीन श्लोकांनीं विरक्ति व विवेक यांच्या हेतुत्वाचें उपपादन करून आतां या देहाचें अति दुर्लभत्व दाखविणारा अवधूत ईश्वरनिष्ठेचें विधान करितो—

अजया आत्मशक्त्या वृक्षान् सरीसृपपशून् खगदंशमत्स्यान् विविधानि पुराणि सृष्ट्वा—अनादि आत्मशक्तीच्या योगानें वृक्ष, सर्व पशु, पक्षी, डांस, मासे इत्यादि नानाप्रकारच्या शरीरांना उत्पन्न करून, तैः तैः अतुष्टहृदयः देवः—त्या त्या शरीरांनीं ज्याच्या मनाला संतोष झालेला नाहीं, असा देव, ब्रह्मावलोकधिषणं पुरुषं विधाय मुदं आप—ब्रह्माच्या साक्षात्काराला योग्य अशी बुद्धि ज्यांत आहे, अशा पुरुषशरीराला उत्पन्न करून संतुष्ट झाला. [पुरुष शरीरांतच आत्मा अधिक प्रकट झाला आहे, अशी ऐतरेय आरण्यकांत श्रुति आहे. ऐतरेय उपनिषदांतहि याविषयीं सविस्तर वर्णन आहे. ऐ. भा. २ पृ. ८६ पहा.] २८.

पूर्वीं त्याच अनंतानें या आत्मस्वरूपाला जाणण्यासाठीं आपल्या मायेच्या हातून अनेक प्रकारचीं शरीरें उत्पन्न करविलीं. २१ कांहीं भूमीवर सरपटणारीं व चालणारीं शरीरें, कांहीं आकाशांतून उडणारीं पक्ष्यांचीं शरीरें, कांहीं

वृक्ष सर्प पशु दंश । राक्षस पिशाच बक हंस । मत्स्यकच्छादि अशेष । स्रजी बहुवस योनींतें ॥ २३ ॥ ऐशा चौऱ्यायशीं लक्ष योनी । स्रजूनि पाहे परतोनी । तंव निजप्राप्तीलागोनी । न देखे कोणी अधिकारी ॥ २४ ॥ ऐशिये देखोनी सृष्टीतें । सुख न वाटेचि देवातें । मग मानवी प्रकृतीतें । आदरें बहुतें निर्मिली ॥ २५ ॥ बाहुल्यें मनुष्यदेहीं । निजज्ञान घातलें पाहीं । जेणें ज्ञानें देहीं । विदेह पाहीं पावती ॥ २६ ॥ आहार निद्रा भय मैथुन । सर्वां योनींसी समसमान । मनुष्यदेहींचें ज्ञान । अधिक जाण सर्वांशीं ॥ २७ ॥ देखोनि मनुष्यदेहासी । सुख झालें भगवंतासी । अधिकार ब्रह्मज्ञानासी । येणें देहेंसीं मत्प्राप्ती ॥ २८ ॥ पावोनियां मनुष्यपणा । जो न साधी ब्रह्मज्ञाना । तो दाढीचा मेंढा जाणा । विषयाचरणा विचरतू ॥ २९ ॥ मनुष्यदेहींचेनि ज्ञानें । सच्चिदानंदपदवी घेणें । एवढा अधिकार नारायणें । कृपावलोकनें दिधला ॥ ३३० ॥ मनुष्यदेहीं ब्रह्मज्ञान । पुढील जन्मीं मी करीन । म्हणे तो नागवला जाण । सोलींव अज्ञान त्यापासीं ॥ ३१ ॥

लब्ध्वा सुदुर्लभमिदं बहुसंभवान्ते मानुष्यमर्थदमनित्यमपीह धीरः ।
तूर्णं यतेत न पतेदनुमृत्यु यावन्निःश्रेयसाय विषयः खलु सर्वतः स्यात् ॥ २९ ॥

चौऱ्यायशीं लक्षयोनींप्रती । जैं कोटि कोटि फेरे होती । तैं नरदेहाची प्राप्ती । अवचटें लाहती निजभाग्यें ॥ ३२ ॥ जो मनुष्यदेहीं जन्मला । तो परमार्थासी लिगटला । एवढा अलभ्य लाभ जाला । पितरीं मांडिला उत्साहो ॥ ३३ ॥ झालिया मनुष्यदेहप्राप्ती । परमार्थ साधूं भोगाअंतीं । एवढी येथ नाहीं निश्चिती । मृत्युप्राप्ति अनिवार ॥ ३४ ॥ मृत्यु न विचारी गुणदोष । न म्हणे देशविदेश । न पाहे

पाण्यांत रहाणारीं व कांहीं स्थावर-जंगम शरीरें निर्माण केलीं. २२ वृक्ष, साप, पशु, डांस, राक्षस, पिशाच, बगळे, हंस, मासे, कांसव इत्यादि एकंदर जाती उत्पन्न केल्या. २३ अशा चौऱ्याशी लक्ष योनी उत्पन्न केल्यावर त्यानें त्यांच्यावर पुनः नजर टाकून पाहिलें पण त्यांत आत्मप्राप्तीचा अधिकारी असा कोणीच आढळला नाहीं. २४ अशा या सृष्टीला पाहून देवाला बरें वाटलें नाहीं. तेव्हां मग त्यानें मोठ्या आदरानें मनुष्यशरीर रचिलें २५ व त्यांत पुष्कळसें आत्मज्ञान भरलें. त्या ज्ञानामुळें देहधारी विदेही होतात. २६ सर्व योनींना आहार, निद्रा, भय व मैथुन हीं सारखींच असतात, पण सर्वांहून अधिक ज्ञान फक्त मनुष्यशरीरांतच होतें. २७ तें मनुष्यशरीर पाहून भगवानाला फार आनंद झाला. तो म्हणाला कीं, हा ब्रह्मज्ञानाचा अधिकारी आहे. या देहामुळेंच माझी प्राप्ति होईल. २८ यास्तव नरदेहाला येऊन जो ब्रह्मज्ञान संपादित नाहीं तो विषयभोगांत रमणारा लांब दाढीचा बोकडच आहे, असें जाण. २९ मनुष्यदेहांतील ज्ञानामुळें सच्चिदानंदपदाला प्राप्त व्हावें. एवढा अधिकार नारायणानें कृपाळु होऊन दिला आहे. ३३० मनुष्यदेहांतच ब्रह्मज्ञान मिळत असलें तर मी तें पुढल्या जन्मीं मिळवीन, असें जो मनुष्य म्हणतो तो पुरता बुडाला, असें समज. त्याच्यापाशीं गाळीव अज्ञानच भरलेलें असतें. ३३१.

—म्हणून—

बहुसंभवान्ते सुदुर्लभं इदं मानुष्यं अनित्यं अपि अर्थदं इह लब्ध्वा—अनेक जन्मांनंतर अतिशय दुर्लभ असलेल्याहि व अनित्य जरी असलें तरी पुरुषार्थ संपादन करून देणाऱ्या या मनुष्यत्वाला दैववशात् प्राप्त होऊन, धीरः इह यावत् अनुमृत्यु न पतेत् तावत् निःश्रेयसाय तूर्णं यतेत—बुद्धिवान् मनुष्यानें येथें जोंवर तो मृत्युपरंपरेंत पडला नाहीं तोंवर सत्वर मोक्षासाठीं यत्न करावा. विषयः खलु सर्वतः स्यात्—विषय पश्वादि इतर योनींतहि मिळतीलच. २९.

चौऱ्यांशी लक्ष योनींत कोट्यवधि जेव्हां फेरे होतात तेव्हां कोठें अकस्मात् मोठ्या भाग्यानें मनुष्यजन्म लाभतो. ३२ जो नरदेहांत जन्मतो तो परमार्थाला चिकटतोच. एवढा अलभ्यलाभ झाल्याबद्दल पितर मोठा उत्सव करीत असतात. ३३ मनुष्यदेहाची प्राप्ति झाली असतां अगोदर सगळे भोग घेऊं व शेवटीं परमार्थ साधूं असें जर म्हटलें तर देहाची इतकी शाश्वती नाहीं. अनिवार मृत्यु टपून बसलेला असतो. ३४ मृत्यु कधींहि गुणदोष पहात नाहीं.

रात्रदिवस । करीत नाश तत्काळ ॥ ३५ ॥ देह जैंपासोनि जाला । तैंपासूनि मृत्यु लागला । जेवीं सापें बेडूक धरिला । गिळूं लागला लवनिमिषें ॥ ३६ ॥ साप बेडूकातें गिळी । बेडूक मुखीं माशांतें कवळी । तैशीं मृत्युमुखीं पडलीं । विषयभुलीं झोंबती ॥ ३७ ॥ येथ आळसु जेणें केला । तो सर्वस्वें नागवला । थिता परमार्थ हातींचा गेला । आवर्तीं पडला भवचक्रीं ॥ ३८ ॥ ऐसें जाणोनि यदुराया । देहाचिया लवलाह्या । परमार्थ साधावया । ब्रह्मोपाय उद्यत व्हावें ॥ ३९ ॥ छेदोनियां आळसासी । दवडूनियां निद्रेसी । आत्मचिंतन अहर्निशीं । अविश्रमेंसीं साधावें ॥ ३४० ॥ रणीं रिघालिया शूरासी । न जिणतां परचक्रासी । विसांवा नाहीं क्षत्रियांसी । तेणें वेगेंसीं साधावें ॥ ४१ ॥ साधावया आत्मलग्न । सावधान बिजवराचें मन । तेणें साक्षेपें आपण । सायुज्यलग्न साधावें ॥ ४२ ॥ रायाचें एकुलतें एक । चुकल्या अवचटें बालक । तो जेवीं शोधी सकळ लोक । तेवीं निजसुख साधावें ॥ ४३ ॥ काळाचा चपेट घात । जंव बाजला नाहीं येथ । तंव साधावया परमार्थ । आयुष्य व्यर्थ न करावें ॥ ४४ ॥ नरदेहींचेनि आयुष्यें । प्रपंचाचेनि हरुषें । विषयाचेनि विलासें । भोगपिसे नर जाले ॥ ४५ ॥ पश्वादियोनींच्या ठायीं । विषयांवांचोनि आन नाहीं । तोचि विषयो नरदेहीं । वाढविल्या कायी हित जालें ॥ ४६ ॥ विचारितां विवेकदृष्टीं । विषयांसी प्रारब्धें भेटी । वृथा करितां आटाटी । मुद्दलतुटी नरदेहा ॥ ४७ ॥ नरदेह परम पावन । पावोनि न साधी ब्रह्मज्ञान । तो लांडा गर्दभ जाण । पुच्छेंवीण दुपायी ॥ ४८ ॥ अपरोक्षज्ञानेंवीण वांझट । उदरार्थ दंभ खटपट । जेवीं मदिरापानी मर्कट । उडे उद्भट तडतडां ॥ ४९ ॥ ब्रह्मज्ञानेंवीण शास्त्रज्ञ । ते अंधारींचे खद्योत

देश, परदेश यांचा विचार करीत नाहीं. रात्र-दिवस म्हणत नाहीं. तत्काळ येऊन झडप घालितो. ३५ सर्प जसा बेडकाला धरितो व एका क्षणांत गिळून टाकितो, तसा देह उत्पन्न होतांच मृत्यु त्याच्या पाठीस लागतो. ३६ साप बेडकाला ग्रासीत असतां इकडे तो बेडूक तोंडानें माशा पकडीत असतो, त्याप्रमाणें मृत्युमुखांत पडलेलीं माणसें विषयांना कंवटाळीत असतात. ३७ यास्तव या देहांत जे आळस करितात ते सर्वस्वी नागविले जातात. सहज घडणारा परमार्थ हातचा घालवितात व भवचक्राच्या भोंवऱ्यांत सांपडतात. ३८ यासाठीं हे यदुराजा ! परमार्थ साधण्यासाठीं या देहानें ब्रह्मप्राप्तीच्या उपायास सत्वर तयार व्हावें. ३९ आळस झाडून टाकून, निद्रेला घालवून, रात्रंदिवस अविश्रांत आत्मचिंतन करावें. ३४० ज्याप्रमाणें युद्धाला निघालेल्या शूर क्षत्रियाला शत्रूला जिंकिल्यावांचून क्षणभर विसांवा नसतो, त्याप्रमाणें त्वरेनें आत्मज्ञान साधावें. ४१ किंवा बिजवराचें मन जसें लग्न सत्वर साधण्यासाठीं उतावीळ असतें, तसेंच जीव व परमात्मा यांचें लग्न लावण्यासाठीं उतावीळ व्हावें. ४२ राजाचें एकुलतें एक मूल कोठें रस्ता चुकलें म्हणजे तो जसा त्याच्यासाठीं सगळा गांव शोधितो, त्याप्रमाणें आत्मसुखाला शोधावें. ४३ जोंवर काळाचा तडाखा जोरानें बसला नाहीं, तोंवरच परमार्थ साधून घ्यावा. आयुष्य व्यर्थ घालवूं नये. ४४ मनुष्यजन्मांत प्रपंचाच्या आनंदानें व विषयांच्या विलासानें लोक वेडे झाले आहेत. ४५ जनावरांच्या योनींत विषयांवांचून दुसरें कांहीं नाहीं. तेच विषय मनुष्यदेहांतहि जर वाढविले तर त्यांत हित तें काय झालें ! ४६ विवेकदृष्टीनें विचार केला असतां प्रारब्धानुसार विषयांची प्राप्ति होत असते, पण त्यासाठीं व्यर्थ यातायात केल्यानें मनुष्यजन्मासारखी मुद्दल ठेवहि नाहींशी होते. ४७ असा परमपवित्र मनुष्यजन्म लाभला असूनहि जो ब्रह्मज्ञान मिळवीत नाहीं, तो दोन पायांचा, शेपटीवांचून लांडा गाढवच समजावा. ४८ आत्मसाक्षात्कारावांचून केवळ उदरभरणासाठीं दंभानें व्यर्थ खटपट करणें म्हणजे मद्य प्यालेल्या माकडासारखें उड्या मारणेंच आहे. ४९ ब्रह्मज्ञानावांचून शास्त्र जाणणारे अंधारांतील काजवेच समजावे. त्यांचा प्रकाश जसा अंधारांतच चमकतो, सूर्योदय झाल्यावर तो कोणाला दिसतहि नाहीं, त्याचप्रमाणें अज्ञानरूपी अंधारांतच हे शास्त्रज्ञ बडबडणार. ज्ञानसूर्यापुढें त्यांना कोण विचारितो ! ३५० ब्रह्मज्ञानावांचून

जाण । अज्ञाननिशीमाजीं तेज गहन । सूर्योदयीं कोण त्यां देखे ॥ ३५० ॥ ब्रह्मज्ञानेंवीण संन्यासी । नटाच्या ऐसें मुंडन त्यांसी । सोकले मिष्टान्नभिक्षेसी । वृथा गेरूसी नाशिलें ॥ ५१ ॥ मनीं विषयांचें अभिलाषण । धरूनि करिती वेदाध्ययन । ते वर्षाकाळींचे दर्दुर जाण । कर्दमपानें जल्पती ॥ ५२ ॥ विषयप्राप्तीलागीं मौन । तें बकाचें बकध्यान । विषयबुद्धीं जें गायन । तें खरी देखोनि खर भुंके ॥ ५३ ॥ विषयालागीं उपन्यास । नाना युक्तीचे विलास । जेवीं पिंड देखोनि वायस । करिती बहुवस अतिशब्द ॥ ५४ ॥ पोट भरावया भांड । सैरा वाजविती तोंड । तैसे विषयांलागीं वितंड । शास्त्र-पाखंड बोलती ॥ ५५ ॥ विषयवासना धरूनि थोर । बाह्य मिरविती आचार । जेवीं कागाचा शौचाचार । विष्ठातत्पर मानसीं ॥ ५६ ॥ हृदयीं धरूनि जीविका चांग । करिती अग्निहोत्रयाग । जेवीं वेश्या विकोनि अंग । चालवी सांग संसारा ॥ ५७ ॥ नरदेहींचा हाचि स्वार्थ । साधावा चौथा पुरुषार्थ । तो न करितां जो कां अर्थ । तो अनर्थ जाणावा ॥ ५८ ॥ साधीना देहीं ब्रह्मज्ञान । तो श्वानसूकरांसमान । अथवा त्याहोनि हीन । 'तें' विवेचन परियेसीं ॥ ५९ ॥ पशूसी हाणिल्या लाथा । द्वेष न धरी सर्वथा । मनुष्यासी 'तूं' म्हणतां । जीवघाता प्रवर्ते ॥ ३६० ॥ पशूसी लोभ नाहीं संग्रहता । एक आहार होय भक्षिता । मग उरलिया अर्था । त्यागी सर्वथा तत्काल ॥ ६१ ॥ मनुष्याचें लोभिष्ठपण । गांठीं असल्या कोटि धन । पोटा न खाय आपण । मा त्यागितां प्राण त्यजील ॥ ६२ ॥ सायंप्रातर् चिंता । पशूसी नाहीं सर्वथा । मनुष्याची चिंता पाहतां । जन्मशतां न राहे ॥ ६३ ॥ अमित धन असतां गांठीं । चिंता अनिवार मोटी । नाथिलेंचि भय घे पोटीं । अविश्वासी सृष्टी नरदेहीं ॥ ६४ ॥ जरी मरो टेंकलें शरीर । तरी व्यवहारीं साधी वृत्तिक्षेत्र । पाया शोधोनि बांधी घर । पुत्रपौत्र नांदावया ॥ ६५ ॥ ऐसी दुस्तर

जे संन्यासी होतात, त्यांचें मुंडण नटाच्यासारखेंच असतें. ते मिष्टान्नाच्या भिक्षेला सोकावलेले असतात, ते गेरूचा व्यर्थ नाश मात्र करितात. ५१ जे मनांत विषयांचा अभिलाष धरून वेदाध्ययन करितात, ते पावसाळ्यांत चिखलाचें पाणी पिऊन ओरडणाऱ्या बेडकासारखेच जाणावे. ५२ विषयप्राप्तीसाठीं जे मौन धरून ध्यान करितात त्यांचें तें बकध्यानच होय. विषयबुद्धि मनांत ठेवून जे गातात ते गाढवीला पाहून ओरडणाऱ्या गाढवासारखेच समजावे. ५३ विषयांसाठीं अनेक युक्ति-प्रयुक्ति व उद्योग करणारे पिंडाचा गोळा पाहून त्याभोंवतीं काव काव करीत जमणाऱ्या कावळ्यांसारखेच होत. ५४ पोट भरण्यासाठीं तमासगीर जसे वाटेल तें बोलत सुटतात, तसे हे वितंडवादी विषयांसाठीं शास्त्राचा भलभलता अर्थ करून सांगतात. ५५ कावळा जसा मनांत विष्ठेचें चिंतन करीत असतो व बाहेरून शुद्धपणाचा डौल मिरवितो तसे ढोंगी लोक मनांत दृढ विषयवासना ठेवून बाहेरून मात्र मोठा सदाचाराचा आव आणितात. ५६ वेश्या जशी देह विकून पोट भरिते, तसे ते उदर-पोषणाच्या लालसेनें अग्निहोत्र व यज्ञ करितात. ५७ धर्म, अर्थ, काम व मोक्ष यांतील चौथा पुरुषार्थ साधावा हाच मनुष्यजन्मांतील खरा स्वार्थ आहे; परंतु तो मोक्ष सोडून जे अर्थ जोडितात त्याचा तो खरोखर अर्थ नसून अनर्थच आहे, असें जाणावें. ५८ जो देहवान् ब्रह्मज्ञान मिळवीत नाहीं तो कुत्रें, डुकर यांच्यासारखाच किंबहुना त्यांच्याहूनहि हीन आहे. त्याविषयींचें विवेचन ऐक. ५९ पशूला वाटेल तेवढ्या लाथा मारिल्या तरी तो कधीं द्वेष करीत नाहीं. पण मनुष्याला 'तूं' म्हटलें कीं तो जीव घ्यावयास उठतो. ३६० पशूला संग्रह करण्याचा लोभ नाहीं, तो पोटभर खातो व बाकी उरलेलें खुशाल टाकून देतो. ६१ पण मनुष्याचा लोभीपणा पहा ! कोट्यवधि धनाच्या राशी जरी पदरीं असल्या तरी स्वतः कधीं पोटभर खातहि नाहीं. मग जर कां तें धन देण्याचा प्रसंग आला तर प्राणच सोडितो. ६२ पशूला कधीं सकाळ-संध्याकाळची विवंचना नसते. पण मनुष्याची चिंता शेंकडों जन्मांनींहि संपत नाहीं. ६३ मनुष्याजवळ अगणित धन असलें म्हणजे त्याच्या मनाला अनिवार चिंता लागून रहाते. तो नसतें भय बाळ-गितो. मनुष्याला सगळ्या जगाचा अविश्वास वाटत असतो. ६४ शरीर मरावयास टेंकलें तरी तो वतन व शेतवाडी यांचा व्यवहार करीतच असतो. ६५ मुलें, नातवंडें नांदावीं म्हणून मजबूत पाया रचून घर बांधीत असतो. अशी दुस्तर

चिंता । पशूसी नाहीं सर्वथा । आतां मैथुनाची कथा । ऐक तत्त्वतां सांगेन ।। ६६ ।। पशूसी ऋतुकाळीं मैथुन । मग स्त्रियेसी नातळे आपण । पुरुषासी नित्य स्त्रीसेवन । गरोदरही जाण न सोडी ।। ६७ ।। काम क्रोध सलोभता । चिंता निंदा अतिगर्वता । हें मनुष्याचेचि माथा । पशूसी सर्वथा असेना ।। ६८ ।। न साधितां आत्मज्ञान । केवळ जे विषयी जन । ते श्वानसूकरांपरीस हीन । माणुसपण त्यां नाहीं ।। ६९ ।। विषयाचें जें सुख जाण । तें स्वर्गीं नरकीं समान । जें इहलोकीं भोगी श्वान । तें स्वर्गीं जाण इंद्रासी ।। ३७० ।। मनुष्यदेहावांचोनी । पक्षुपक्ष्यादि नाना योनी । त्या विषयभोगालागोनी । विषयच्छेदनीं नरदेह ।। ७१ ।। तो नरदेह कैसेनी जोडे । ते प्राप्तीचें कठिण गाढें । तें सांगेन तुज पुढें । परिस निवाडे विभागु ।। ७२ ।। अत्यंत सुकृतें स्वर्गा चढे । अत्यंत पापें अधोगती घडे । पापपुण्य निःशेष झडे । तै आतुडे निजमुक्ति ।। ७३ ।। जैं पापपुण्य समान समीं । तैं मनुष्यदेह आक्रमी । जन्म पावे कर्मभूमी । आश्रमधर्मीं सुमेधा ।। ७४ ।। साक्षेपें मनुष्यदेह जोडे । ऐसें करितां तंव न घडे । अवचटें हाता चढे । भाग्य चोखडें जयाचें ।। ७५ ।। मोलें अनर्घ्य रत्नें येती । तैसा चिंतामणी न ये हातीं । तेवीं बहुत योनिये जन्म होती । परी मनुष्यदेहप्राप्ती दुर्लभ ।। ७६ ।। ऐसा नरदेह पावोनि देख । जो न साधीचि ब्रह्मसुख । तो जनांमाजीं परम मूर्ख । विश्वासघातक देवाचा ।। ७७ ।। निजात्मप्राप्ती लागोनी । देवें केली मनुष्ययोनी । तो देवाचा विश्वास बुडवूनी । विषयसेवनीं निजपतन ।। ७८ ।। होतें पितरांचें मनोगत पुत्र होईल हरिभक्त । कुळ उद्धरील समस्त । विषयीं प्रतिहत तें केलें ।। ७९ ।। हो कां सकळ भाग्याचें फळ । मनुष्यदेह गा केवळ । तें करावया सफळ । वैराग्य अढळ म्यां केलें ।। ३८० ।।

चिंता पशूंना सर्वथा नसते. आतां मैथुनाची कथा तत्त्वतः सांगतों, ती ऐक. ६६ पशु केवळ नियमित काळींच स्त्रीसंग करितात. मग त्या मादीला स्पर्शहि करीत नाहींत. पुरुष नित्य स्त्रीसंग करितो. तिला गरोदर अवस्थेंतहि सोडीत नाहीं. ६७ काम, क्रोध, लोभ, चिंता, निंदा, अतिगर्व हे सर्व विकार मनुष्याच्याच पदरीं आहेत. पशूमध्यें मुळींच नसतात. ६८ आत्मज्ञान न साधितां जे केवल विषयी असतात, ते श्वान-सूकरांहूनहि हीन आहेत. त्यांना मनुष्यत्व नाहीं. ६९ विषयसुख स्वर्गांत व नरकांत सारखेंच असतें. या लोकीं कुत्रा जे विषय भोगितो तेच विषय इंद्र स्वर्गांत भोगितो. ३७० मनुष्यदेहाखेरीज इतर पशु-पक्ष्यांच्या सर्व योनि केवल विषयभोगासाठींच आहेत व विषयवासना तोडण्यासाठीं मनुष्यदेह आहे. ७१ असा मनुष्यदेह कसा प्राप्त होतो ! तो प्राप्त होणें फार कठीण आहे, हेंहि मी तुला आतां सांगतों. त्याचा निश्चित विभाग ऐक. ७२ जीवाला अतिशय पुण्यामुळें स्वर्ग मिळतो, अतिशय पापामुळें पश्वादि हीन योनि प्राप्त होते. पुण्य व पाप हीं दोन्हीं समान असतात, तेव्हां मनुष्यजन्म लाभतो व पुण्य व पाप निःशेष संपलें म्हणजे तो मुक्त होतो. ७३ जेव्हां पाप व पुण्य सम-समान असतें त्यावेळीं तो जीव मनुष्यदेह घेऊन या मृत्युलोकीं येतो. तो बुद्धिमान् आश्रमधर्म आचरितो. ७४ मनुष्यजन्म खात्रीनें प्रत्येक वेळीं येईलच अशी खात्री नाहीं. ज्याचें मोठें भाग्य असतें त्यालाच तो अकस्मात् प्राप्त होतो. ७५ उत्तम रत्नें जशीं किंमत देऊन विकत घेतां येतात तसा कांहीं चिंतामणि हातीं येत नाहीं. त्याप्रमाणें अनेक योनींत जन्म येतो, पण मनुष्यजन्म अतिशय दुर्लभ आहे. ७६ अशा नरदेहाला प्राप्त होऊन जो ब्रह्मसुख मिळवीत नाहीं तो जगामध्यें खरोखर महामूर्ख व देवांचा विश्वासघात करणारा आहे. ७७ आत्मज्ञानाच्या प्राप्तीसाठीं देवांनीं मनुष्यदेह निर्माण केला आहे. पण तो देवांचा विश्वास घालवून मानव विषयसेवनानें स्वतःचाच अधःपात करून घेतात. ७८ आपला मुलगा हरिभक्त निपजेल व कुळाचा उद्धार करील अशी आई-बापांची मोठी इच्छा असते, पण तो विषयासक्त होऊन त्या इच्छेचा भंग करितो. ७९ हा मनुष्यदेह सर्व भाग्याचें फळ आहे. तो सफल होण्यासाठीं मीं तीव्र वैराग्य धारण केलें. ३८०.

एवं संजातवैराग्यो विज्ञानालोक आत्मनि । विचरामि महीमेतां मुक्तसङ्गोऽनहङ्कृतिः ॥ ३० ॥

देहो निजात्मसाधनीं साधक । तोचि विषयभोगीं बाधक । ऐसें हें देखोनियां देख । केलें निष्टंक वैराग्य ॥ ८१ ॥ त्या वैराग्याचेनि बळें । गुरुकृपावचनेमळें । विषयइंद्रियांचे पाळे । एकेचि वेळे विभांडिले ॥ ८२ ॥ अविद्या जंव घ्यावी जीवें । तंव अविद्या येणें नांवें । मागें मी विद्यमान नोहे । हेंही अनुभवें जाणीतलें ॥ ८३ ॥ ऐशी मिथ्यात्वें अविद्या जातां । चित्प्रकाश पूर्ण लाभे हाता । तेणें स्वदेहस्थ अहंता । गेली सर्वथा निःशेष ॥ ८४ ॥ ज्ञानसाधन जो निजदेहो । तयाच्या ठायीं वैराग्य पहा हो । मा देहसंबंधाचा स्नेहो । कैसेनि राहों शकेल ॥ ८५ ॥ ऐसेनि अनुभवें पाहीं । निसंग मी विचरें मही । अहंता स्वदेहीं नाहीं । पुशिलें तें पाहीं सांगितलें राया ॥ ८६ ॥ जैं पुरुषाची अहंता गळे । तैं देह अदृष्टयोगें चळे । जेवीं सुकलें पान वायुबळें । पडिलें लोळे सर्वत्र ॥ ८७ ॥ यालागीं ब्रह्मसाक्षात्कारा । वृत्ति लय पावे जंव वीरा । तंववरी जो वैराग्यें खरा । अभंग पुरा पुरुषार्थी तो ॥ ८८ ॥ म्हणसी एका गुरूचे ठायीं । तुज सर्वथा विश्वास नाहीं । ये अर्थीं सावध होईं । विशद पाहीं सांगेन ॥ ८९ ॥ गुरूनें सांगतांचि कानीं । ज्याची वृत्ति जाय विरोनी । जेवीं मिळतां लवणपाणी । अभिन्नपणीं समरसे ॥ ३९० ॥ त्यासी साधकबाधकताबाध । हें बोलणें अतिबद्ध । जेवीं निमालियासी वोखद । न पाजवे दुग्ध गर्भस्था ॥ ९१ ॥ यापरी ज्यासी कर्तव्यता । नाहीं नाहीं गा सर्वथा । त्या ऐशी हे अवस्था । कदा कल्पांता न लभेचि ॥ ९२ ॥ गुरूनें सांगितलें कानीं । स्वरूपावबोध जाला मनीं । परी तें न राहेचि निश्चळपणीं । बाह्यदर्शनीं विक्षेपू ॥ ९३ ॥ आसनीं बैसल्या स्वरूपस्थितीं । आसन

—यापमाणें त्याज्य व ग्राह्य यांच्या विवेकाचें सविस्तर निरूपण करून आतां 'त्वं तु कल्पः कविर्दक्षः०' अ. ७. २८ पृ. ४०५ इत्यादि यदूनें अवधूताला जें म्हटलें होतें, त्याचें उत्तर अवधूत सांगतो—

एवं संजातवैराग्यः विज्ञानालोकः आत्मनि स्थितः मुक्तसंगः अनहङ्कृतिः एतां महीं विचरामि—याप्रमाणें अनेक गुरूंपासून स्वतःच संपादन केलेल्या उपदेशानें ज्याला वैराग्य प्राप्त झालें आहे व विशिष्ट ज्ञान हाच ज्याचा प्रकाश आहे असा मीं आत्म्यांमध्यें स्थित होऊनच आसक्तिरहित व अहंकारशून्य होत्साता या पृथ्वीवर संचार करितो. ३०.

देह आत्मज्ञानसाधनामुळेंच साधक व विषयभोगामुळें बाधक होतो, असें पाहून मीं निश्चयानें वैराग्य संपादन केलें. ८१ त्या वैराग्याच्या सामर्थ्यानें व गुरुकृपावचनाच्या लाभानें मीं विषय व इंद्रियें यांचा समूह एकाच वेळीं तोडून टाकिला. ८२ जीवानें अविद्येचा जेव्हां स्वीकार करावा तेव्हांच तो अविद्यावान् होतो. अविद्या टाकल्यावर तो अविद्यावान् होत नाहीं, हें मी अनुभवानेंच जाणिलें. ८३ याप्रमाणें मिथ्यात्वानें अविद्या गेली कीं, चित्प्रकाश पूर्णपणें हातीं येतो. त्यामुळें देहावरील अहंता सर्वथा नाहींशी होते. ८४ ज्ञानाचें साधन असा जो स्वतःचा देह त्याचीच विरक्ति आल्यावर मग देहावर ममता कशी राहणार ! ८५ या अनुभवानें मी निःसंग होऊन पृथ्वीवर संचार करीत आहें. माझी स्वदेहावर अहंता मुळींच नाहीं. हे राजा ! तूं जें विचारिलेंस तें मीं तुला सांगितलें. ८६ ज्याप्रमाणें सुकलेलें पान वाऱ्यामुळें इकडे तिकडे लोळत असतें, त्याप्रमाणें पुरुषाची अहंता नाहींशी झाली कीं, दैवयोगानें देह चालत असतो. ८७ यास्तव हे वीरश्रेष्ठा ! जोंवर ब्रह्मसाक्षात्कारांत वृत्ति लीन झाली नाहीं, तोंवर जो दृढ वैराग्यानें रहातो तोच खरा अढळ पुरुषार्थी होय. ८८ तूं जर म्हणशील कीं 'तुझा एका गुरूवर सर्वथा विश्वास नव्हता' तर तेंहि स्पष्ट करून सांगतों, सावधान चित्तानें ऐक. ८९ मीठ जसें पाण्यांत विरून समरस होतें, त्याप्रमाणें गुरूनें कानांत मंत्र सांगतांच ज्याची वृत्ति विरून जाते ३९० त्याचा साधक-बाधक प्रमाणांनीं बाध होतो, हें बोलणें मृताला जसें औषध पाजावें किंवा गर्भांतील जीवाला दूध पाजावें, तसें असंबद्ध आहे. ९१ अशा प्रकारें ज्याला कर्तव्य उरलेलें नाहीं त्याला अशी अवस्था कधीं कल्पांतीहि प्राप्त होत नाहीं. ९२ गुरूनें जरी कानांत उपदेश केला व त्यामुळें मनाला आत्मस्वरूपाचा बोध झाला तरी तो निश्चल रहात नाहीं. बाह्य विषयांकडे लक्ष गेलें कीं विक्षेप होतो. ९३ आसनावर बसलें कीं आत्मस्वरूपाची प्राप्ति होते, पण आसन

सोडिल्या प्रपंचस्फूर्ती । ऐशी एकदेशी स्थिती । नातळती निजयोगी ।। ९४ ।। देह आसनीं निश्चळ । अथवा कर्मीं हो चंचळ । परी वृत्ति सर्वदा निश्चळ । । तेचि निर्मळ निजयोगी ।। ९५ ।। परशुरामेंसीं रणांगणीं । भीष्म भिडला निर्वाणबाणीं । तोडरीं घातिला जिणोनी । वृत्ति समाधानीं अचंचळ ।। ९६ ।। करितां निर्वाणयुद्धीं । ज्याची न मोडे समाधी । हेंचि साधावया त्रिशुद्धी । चोवीस गुरु विधीं वंदिले म्यां ।।९७।। देह निश्चळत्वें वृत्ति निश्चळ । देह चंचळत्वें वृत्ति चंचळ । तरी ते देहबुद्धीचि सबळ । नव्हे केवळ निजबोधू ।। ९८ ।। होतां प्रपंचदर्शन । वृत्तीसी विक्षेप होय जाण । तो विक्षेपु करावया छेदन । बहुगुरुसाधन म्यां केलें ।। ९९ ।। निजगुरूंनीं सांगितल्या अर्था । त्या साधावया परमार्था । नाना प्रपंचपदार्थां । गुरुसंस्था म्यां केली ।। ४०० ।। जेथोनियां विक्षेपता । तेचि लाविली गुरुत्वपथा । ऐसेनि साधनें साधितां । जग स्वभावतां परब्रह्म ।। १ ।। पूर्वीं गुरूंनीं बोधिलें नाहीं । तरी पृथ्व्यादिकें बोधितील कायी । तोचि निजार्थ साधावया पाहीं । गुरुउपायीं प्रवर्तलों ।। २ ।।

न ह्येकस्माद्गुरोर्ज्ञानं सुस्थिरं स्यात्सुपुष्कलम् । ब्रह्मैतदद्वितीयं वै गीयते बहुधर्षिभिः ।। ३१ ।।

गुरूनें सांगितलें निजज्ञान । हृदयीं प्रकाशलें चिद्भान । तें विद्युत्प्राय चंचळ जाण । स्थैर्यपण त्या नाहीं ।। ३ ।। जें मूळींचि चंचळ । तें कदा नव्हे पुष्कळ । क्षणां भासे क्षणां चपळ । तेणें तळमळ साधकां ।। ४ ।। जैसें मुखींचें आविस जाये । जेणें सर्प डंखला राहे । तैसी वेदना साधकां होये ।

सोडतांच प्रपंचाकडे मन वेधतें. अशी एकदेशी अवस्था आत्मज्ञानी योग्याला कधीं स्पर्शेहि करीत नाहीं. ९४ शरीर आसनावर निश्चल बसलेलें असो किंवा कर्मामध्यें गुंतलेलें असो, ज्याची वृत्ति सदा सर्वदा निश्चल असते तोच खरा शुद्ध आत्मज्ञानी होय. ९५ रणांगणावर भीष्म परशुरामाशीं समोरासमोर उभा राहून युद्धाला तयार झाला. त्यानें त्याच्यावर निर्वाणीनें बाण सोडिले. पण त्याची वृत्ति निश्चलच राहिली. ९६ निर्वाणीचें युद्ध करीत असतांहि त्याच्या समाधीचा भंग झाला नाहीं. हेंच निश्चयानें शिकण्यासाठीं मीं चोवीस गुरु करून त्यांना वंदन केलें. ९७ देह निश्चल असला कीं वृत्ति निश्चल होते व देह चंचल झाला कीं वृत्ति चंचल होते. असें झालें म्हणजे देहबुद्धीच बलवान् आहे असें जाणावें. तो शुद्ध आत्मबोध नव्हे. ९८ प्रपंच दृष्टीस पडतांच वृत्तीला विक्षेप होतो. त्याला तोडून टाकण्यासाठीं मीं अनेक गुरु हेंच साधन केलें. ९९ त्या त्या गुरूनें शिकविलेल्या गूढरहस्याच्या योगानें परमार्थ साधण्यासाठीं मीं प्रपंचांतील अनेक पदार्थांना गुरुपद दिलें. ४०० ज्याच्यापासून विक्षेप उत्पन्न होतो, त्यालाच मीं गुरुपणा दिला. अशा साधनांनीं आत्मबोध साधूं लागतांच मला सहजच सर्व जगत् परब्रह्ममय झालें. १ मला अगोदर गुरूनेंच जर उपदेश केला नसता तर पृथ्वी प्रभृति पदार्थांनीं तरी काय बोध केला असता ! हा स्वार्थ साधण्यासाठीं मी गुरुसाधनांत प्रवृत्त झालों. ४०२.

——अहोपण असे अनेक गुरु कशाला पाहिजेत ? श्वेतकेतु, भृगु इत्यादि वैदिक जिज्ञासूंनीं अनेक गुरूंचा आश्रय केल्याचा उल्लेख उपनिषदांत नाहीं——

एकस्मात् गुरोः सुस्थिरं सुपुष्कलं ज्ञानं न हि स्यात्—एका गुरुपासून अत्यंत स्थिर आणि समर्थ ज्ञान होत नाहीं, कारण, ऋषिभिः एतत् अद्वितीयं ब्रह्म बहुधा गीयते हि—ऋषींकडून हें अद्वितीय ब्रह्म सप्रपंच, निष्प्रपंच, भिन्न, अभिन्न इत्यादि अनेक प्रकारें सांगितलें जातें. [याचा भावार्थ असा— हे वर सांगितलेले सर्व गुरु परमार्थाचा उपदेश करणारे नव्हेत, तर आत्म्याविषयींच्या ज्या असद्भावना, असंभावना व विपरीत भावना त्यांचीच अन्वय-व्यतिरेकन्यायानें निवृत्ति करणारे आहेत, त्यामुळें त्यांचें बहुत्व युक्तच आहे. ज्ञानप्रद गुरु एकच असतो, असें भगवान् ' मदभिज्ञं शान्तं उपासीत ' इत्यादि श्लोकानें पुढें सांगतील व ' तस्मात् गुरु प्रपद्येत जिज्ञासुः श्रेय उत्तमं ' अ. ३-२१ पृ. १६३ यांत मागें सांगितलेंच आहे.]३१.

गुरूनें आत्मज्ञान सांगितलें असतां अंतःकरणांत चिद्भान प्रकाशतें. तें विजेप्रमाणें चंचल असतें. तें स्थिर नसतें, असें जाण. ३ जें मूळचेंच चंचल असतें, तें कधींच स्थिर होत नाहीं. तें क्षणांत भासतें व क्षणांत लीन होतें. त्यामुळें साधकाला तळमळ लागते. ४ सापाच्या तोंडांतील आमिष निसटलें म्हणजे तो जसा दंश ठेवितो

वियोगु न साहे सर्वथा ॥ ५ ॥ येरवीं ब्रह्म अद्वितीय नित्य । हें सकळ ऋषींचें संमत । त्यांसीही पुसों जातां बहुत । विक्षेप तेथ उठती ॥ ६ ॥ एक म्हणती ब्रह्म सगुण । एक म्हणती तें निर्गुण । ऐसे वाद करिती दारुण । युक्तिखंडण अभिमानें ॥ ७ ॥ एक म्हणती ब्रह्म सप्रपंच । एक म्हणती निष्प्रपंच । मिळोनियां पांचपांच । शब्दकचकच वाढविती ॥ ८ ॥ प्रपंचदर्शनें विक्षेपता । तेथ साधावया निज-ऐक्यता । सुबुद्धीनें नाना पदार्थां । गुणग्राहकता गुरुरूपें ॥ ९ ॥ तेथ साधकांचे प्रश्न । सहसा न पवती समाधान । यालागीं पुसावया मन । न रिघे जाण ते ठायीं ॥ ४१० ॥ जेथूनि विक्षेपता वाढे । तेथेंचि ऐक्यता जोडे । तें नानागुरुत्वें रोकडें । साधन चोखडें योजिलें ॥ ११ ॥ जीं जीं सांगितलीं गुरुललक्षणें । तीं तीं निजबुद्धीचीं साधनें । समूळ विक्षेपू तेणें । तीव्र धारणें छेदिला ॥ १२ ॥ तेणें चंचलत्वें निश्चल । फावलें निजबोधाचें मूळ । दृश्य देखतां केवल । भासे सकळ चिन्मात्र ॥ १३ ॥ जें माझ्या निजगुरूंनीं । पूर्वीं दिधलें होतें बोधूनी । तेंचि नाना गुरुत्वें साधूनी । विक्षेप छेदुनी पावलों ॥ १४ ॥ निजगुरु तो एकुचि जाण । इतर गुरु साधकत्वें साधन । हें यथातथ लक्षण । तुज निरूपण म्यां केलें ॥ १५ ॥ येथ प्रपंचाचें भानाभान । कर्म करितां न कळे जाण । लाधली निजबोधाची खूण । समदर्शन सर्वदा ॥ १६ ॥ दृश्य देखतां दृष्टीं । नव्हे दृश्येंसीं भेटी । हारपली कर्मत्रिपुटी । बोधकसवटी अभिनव ॥ १७ ॥ यथेष्ट करितां भोजन । उष्टेना निराहारलक्षण । जगेंसी वागतां जाण । एकलेपण मोडेना ॥ १८ ॥ तरंग सागरामाजीं क्रीडतां । न मोडे उदकाची एकात्मता । तेवीं जगामाजीं वर्ततां । दुजी वार्ता मज नाहीं ॥ १९ ॥ नवल सद्गुरूची नवायी । सर्वीं सर्व तोचि पाही । गुरुवेगळें रितें कांहीं । उरलें नाहीं सर्वथा ॥ ४२० ॥ आतां माझें जें मीपण । तें सद्गुरु जाला आपण । बोलतें तुझें जें तूंपण ।

तशीच साधकालाहि वेदना होते. त्याला त्या आत्मभानाचा वियोग अगदीं सहन करवत नाहीं. ५ ब्रह्म नित्य व अद्वितीय आहे, हें सर्व ऋषींना संमत आहे. पण त्यांना विचारावयास गेलें कीं, अनेक शंका उपस्थित होतात. ६ कोणी म्हणतो ब्रह्म सगुण आहे, कोणी सांगतो तें निर्गुण आहे व असा भयंकर वाद माजवून ते आपापल्या मताच्या अभिमानानें दुसऱ्याच्या मताचें खंडण करितात. ७ एक म्हणतो ब्रह्म प्रपंचयुक्त आहे, दुसरा म्हणतो तें प्रपंचरहित आहे, असा पांचजणांचा समुदाय जमवून शब्दांचा व्यर्थ कीस काढीत बसतात. ८ प्रपंच दृष्टीस पडतांच मनाला विक्षेप होतो. म्हणून आत्म्याचें ऐक्य साधण्यासाठीं गुरुरूपानें नाना पदार्थांतील गुणाचें ग्रहण करावें. ९ साधक प्रश्नांनींच जर आपलें समाधान करून घेऊं लागला तर त्याचें सहसा समाधान होत नाहीं. त्यामुळें त्याचें मन कोणाला विचारावयास धजत नाहीं. ४१० जेथून विक्षेप उत्पन्न होतो तेथेंच ऐक्य होतें. यास्तव पदार्थांना गुरुत्व देऊन उत्तम साधनांचीच मीं योजना केली. ११ वर गुरूचीं जीं लक्षणें सांगितलीं आहेत तीं आत्मज्ञानाचीं साधनेंच आहेत. त्यांच्या तीव्र धारेनें सर्व विक्षेप समूळ छेदून टाकावा. १२ या चंचलत्वामुळेंच मला आत्मज्ञानाचें निश्चल मूळ सांपडलें व दृश्य पदार्थहि चिन्मात्रच भासूं लागले. १३ पूर्वीं माझ्या गुरूनें उपदेश करून जें ज्ञान मला दिलें होतें, तेंच ज्ञान मीं अनेक गुरु करून विक्षेपाचा छेद करून मिळविलें. १४ मोक्षगुरु एकच आहे. इतर गुरु साधकरूपानेंच केवळ बोधाचीं साधनें आहेत. मीं तुला हें त्यांचें यथार्थ लक्षण सांगितलें आहे. १५ या अवस्थेंत कर्म करीत असतांहि प्रपंचाचें भान किंवा अभान नसतें. आत्मज्ञानाची खूण पटल्यामुळेंच सर्वकाळ समदृष्टि होते. १६ दृश्य पदार्थ डोळ्यांपुढें असला तरी तो दिसत नाहीं. कर्माची त्रिपुटी मुळीं नाहींशी होते. ही ज्ञानाची परीक्षा मोठी अपूर्व आहे. १७ पोटभर भोजन करूनहि निराहाराचें लक्षण नाहींसें होत नाहीं. तसेंच, जगांत वावरत असलें तरी आपला एकटेपणा कांहीं केल्या नाहींसा होत नाहीं. १८ समुद्रावर लाटा उसळत असल्या तरी त्यांतील जल एकरूपच असतें. याप्रमाणें मी जगांत वागत असलों तरी मला दुसऱ्या गोष्टींची वार्ता नसते. १९ सद्गुरूची अद्भुत शक्ति मोठी आश्चर्यकारक आहे. सर्वांत तो भरून राहिला आहे. त्याच्यावांचून कांहींच रिकामें राहिलेलें नाहीं. ४२० आतां माझ्यांतील जो 'मीपणा' तोहि सद्गुरु आपणच होऊन राहिला आहे आणि

तेंही जाण सद्‌गुरूचि ॥ २१ ॥ याहीपरी पाहतां । माझा गुरू एकुलता । एक तेथें दुजेपणाची वार्ता । नाहीं सर्वथा यदुराया ॥ २२ ॥ ऐशी सद्‌गुरूकथा । तुज सांगितली परमार्था । हरिखें आलिंगिलें नृपनाथा । दोघां ऐक्यता निजबोधें ॥ २३ ॥ जीवीं जीवा पडली मिठी । आनंदें वोसंडणें सृष्टी । तेणें वाचेसी पडली बेलवटी । बोलों उफराटी विसरली ॥ २४ ॥ हरिखु न संटवे हृदयभवनीं । बाहेर वोसंडे स्वेदेंजोनी । आनंदघन वोळला नयनीं । स्वानंदजीवनीं वर्षतु ॥ २५ ॥ तुटली अहंकाराची बेडी । पावलों भवार्णव-परथडी । म्हणौनि रोमांची उभविली गुढी । जिंतिली गाढी अविद्या ॥ २६ ॥ समूळ देहभावो पळाला । यालागीं गात्रकंपू चळचळा । संकल्पविकल्प निमाला । मनेंसीं बुडाला मनोरथू ॥ २७ ॥ जीवभावो उखिता । यदूनें अर्पिला गुरुनाथा । तें चिन्ह बाहेरीं तत्त्वतां । दावी सर्वथा निजांगीं ॥ २८ ॥ तो अवधूत जाण दत्तात्रया । तेणें आलिंगूनि यदुराया । निजरूपाचा बोधू तया । अनुभवावया दीधला ॥ २९ ॥ दत्तात्रेयशिष्यपरंपरा । सहस्रार्जुन यदु दुसरा । तेणें जनार्दनू तिसरा । शिष्य केला खरा कलियुगीं ॥ ४३० ॥ गुरुप्राप्तीलागीं सर्वथा । थोर जनार्दनासी चिंता । विसरला तीन्ही अवस्था । सद्‌गुरु चिंतितां चिंतनीं ॥ ३१ ॥ देवो भावाचा भोक्ता । दृढ जाणोनि अवस्था । येणें जालें श्रीदत्ता । तेणें हातु माथां ठेविला ॥ ३२ ॥ हातु ठेवितांचि तत्काळ । बोधू आकळिला सकळ । मिथ्या प्रपंचाचें मूळ । स्वरूप केवळ स्वबोधें ॥ ३३ ॥ कर्म करूनि अकर्ता । तोचि अकर्तात्मबोधु झाला देता । देहीं असोनि विदेहता । तेंही तत्त्वतां आकळिली ॥ ३४ ॥ गृहाश्रमू न सांडितां । कर्मरेखा नोलांडितां । निजव्यापारीं वर्तता । बोधू सर्वथा न मैळे ॥ ३५ ॥ तो बोधू आकळतां मना । मन मुकलें मनपणा । अवस्था नावरेचि जनार्दना । मूर्च्छापन्न पडियेला ॥ ३६ ॥ त्यासी सावध करूनि तत्त्वतां । म्हणे प्रेमा राहे सत्वावस्था । तोही

'तुझें' असें बोलणारा जो 'तूंपणा' तोहि सद्‌गुरूच आहे, असें जाण. २१ हे यदुराजा ! अशारीतीनें पाहिलें म्हणजे माझा गुरु एकुलता एकच आहे. तेथें दुजेपणाची वार्ताहि नाहीं. २२ ही सद्‌गुरूची कथा मीं तुला परमार्थप्राप्तीसाठीं सांगितली. असें बोलून अवधूतानें आनंदानें राजाला आलिंगन दिलें. २३ आत्मज्ञानामुळें ते दोघेहि तद्रूप झाले. सृष्टीला आनंदाचें भरतें आलें. त्यामुळें वाचा बंद पडली व उलट पक्ष घेऊन बोलण्याचें विसरली. २४ अंतःकरणांत आनंद न मावल्यामुळें तो घामाच्या रूपानें बाहेर वाहूं लागला. म्ह० आनंदातिशयामुळें त्यांच्या अंगावर रोमांच उभे राहून घाम सुटला. आनंदरूपी मेघ डोळ्यांत भरून आला व तो प्रेमाश्रूंचा वर्षाव करूं लागला. २५ अहंकाररूपी बेडी तुटली. आम्हीं भवसमुद्राच्या परतीराला जाऊन पोंचलों, म्हणून रोमांचरूपी पताका उभारली. अविद्येला पार जिंकिलें. २६ देहभाव पळून गेला, म्हणून शरीर चळचळां कांपूं लागलें. संकल्प-विकल्प नाहींसा झाला व मनोरथ मनासह बुडाला. २७ यदुराजानें आपला सर्व जीव-भाव सद्‌गुरूला अर्पण केला व त्याचें चिन्ह तत्त्वतः आपल्या देहावर दाखवूं लागला. २८ तो अवधूत साक्षात् दत्तात्रय होता, असें जाण. त्यानें यदुराजाला आलिंगून त्याला आत्मस्वरूपाच्या ज्ञानाचा अनुभव दिला. २९ दत्तात्रयाची शिष्यपरंपरा अशी आहे,–पहिला सहस्रार्जुन, दुसरा यदु व या कलियुगांत त्यानें जनार्दनाला तिसरा शिष्य केलें. ४३० गुरुप्राप्तीसाठीं जनार्दनाला मोठी चिंता लागून राहिली होती. पण सद्‌गुरूच्या चिंतनांत तो जागृति, स्वप्न व सुषुप्ति या तिन्ही अवस्था विसरला. ३१ देव भावाचा भुकेला आहे. त्याची स्थिति जाणून साक्षात् दत्तात्रयच त्याच्यापाशीं आले व त्यांनीं त्याच्या मस्तकावर हात ठेविला. ३२ हात ठेवतांक्षणींच त्याला आत्मज्ञान झालें व त्या आत्मज्ञानानेंच त्यानें प्रपंचाचें मूळ मिथ्या केलें. ३३ तो कर्म करून अकर्ता होता. तोच आपला अकर्तेपणाचा बोध त्यानें जनार्दनाला दिला. देहवान् असून विदेह अवस्था त्यानें तत्त्वतः स्वीकारिली. ३४ गृहस्थाश्रम न सोडितां, कर्ममर्यादेचें उल्लंघन न करितां, आपल्या व्यवहारांत वागत असतां त्याचें आत्मज्ञान मलिन झालें नाहीं. ३५ तें ज्ञान मनानें जाणतांच त्याचा 'मनपणा' नाहींसा झाला. ती अवस्था जनार्दनाला आवरतां न आल्यामुळें तो मूर्च्छित होऊन पडला. ३६ तेव्हां त्याला सावध करून दत्तात्रेय म्हणाले कीं, सत्त्वावस्थेंत प्रेम रहातें, यास्तव

गिळोनि सर्वथा । होयीं वर्तता निजबोधें ॥ ३७ ॥ पूजाविधी करोनियां । जंव जनार्दनु लागला पायां । तंव अदृश्य जाला दत्तात्रेया । योगमायांचेनि योगें ॥ ३८ ॥ कथेसी फांकलों सर्वथा । तो कोपु न मनावा श्रोतां । प्रसंगें गुरुविवंचना होतां । मीही गुरुकथा बोलिलों ॥ ३९ ॥ मज तंव चुकी पडिली मोटी । चुकूनि सांगितली गुरुगोठी । तेही संस्कृत नव्हे मराठी । वृथा चावटी न म्हणावी ॥ ४४० ॥ जो असेल गुरुभक्त । तो हें जाणेल मनोगत । जो गुरुस्मरणें सदोदित । त्यासी हें हृद्गत कळेल ॥ ४१ ॥ ज्यांसी गुरुचरणीं श्रद्धा गाढी । ज्यांसी गुरुभजनीं अतिआवडी । जिहीं गुरुप्रेम जोडिलें जोडी । ते हे गोडी जाणती ॥ ४२ ॥ ज्या सद्गुरूचें नांव घेतां । चारी मुक्ती वोडविती माथा । मुक्ति नावडे गुरुभक्तां । नित्यमुक्तता गुरुचरणीं ॥ ४३ ॥ ज्याचें घेतां चरणतीर्थ । चारी मुक्ती पवित्र होत । पायां लागती पुरुषार्थ । धन्य गुरुभक्त त्रिलोकीं ॥ ४४ ॥ चैतन्य नित्य निराधार । निर्धर्मक निर्विकार । त्याचा केला जीर्णोद्धार । सत्य साचार जगद्गुरू ॥ ४५ ॥ सद्गुरुकृपा नव्हतां । नव्हती देवांची कथावार्ता । देवासी देवपणीं स्थापिता । सत्य सर्वथा सद्गुरू ॥ ४६ ॥ सद्गुरुकृपेवीण पाहीं । देवो असतूचि जाला होता नाहीं । त्यासी देवपणें ठेवूनि ठायीं । भजविता पाहीं गुरुरावो ॥ ४७ ॥ त्या सद्गुरूची कथा । चुकोनि जालों बोलता । थोर अपराधु हा माझे माथां । क्षमा श्रोतां करावी ॥ ४८ ॥ वृथा बोललों नाहीं जाण । जालें बोलावया कारण । दत्तात्रेयशिष्यकथन । करितां जनार्दन आठवला ॥ ४९ ॥ मी जरी नाठवीं जनार्दनासी । परी तो विसरों नेदीच आपणासी । हटें देतुसे आठवणेंसी । अहर्निशीं सर्वदा ॥ ४५० ॥ जिकडे जिकडे मी पाहें । तिकडे तिकडे तोचि होऊनि राहे । मी जरी त्याकडे न पाहें । तें न पहाणेंही होय तो माझें ॥ ५१ ॥ जिकडे मी विसरोनि जायें । तिकडेचि तो येऊनि राहे । मी जरी त्याकडे न पाहें । तें न पहाणें होये तो माझें ॥ ५२ ॥ घटु सांडूं पाहे आकाशासी । तंव आकाश न सांडी घटासी ।

तेंहि टाकून तूं आत्मज्ञानानें वागत जा. ३७ तेव्हां जनार्दनानें यथाविधि पूजा करून त्यांच्या पायांवर मस्तक ठेविलें. तेव्हां दत्तात्रेय योगमायेनें अदृश्य झाले. ३८ कथा सोडून मध्येंच विषयांतर फार झालें म्हणून श्रोत्यांनीं रागावूं नये. प्रसंगानें गुरूसंबंधीं विषय निघतांच मींहि माझ्या गुरूचा वृत्तांत सांगितला. ३९ पण माझ्याकडून ही मोठी चूकच झाली. चुकून मीं गुरूची कथा सांगितली व तीहि संस्कृतांत नव्हे तर मराठींत. तेव्हां ही कांहीं तरी फाजिल वटवट केली, असें मात्र समजूं नये. ४४० जो कोणी गुरुभक्त असेल त्यालाच हें माझें हृद्गत कळेल. जो नित्य गुरुस्मरण करीत असेल तोच यांतील मर्म जाणील. ४१ ज्याची गुरुचरणांवर अढळ श्रद्धा असते, ज्याला गुरुभजनाची अतिशय आवड असते, ज्यानें गुरुप्रेम संपादिलेलें असतें त्यालाच यांतील गोडी समजेल. ४१ सद्गुरूचें नांव घेतलें असतां चारहि मुक्ति मस्तक वांकवितात. गुरुभक्तांना मुक्ति आवडत नाहीं. कारण गुरुचरणाजवळ नित्यमुक्तता असते. ४३ ज्याच्या चरणाचें तीर्थ घेतलें असतां चारी मुक्ति पवित्र होतात व पुरुषार्थ याच्या पायां पडतात, तो गुरुभक्त त्रैलोक्यांतहि धन्य होय. ४४ नित्य, निराधार, धर्मरहित, निर्विकार अशा चैतन्याचा सद्गुरूनें जिर्णोद्धार केला. सद्गुरूच सत्सरूप आहे. ४५ सद्गुरूची कृपा झाल्यावांचून देवाची कथा-वार्ता संभवत नाहीं. यास्तव खरोखर सद्गुरुच देवाची देवपणानें स्थापना करणारा आहे. ४६ सद्गुरूच्या कृपेवांचून देव असूनहि नसल्यासारखाच झाला होता. त्याला देवपणानें मंदिरांत बसवून त्याचें भजन-पूजन करावयास लावणारा सद्गुरु होय. ४७ अशा त्या सद्गुरूची कथा मी चुकून बोललों. हा माझ्या हातून मोठाच अपराध घडला. तरी श्रोत्यांनीं मला क्षमा करावी. ४८ मी हें कांहीं उगाच बोललों नाहीं. बोलायला तसेंच कारण झालें. दत्तात्रेयाची शिष्यकथा सांगत असतां मला जनार्दनाची आठवण झाली. ४९ मीं जरी त्याची आठवण केली नाहीं तरी तो स्वतःला विसरवूं देतच नाहीं. रात्रंदिवस निरंतर बळेंच स्मरण देतो. ४५० मी जिकडे जिकडे पहातों, तिकडे तिकडे तोच भरलेला दिसतो आणि मीं जर त्याच्याकडे पाहिलें नाहीं तर माझें तें न पहाणेंच तो होतो. ५१ मी जेथें विसरावयास जातों तेथेंहि तो येऊन उभा रहातो. मीं त्याच्याकडे दुर्लक्ष्य केलें तर तें दुर्लक्ष्यच तो होतो. ५२ घट आकाशाला

तेवीं जनार्दनु आम्हांसी । अहर्निशीं लागला ॥ ५३ ॥ मी न करीं त्याची कथा । तंव तोचि होये मुखीं वक्ता । ऐसेनि बलात्कारें बोलवितां । काय म्यां आतां करावें ॥ ५४ ॥ दृश्य मी देखावया बैसें । तंव दृश्या सबाह्य जनार्दनु दिसे । श्रवणीं ऐकतां सौरसें । शब्दीं प्रवेशे जनार्दनू ॥ ५५ ॥ आतां नाइकें न पाहें । म्हणौनि मी उगा राहें । तंव उगेपणाचेनि अन्वयें । जनार्दनु पाहों लागला ॥ ५६ ॥ ऐसा अडकलों त्रिशुद्धी । जनार्दनू उघडों नेदी । श्रोतां सांगावी जी बुद्धी । मी अपराधी सर्वथा ॥ ५७ ॥ श्रोते म्हणती नवलावो । येथ न देखों अहंभावो । पाहतां बोलाचा अभिप्रावो । प्रेम पहाहो लोटत ॥ ५८ ॥ येथील विचारितां बोल । क्षीराब्धीहूनि सखोल । नवल प्रेमाची वोल । येताती डोल स्वानंदें ॥ ५९ ॥ जें त्वां केलें गुरुनिरूपण । तें सप्रेम ब्रह्मज्ञान । थोर निववीलों जाण । नाहीं दूषण निरूपणा ॥ ४६० ॥ नित्य करावें गुरुस्मरण । तें गुरुप्रेमें केलें कथन । करितां अमृताचें आरोगण । पुरे कोण म्हणेल ॥ ६१ ॥ जनार्दनीं दृढ भावो । हाही कळला अभिप्रावो । निरूपणाचा नवलावो । रसाळ पाहाहो वोडवला ॥ ६२ ॥ तूं मूळकथा निरूपिसी । अथवा आडकथा सांगसी । परी गोडी या निरूपणाऐसी । न देखों आणिकांसी सर्वथा ॥ ६३ ॥ शुद्ध निरूपणें गुरु वर्णिसी । वर्णूनि अपराधी म्हणविसी । ऐक्यें घोळली बुद्धी कैसी । मानु श्रोत्यांसी वाढविला ॥ ६४ ॥ तुझी जे अपराधबुद्धी । ते प्रवेशली भगवत्पदीं । जाली अपराधाची शुद्धी । देखणा त्रिशुद्धी तूं होसी ॥ ६५ ॥ गुरुस्तवनीं रतसी । तेव्हां मूळकथा विसरसी । प्रेमाची जाती ऐसी । कळलें आम्हांसी सर्वथा ॥ ६६ ॥ श्रोते म्हणती आतां । विस्मयो दाटला चित्ता । वेगीं चालवावें ग्रंथा । पूर्वकथा मूळींची ॥ ६७ ॥ हें

सोडावयास पहात असतो, पण आकाश कांहीं त्याला सोडीत नाहीं. त्याप्रमाणें जनार्दन रात्रंदिवस आम्हांला सोडीत नाहीं. ५३ मीं जरी त्याची कथा सांगितली नाहीं तरी तोच माझ्या मुखानें वक्ता होतो. अशा जुलमानें तो मजकडून बोलवितो, त्याला मी तरी काय करूं ! ५४ मी एखादी दृश्य वस्तु पाहूं लागतों, तों त्या वस्तूच्या आंत-बाहेर मला जनार्दनच दिसूं लागतो. गोडीनें कांहीं श्रवण करावें तर त्या शब्दांतहि जनार्दन प्रवेश करितो. ५५ आतां मी ऐकतहि नाहीं व पहातहि नाहीं. असा निश्चय करून स्वस्थ बसलों तर स्वस्थ बसण्याच्या रूपानें जनार्दनच दिसूं लागतो. ५६ मी खरोखर अशा अडचणींत सांपडलों आहें. जनार्दन मला बाहेरच पडूं देत नाहीं. अहो श्रोतेहो ! तुम्ही मला कांहीं तरी सल्ला द्या. मी सर्वथा अपराधी आहें. ५७ तेव्हां श्रोते म्हणाले कीं, काय हो आश्चर्य आहे ! याच्यामध्यें अहंभाव मुळींच दिसत नाहीं. याच्या बोलण्याचा अभिप्राय पाहिला कीं प्रेमाचें भरतें येतें. ५८ याच्या शब्दांचा विचार केला तर ते क्षीरसागराहूनहि खोल दिसतात. याचें प्रेमाचें बोलणें अपूर्व आहे. आत्मानंदानें तें डोलवितें. ५९ तूं जें गुरूचें वर्णन केलेंस तें सप्रेम ब्रह्मज्ञानच आहे. त्यामुळें आम्ही अगदीं तृप्त झालों. तुमच्या निरूपणाला दोष देण्यास जागाच नाहीं. ४६० नित्य गुरुस्मरण करावें. त्या गुरूच्या प्रेमाचें तूं कथन केलेंस. तेव्हां अमृताच्या भोजनाला पुरे कोण म्हणणार ! ६१ तुझी जनार्दनावर दृढभक्ति आहे, ही गोष्टहि आम्हांला कळली. त्यामुळें निरूपण अपूर्व होऊन तें रसाळहि झालें. ६२ तूं कथेचें निरूपण केलेंस किंवा विषयांतर करून एखादी उपकथा सांगितलीस तरी या निरुपणासारखी गोडी दुसऱ्या कशालाहि येणार नाहीं. ६३ तूं शुद्ध निरूपणानें गुरूचें वर्णन केलेंस आणि वर्णन केल्यावर स्वतःलाच अपराधी म्हटलेंस. यावरूवर तुझें मन ऐक्यामध्यें किती मग्न झालें आहे, तें उघड होतें. तूं श्रोत्यांचा मान वाढविलास. ६४ तुझी अपराधबुद्धि भगवच्चरणांत लीन झाली आहे. तेव्हां अपराधाचीहि शुद्धि झालीच व त्यामुळें तूं खरोखर निर्दोष झाला आहेस. ६५ गुरुस्तवनामध्यें तल्लीन होऊन तूं मूळकथा विसरलास. पण प्रेमाचें लक्षणच असें आहे, हें आम्हांला पूर्णपणें कळलें. ६६ श्रोते म्हणाले कीं आमचें मन आश्चर्यानें थक्क झालें आहे. तरी आतां पुढील मूळ कथा सांगून कथाभाग सत्वर पुढें

संतवचन मानूनि माथां । चरण वंदूनि तत्त्वतां । सावधान व्हावें चित्ता । पुढील कथा सांगेन ॥ ६८ ॥ यापरी तो अवधूतू । यदूसी सांगे परमार्थू । संवादें निमाला परमाद्भुतू । मग निवांतू राहिला ॥ ६९ ॥

श्रीभगवानुवाच--इत्युक्त्वा स यदुं विप्रस्तमामंत्र्य गभीरधीः ।
वन्दितोऽभ्यर्थितो राज्ञा ययौ प्रीतो यथागतम् ॥ ३२ ॥

उद्धवासी म्हणे श्रीकृष्ण । रायासी सांगोनि ब्रह्मज्ञान । जाहलें देखोनि समाधान । मग पुसोन निघाला ॥ ४७० ॥ राजा धांवोनि लागला चरणां । परम प्रेमें करी पूजना । करोनियां प्रदक्षिणा । मागुता चरणां लागला ॥ ७१ ॥ जाय ऐसें न बोलवे सर्वथा । राहें म्हणतां दिसे सामिता । वियोगु न साहवे तत्त्वतां । बोलू सर्वथा खुंटला ॥ ७२ ॥ ते देखोनि अवस्था । कृपा उपजली श्रीदत्ता । हात ठेवूनि माथां । प्रसन्नता उपजली ॥ ७३ ॥ येथूनि तुज मज आतां । वियोगु नाहीं सर्वथा । ऐसें आश्वासोनि नृपनाथा । होय निघता श्रीदत्त ॥ ७४ ॥ जेणें सुखें होता आला । तेणेंचि सुखें निघता जाला । राजा अतिप्रीतीं निवाला । सुखी जाला निजबोधें ॥ ७५ ॥

अवधूतवचः श्रुत्वा पूर्वेषां नः स पूर्वजः । सर्वसङ्गविनिर्मुक्तः समचित्तो बभूव ह ॥ ३३ ॥

चालवावा. ६७ संतांचें हें सांगणें शिरसा मान्य करून व त्यांचें चरण वंदून मी पुढील कथा सांगतों. तरी चित्त सावधान करावें. ६८ याप्रमाणें अवधूतानें यदूला परमार्थ सांगितला. हा परम अद्भुत संवाद ऐकून त्याचें चित्त शांत झालें व तो स्वस्थ बसला. ४६९.

श्रीभगवान् उवाच--श्रीभगवान् म्हणाले, इति यदुं उक्त्वा सः गभीरधीः विप्रः--असें यदूला बोलून तो महाज्ञानी ब्राह्मण अर्थात् दत्तात्रेय, राज्ञा वंदितः अभ्यर्थितः प्रीतः सन् तं आमन्त्र्य यथागतं ययौ--राजानें ज्याची प्रार्थना केली आहे. व ज्याला वंदन केलें आहे असा तो संतुष्ट होत्साता त्याला विचारून आल्या मार्गानें निघून गेला, म्ह० यदृच्छेनें गेला, असा त्याचा भावार्थ. ३२.

श्रीकृष्ण उद्धवाला असें म्हणाले. अवधूत यदुराजाला ब्रह्मज्ञान सांगून व त्याचें समाधान झालेलें पाहून त्याचा निरोप घेऊन जाण्यास निघाला. ४७० राजानें धांवत येऊन त्याचे पाय धरिले, अत्यंत प्रेमानें त्याची पूजा केली, प्रदक्षिणा घातल्या व तो पुनः पायां पडला. ७१ 'जा' असें बोलवेना. 'रहा' म्हणावें तर त्याला स्वामित्व दाखविल्यासारखें होतें व वियोग तर खरोखर सहन करवत नाहीं. त्यामुळें कांहीं केल्या शब्द उमटेना. ७२ ही त्याची स्थिति पाहून श्रीदत्तात्रेयाच्या मनांत दया उत्पन्न झाली. त्याच्या मस्तकावर हात ठेवून तो प्रसन्न होऊन म्हणाला कीं, ७३ आतांपासून तुझा माझा केव्हांहि वियोग होणार नाहीं. असें राजाला आश्वासन देऊन श्रीदत्त निघाला. ७४ जितक्या आनंदानें तो आला होता तितक्याच आनंदानें गेला. राजा अतिशय प्रेमानें शांत झाला व आत्मज्ञानामुळें सुखी झाला. ४७५.

--आतां भगवान् आपलें ब्रह्मवेत्त्यांचें कुल आहे, अशी त्याची स्तुति करितात--

अवधूतवचः श्रुत्वा--अवधूताचे वचन ऐकून, नः पूर्वेषां सः पूर्वजः--आमच्या पूर्वजांचाहि पूर्वज असा तो यदु, सर्वसङ्गविनिर्मुक्तः समचित्तः बभूव ह--सर्व संगापासून सर्वथा मुक्त व समचित्त झाला. [यांतील कपोत, मीन, हरिण, कुमारी, गज, सर्प, पतंग व टिटवी हे आठ त्याज्य अर्थाविषयीं माझे गुरू झाले. मधमाशी, मधाचें हरण करणारा व पिंगला हे तीन ग्राह्य अर्थ व त्याज्य अर्थ या दोहोंविषयीं गुरु झाले. बाकीचे पृथिव्यादि सर्व गुरु ग्राह्य अर्थाच्या विज्ञानाचें कारण झाले. या गुरूंमध्येंहि कांहीं अवांतर भेद आहेत, पण तेथल्या तेथें मुळांतच स्पष्ट झाला आहे. सातव्या अध्यायांत आठ गुरु सांगितले, आठव्या अध्यायांत नऊ सांगितले व नवव्या अध्यायांत आठ गुरु सांगितले. असे या तीन अध्यायांत मिळून एकंदर पंचवीस गुरु सांगितले आहेत.] ३३.

पाहोनि उद्धवा उजू । बोलता जाला अधोक्षजू । म्हणे आमचे पूर्वजांचा पूर्वजू । राजध्वजू यदुवीरू ॥ ७६ ॥ म्हणसी मी नेणें त्याचें नांव । तूं सांगतोसी हें अपूर्व । परी ज्याचेनि नामें आम्ही सर्व । वीर यादव म्हणवितों ॥ ७७ ॥ हरिखें म्हणे नंदनंदू । तो आमचा पूर्वज यदू । ब्रह्मज्ञानाचा संवादू । दत्तात्रयेंसीं पैं केला ॥ ७८ ॥ श्रीदत्तात्रेयाच्या वचनार्थां । विश्वासोनि जाला घेता । तेणें सर्वसंगविनिर्मुक्तता । आली हाता यदूच्या ॥ ७९ ॥ जो संगू सांडूनि दूर गेला । तेणें संगत्यागूचि केला । संगीं असोनि स्नेह सांडिला । संगमुक्त जाला तो जाण ॥ ४८० ॥ आकाश सर्व पदार्थांसी । मिळालें असे सर्व देशीं । परी नातळेचि सर्वसंगासी । संगमुक्तता त्यासी बोलिजे ॥ ८१ ॥ याहूनि विशेष संगमुक्तता । आली यदूचिया हाता । तेही सांगेन कथा । परिसें तत्त्वतां उद्धवा ॥ ८२ ॥ दत्तात्रेयबोधें तत्त्वतां । सर्वसंगामाजीं असतां । न देखे संगाची कथावार्ता । विशेषमुक्तता या नांव ॥ ८३ ॥ मज पूर्वीं द्वैतसंगू होता । तो जाऊनि निःसंग जालों आतां । या दोनी समूळ मिथ्या वार्ता । विनिर्मुक्तता पावलों ॥ ८४ ॥ दोर सापू नाहीं जाला । परी सापुपणाचा आळ आला । तोही दोरें नाहींसा केला । भ्रांतीं कल्पिला निजभ्रमू ॥ ८५ ॥ दोरू दोरपणें असे । सर्पु तो भ्रांतामनीं बसे । ऐसें सांडूनि द्वैतपिसें । रायासी सावकाशें समाधी ॥ ८६ ॥ समसाम्यें समानबुद्धी । जे बोलिजे 'निजसमाधी'। ते समाधी पावोनि त्रिशुद्धी । राजा निजपदीं पावला ॥ ८७ ॥ कृष्ण म्हणे उद्धवासी । तूं जन्मूनि ऐशिये वंशीं । जरी ब्रह्मज्ञान न साधिशी । तरी उणें पूर्वजांसी येईल ॥ ८८ ॥ यापरी हृषीकेशी । तिरस्कारोनि उद्धवासी । झोंबावया अद्वैतासीं । पुट बुद्धीसी देतुसे ॥ ८९ ॥ आधींचि विखारू काळियाणा । त्याचेंही पुंस रगडिल्या जाणा । मग झोंबिन्नल्या सत्राणा । नावरे कोणा सर्वथा ॥ ४९० ॥ आधींचि अनुताप उद्धवासी । वरी तिरस्कारिला हृषीकेशीं । तो गिळावया चिद्-

---

उद्धवाकडे सरळ पाहून श्रीकृष्ण म्हणाला कीं, यदुराजा आमच्या पूर्वजांचाहि पूर्वज असून तो सर्व राजांचा मुकुटमणि होता. ७६ तूं म्हणशील कीं, मला त्याचें नांवहि ठाऊक नाहीं. तूं हें कांहीं तरी अपूर्व सांगत आहेस. परंतु आम्हीं सर्व वीर आपल्याला त्याच्याच नांवावरून यादव म्हणवितों. ७७ नंदाचा पुत्र श्रीकृष्ण पुनः आनंदानें असें सांगूं लागला-त्याच आमच्या पूर्वज यदूनें दत्तात्रेयाशीं ब्रह्मज्ञानाचा संवाद केला. ७८ श्रीदत्तात्रेयाच्या वचनांवर विश्वास ठेवून त्यानें त्यांतील गूढ अर्थ जाणिला. त्यामुळें सर्वसंगापासून मुक्तता त्याला लाभली. ७९ जो संग सोडून दूर गेला त्यानें सर्वसंगत्याग केला असें समजावें. ४८० प्रपंचाच्या संगांत असूनहि जो त्यावर स्नेह ठेवीत नाहीं तो खरोखरच संगमुक्त झाला, असें समजावें. आकाश सर्व वस्तूंना सर्व बाजूंनीं व्यापून रहातें, पण त्या वस्तूंचा त्याला लेप होत नाहीं. यालाच निःसंग म्हणावें. ८१ याहीपेक्षां विशेष संगमुक्ति यदूला प्राप्त झाली होती, तीहि कथा सांगतों. हे उद्धवा ! तूं ती तत्त्वतः ऐक. ८२ दत्तात्रेयाच्या बोधामुळें तत्त्वतः तो सर्वसंगांत असूनहि त्याला त्यांची वार्तांहि नव्हती. यालाच विशेष संगमुक्ति म्हणतात. ८३ मला पूर्वीं द्वैतसंग होता, तो जाऊन मी आतां निःसंग झालों आहें, या दोन्हीं गोष्टी मुळीं खोट्या आहेत. वास्तविक मी मुक्तच झालों आहें. ८४ दोरी कधींच सर्प नसते, पण तिच्यावर सापाचा आरोप होतो. पण तो आरोप दोरीच्या ज्ञानानें घालविला कीं सर्प मिथ्या होतो. ८५ दोरी तिच्या स्वरूपांतच असते. पण भ्रमिष्टाच्या मनांत मात्र साप रहातो. तसेंच असलेलें हें द्वैताचें वेड टाकून राजा स्वरूपांत स्थित झाला. ८६ ऐक्यभावानें समबुद्धि होणें यालाच आत्मसमाधि म्हणतात. ती समाधि राजाला प्राप्त झाल्यामुळें तो खरोखर ब्रह्मस्वरूपाला प्राप्त झाला. ८७ श्रीकृष्ण उद्धवाला म्हणाले कीं, अशांच्या वंशांत जन्म घेऊन तूं जर ब्रह्मप्राप्ति करून घेतली नाहींस तर पूर्वजांच्या नांवाला कमीपणा येईल. ८८ याप्रमाणें श्रीकृष्णानें उद्धवाला तिरस्कारानें बोलून अद्वैताला मिठी घालण्यासाठीं त्याच्या बुद्धीला उजळाच दिला. ८९ आधींच विषारी काळा साप, त्यांत त्याच्या शेपटीवर पाय पडावा म्हणजे तो जसा वेगानें दंश करायला धांवतो व कांहीं केल्या कोणाला आंवरत नाहीं, ४९० त्याप्रमाणें उद्धवाला आधींच पश्चात्ताप झाला

ब्रह्मासी । निजमानसीं खवळला ॥ ९१ ॥ पुढिले अध्यायीं निरूपण । कृष्णउद्धवसंवाद जाण । सांगेल गुरुशिष्यलक्षण । श्रोते विचक्षण परिसतू ॥ ९२ ॥ एका जनार्दनु म्हणे । अगाध कृष्णमुखींचें बोलणें । तें मी जरी निरोपूं नेणें । परी तें गोडपणें निववित ॥ ९३ ॥ साखरेचा ब्रोल्ह केला । परी कडूपणा नाहीं आला । तैसा ग्रंथू प्राकृतभाषा जाला । असे संचला स्वानंदें ॥ ९४ ॥ जरी सोन्याचें पेंडुकें केलें । परी तें दगडमोला नाहीं आलें । तैसें भागवत प्राकृत जालें । परी नाहीं चुकलें निजज्ञाना ॥ ९५ ॥ मुक्ताफळालागीं सागरीं । बुड्या देती नानापरी । तें सांपडलिया घरींच्या विहिरीं । जो अव्हेरी तो मूर्ख ॥ ९६ ॥ तैशी संस्कृतव्याख्यानआटाटी । अतिकष्टें परमार्थी भेटी । तें जोडल्या मराठीसाठीं । उपेक्षादृष्टी न करावी ॥ ९७ ॥ धनवंतु रत्नपारखी पुरा । तेणें धुळीमाजीं देखिल्या हिरा । गांठी बांधोनि आणी घरा । पारखी खरा निजज्ञानें ॥ ९८ ॥ तैसें ज्ञाते विद्वज्जन । ग्रंथु मराठी देखोन । उपेक्षा न करितां करावा यत्न । पारखोनि चिद्रत्न साधावया ॥ ९९ ॥ क्षुद्रदृष्टी पाहणें पाहतां । बोलूं लागेल व्यासाचे ग्रंथा । मा हे तरी मराठी कविता । सांडूनि कुटिलता पाहावी ॥ ५०० ॥ ज्यांसी निजसुखाची आवडी । ते प्राकृतीं न काढिती खोडी । घेतली ज्ञानगर्भाची गोडी । अवस्था गाढी परमार्थीं ॥ १ ॥ जे साचार परमार्थी । ते अधिकारी ये ग्रंथीं । ज्यांसी भागवतीं भक्ती । ते पावती निजसुख ॥ २ ॥ ज्यांसी भागवतीं नाहीं भक्ती । कोरडी व्युत्पत्ती मिरविती । तेही जरी निंदा न करिती । तरी पुढें पावती भक्तीतें ॥ ३ ॥ निंदा वसे ज्याचे चित्ता । त्यास गति नाहीं सर्वथा । निंदा सकळ पापांचे माथां । दोष ईपरता असेना ॥ ४ ॥ निंदकाचें नांव घेतां । दोष वाचेसी होय लागता ।

होता, त्यांत श्रीकृष्णानें तिरस्काराचे शब्द उच्चारिले ! तसा तो जणुंकाय ब्रह्माला ग्रासून टाकण्यासाठींच मनांत खवळला. ९१ पुढील अध्यायांत कृष्ण आणि उद्धव यांचा संवाद आहे. त्यांत श्रीकृष्ण गुरु-शिष्यांचें लक्षण सांगेल. तरी चतुर श्रोत्यांनीं तें ऐकावें. ९२ जनार्दनरूपी एकनाथ म्हणतो कीं, कृष्णमुखांतील वचन फार गूढ आहे, त्याचें निरूपण मला जरी करितां येत नाहीं तरी त्याच्या माधुर्यानें अंतःकरण तृप्त होतें. ९३ साखरेचें कारलें जरी केलें तरी त्याला कडुपणा येत नाहीं. त्याप्रमाणें हा ग्रंथ जरी प्राकृत भाषेंत आहे तरी आत्मानंद त्यांत परिपूर्ण भरलेला आहे. ९४ सोन्याचा ओबडधोबड गोळा बनविला तरी त्याची किंमत दगड-मातीसारखी होत नाहीं. त्याचप्रमाणें भागवत जरी प्राकृत भाषेंत सांगितलें तरी त्यांतील आत्मज्ञान नाहींसें होत नाहीं. ९५ पाणबुडे मोत्यासाठीं समुद्रांत अनेक तऱ्हेनें बुड्या मारीत असतात, पण तींच मोतीं जर घरच्याच विहिरींत सांपडलीं तर त्यांचा अव्हेर करणारा मूर्खच म्हटला पाहिजे. ९६ त्याचप्रमाणें मोठ्या परिश्रमानें संस्कृतव्याख्यान समजून घेऊन मग जो परमार्थाचा लाभ होतो तोच लाभ अनायासें मराठींतून होत असतां त्याची उपेक्षा करूं नये. ९७ एक धनिक रत्नपारखी होता, त्यानें मातींत पडलेला एक हिरा पाहिला. तत्काल तो त्यानें पदरांत बांधून घरीं आणिला. कारण तो आपल्या ज्ञानानें खरा पारखी होता. ९८ त्याप्रमाणें तज्ज्ञ विद्वानांनीं हा मराठी ग्रंथ पाहून त्याची उपेक्षा न करितां ब्रह्मज्ञानरूपी रत्न मिळविण्यासाठीं त्याची पारख करण्याचा प्रयत्न करावा. ९९ दोषदृष्टीनेंच पहावयाचें झाल्यास प्रत्यक्ष व्यासांच्या ग्रंथांनाहि नांव ठेवितां येईल. मग हें तर केवळ मराठी काव्यच आहे. तरी कुत्सितबुद्धि टाकून हा ग्रंथ पहावा. ५०० ज्याला आत्मज्ञानाची आवड असते तो प्राकृत भाषेंतील दोष काढीत बसत नाहीं. तो त्यांतील गूढ ज्ञानाची गोडी चाखतो. १ त्याची परमार्थावर फार श्रद्धा असते. असे जे खरोखर परमार्थी आहेत तेच या ग्रंथाचे अधिकारी आहेत. ज्यांची या ग्रंथावर भक्ति आहे त्यांस आत्मसुख प्राप्त होतें. २ ज्यांची भागवतावर मुळीं भक्ति नसतें व त्यामुळें जे विद्वत्तेचा रिकामा डौल मिरवितात, त्यांनींहि जर निंदा केली नाहीं, तर त्यांच्याहि मनांत पुढें भक्ति उत्पन्न होते. ३ ज्याच्या मनांत निंदा वसत असते त्याला मात्र सर्वथा गतीच नाहीं. सर्व पापांमध्यें निंदा हें श्रेष्ठ पाप आहे. यासारखा दुसरा कोणताहि दोष नाहीं. ४ निंदकाचें नांव उच्चारिलें

तिशीं द्यावया प्रायश्चित्ता । रामराम सर्वथा म्हणावें ॥ ५ ॥ निंदेमाजीं देखिलें स्वार्था । निंदक प्रवर्तले भक्तहिता । बुडवूनि आपुले स्वार्था । परदोष सर्वथा क्षाळिले ॥ ६ ॥ सांडूनियां गुणदोष । श्रोतां होआवें सावकाश । जेथ वक्ता हृषीकेश । अतिसुरस तें ज्ञान ॥ ७ ॥ कृष्णउद्धवांचें ज्ञान । तत्काळ निरसी अज्ञान । एका विनवी जनार्दन । सावधान परियेसा ॥ ५०८ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे । एकादशस्कंधे श्रीकृष्णोद्धवसंवादे एकाकारटीकायां नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे भगवदुद्धवसंवादे नवमोऽध्यायः ॥ ९ ॥

अध्याय दहावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॐ नमो सद्गुरु धन्वंतरी । ज्याची दृष्टीचि निरुज करी । त्यावांचूनि संसारीं । भवरोगु दुरी न करवे ॥ १ ॥ ज्या भवरोगाचेनि दर्पें । फुंफात तापलीं त्रिविध तापें । मी माझें येणें संकल्पें । वाग्जल्पें जल्पती ॥ २ ॥ पडिलीं द्वैताचिया दुखणा । तोंडींची चवी गेली जाणा । मुखा आला कडवटपणा । कटु वचना बोलतु ॥ ३ ॥ जेथें व्याधीचेनि सन्निपातें । विवेक हाणोनियां लातें । उमरुडूनि धैर्य होते । वासना वनातें हिंडती ॥ ४ ॥ मनोरथकर्दमीं चरफडित । संकल्पमृगजळीं बुडत । वेगीं निसरोनियां पडत । टेंक चढतां स्वर्गाचें ॥ ५ ॥ बोरबडत स्नेहाची आराटी । गोंवीत

तरीहि वाणी दूषित होते. तिला प्रायश्चित देण्यासाठीं निरंतर राम-राम म्हणावें. ५ निंदेंतहि स्वार्थ दिसतो. कारण निंदक भक्तांचें हितच करीत असतात. ते आपलें हित बुडवून दुसऱ्याचे दोष धुवून टाकितात. ६ यासाठीं श्रोत्यांनीं गुण व दोष हे दोन्ही टाकून स्वस्थ बसावें. जेथें साक्षात् श्रीकृष्णच वक्ता तेथें ज्ञान अतिसुरस असावयाचेंच. ७ हें श्रीकृष्णानें उद्धवाला सांगितलेलें ज्ञान अज्ञानाचें तत्काल निरसन करितें. म्हणून एकनाथ जनार्दन विनंति करीत आहे कीं, तें सावधान चित्तानें ऐका. ५०८.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित टीकानुसार विष्णुशर्मेकृत सान्वयार्थ-भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव-संवाद या नांवाचा नववा अध्याय समाप्त झाला.

हे ॐकाररूप सद्गुरो तुला नमस्कार असो. तूं धन्वंतरी आहेस. तुझी केवल कृपादृष्टीच जीवांना रोगमुक्त करिते. तिच्यावांचून दुसऱ्या कोणालाहि या संसारांतील भवरोग दूर करवत नाहीं. १ त्रिविध तापानें तापलेलीं भूतें भवरोगाच्या उन्मादानें आक्रोश करितात. 'मी आणि माझें ' या संकल्पानें तीं बडबडत असतात. २ द्वैताच्या दुखण्यांत पडल्यामुळें त्यांच्या तोंडाची रुचि जाते व तोंड कडु झाल्यामुळें तीं कटुवचनें बोलतात. ३ या संनिपातरूपी व्याधींत तीं विवेकाला लाथेनें दूर झुगारून देतात, धैर्याला ढकलून देतात आणि वासनारूपी वनांत हिंडूं लागतात. ४ तेव्हां तीं मनोरथरूपी चिखलांत रुततात, संकल्परूपी मृगजलांत बुडतात आणि स्वर्गाचें शिखर चढूं लागलीं कीं तत्काल पाय निसरून पडतात. ५ स्नेहरूपी कांटेरीं झुडपें त्यांस ओरबडतात. लोभरूपी बोरीचे कांटे बोंचतात.